# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ : इतिहास

सत्र ५ : पेपर SEC-1

# इतिहास आणि पर्यटन–V

(History and Tourism-V)

सत्र–६ : पेपर– SEC-2

# इतिहास आणि पर्यटन–VI

(History and Tourism-VI)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-48427-43-4

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : इतिहास ■**

अध्यक्ष – **प्रोफेसर (डॉ.) चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली
- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा
- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली
- **प्रोफेसर (डॉ.) चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर
- **डॉ. तेजस मदन गर्गे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी अ‍ॅण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई
- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर
- **प्रोफेसर (डॉ.) निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या इतिहास विषयाच्या पेपर SEC-1 सत्र पाच साठी 'इतिहास आणि पर्यटन-५' आणि पेपर SEC-2 सत्र सहा साठी 'इतिहास आणि पर्यटन-६' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर SEC-1 इतिहास आणि पर्यटन-५ प्रस्तावना : इतिहास आणि पर्यटन, भारतीय पर्यटन उद्योगाचा विकास तर सत्र ६ साठी SEC-2 'इतिहास आणि पर्यटन-६' यामध्ये पर्यटन विपणन धोरण, पर्यटन क्षेत्रात रोजगाराच्या संधी या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. तसेच सदरच्या पुस्तकाच्या लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

शिवाजी विद्यापीठ, दूर शिक्षण केंद्राच्या अंतर्गत स्वयं अध्ययन निर्मिती करण्यासाठी मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सी. एस. नाईक, शिवाजी विद्यापीठ, इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. शिवाजी जाधव**

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,

दसरा चौक, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**इतिहास आणि पर्यटन**
**बी. ए. भाग–३**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | सत्र–५<br>घटक क्रमांक | सत्र–६<br>घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. शिवाजी जाधव**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर<br>जि. कोल्हापूर | १, २ | १, २ |

■ संपादक ■


**डॉ. शिवाजी जाधव**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर SEC-1** | |
| | **इतिहास आणि पर्यटन–५** | |
| १. | प्रस्तावना : इतिहास आणि पर्यटन | १ |
| २. | भारतीय पर्यटन उद्योगाचा विकास | ३६ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर SEC-2** | |
| | **इतिहास आणि पर्यटन–६** | |
| १. | पर्यटन विपणन धोरण | ६५ |
| २. | पर्यटन क्षेत्रात रोजगाराच्या संधी | ९१ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १
## प्रस्तावना : इतिहास आणि पर्यटन

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

  १.२.१ पर्यटनात इतिहासाची भूमिका (The role of history in tourism)

  १.२.२ पर्यटन स्थळांची ऐतिहासिक दृष्टिकोनातून मांडणी (Historical Interpretation of tourist destination)

  १.२.३ भारतातील पर्यटनाचा इतिहास (Brief history of tourism in India)

१.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ आणि पुस्तके


### १.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यास पुढील घटकांचे आकलन होण्यास मदत होईल.

१. पर्यटनात इतिहासाची भूमिकेचा अभ्यास करणे.

२. पर्यटन स्थळांची ऐतिहासिक दृष्टिकोनातून मांडणी करणे.

३. भारतातील प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील पर्यटनाचा इतिहास अभ्यासणे.

### १.१ प्रस्तावना

पर्यटन क्षेत्रात इतिहासाला महत्त्वाची भूमिका आहे. कारण इतिहास आणि सांस्कृतिक वारसा पर्यटनाचे मुख्य आधारस्तंभ आहेत. इतिहास न केवळ पर्यटनाच्या अनुभवाला समृद्ध करते, तर स्थानिक संस्कृती, अर्थव्यवस्था, आणि पर्यावरणीय संवर्धनासाठीही योगदान देते. त्यामुळे, इतिहासाच्या संवर्धनामुळे पर्यटन उद्योग अधिक स्थायी, शिक्षणात्मक, आणि सामाजिक दृष्ट्या प्रगत होतो. तसेच पर्यटन आणि ऐतिहासिक

अध्ययन यांचा संबंध एकत्रितपणे ऐतिहासिक ज्ञान, सांस्कृतिक समृद्धता, आणि सामाजिक जागरूकता वाढवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. हा संबंध विद्यार्थ्यांना एक व्यापक दृष्टिकोन देतो, ज्यामुळे त्यांना इतिहासाची गोडी लागते आणि स्थानिक व जागतिक स्तरावर संवेदनशीलतेचा विकास होतो.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ पर्यटनात इतिहासाची भूमिका (The role of History in Tourism)

पर्यटन विकासात इतिहासाला अन्यनसाधारण महत्व आहे. 'पर्यटन भूगोल' या पुस्तकाचे लेखक श्री. आर. रॉबिन्सन या घटकांबद्दल लिहिताना, 'पर्यटन उद्योगावर ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक घटकांचा मोठा प्रभाव असतो.' भारतीय पर्यटन व्यवसाय आणि येथील इतिहास यांचे नाते अतूट आहे. भारत हा एक दीर्घ परंपरा असलेला ऐतिहासिक देश आहे. शेकडो ऐतिहासिक ठिकाणे आहेत, त्यापैकी काही अवशेषांच्या रूपात तर काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. काही ऐतिहासिक स्थळे आजही त्यांचे स्थान टिकवून आहेत. काहीचा अत्यंत विकास झालेला आहे. या देशाला भेट देणाऱ्या एकूण परदेशी पर्यटकांपैकी ५४ टक्के पर्यटकांना ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांमध्ये विशेष रस असतो. येथील इतिहास हे पर्यटनाचे प्रमुख आकर्षण ठरते, कारण पर्यटकांना विविध ऐतिहासिक स्थळे, संस्कृती, परंपरा आणि प्राचीन वास्तू यांची अनुभूती घ्यायला आवडते. यामुळे पर्यटनाच्या माध्यमातून इतिहासाशी संपर्क साधण्याची संधी मिळते आणि समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे जतन होते. पर्यटनामध्ये इतिहासाची भूमिका खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल,

- **ऐतिहासिक स्थळे आणि सांस्कृतिक जतन**

ऐतिहासिक स्थळे आणि सांस्कृतिक जतन हे एकमेकांशी निगडीत आहेत, कारण ऐतिहासिक स्थळे केवळ भूतकाळाची साक्ष देत नाहीत, तर त्या ठिकाणी असलेल्या संस्कृती, परंपरा आणि जीवनशैलींचे प्रतिक म्हणूनही ओळखली जातात. यामुळे या स्थळांचे जतन करणे, त्यांना संवर्धित करणे आणि पुढील पिढ्यांसाठी टिकवणे हे महत्त्वाचे ठरते.

**१. वारसा आणि ओळख:**

ऐतिहासिक स्थळे एखाद्या राष्ट्राच्या किंवा प्रदेशाच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ओळखीचे प्रतिनिधित्व करतात. उदाहरणार्थ, भारतातील ताजमहाल, राजस्थानातील किल्ले, आणि महाराष्ट्रातील अजंठा-वेरुळ लेणी या स्थळांमध्ये प्राचीन वास्तुकला, कला, आणि संस्कृतीचे दर्शन घडते. या स्थळांचे जतन केल्याने त्यांच्याशी संबंधित सांस्कृतिक वारसा टिकून राहतो. तसेच खजुराहोची मंदिरे आपल्या उत्कृष्ट शिल्पकलेसाठी प्रसिद्ध आहेत. येथे असलेल्या शिल्पांमधून हिंदू आणि जैन धर्माच्या विविध देवतांचे, तसेच मानवी जीवनाच्या विविध पैलूंना दाखविण्यात आले आहे. खजुराहोच्या मंदिरांनी भारतीय शिल्पकलेला जागतिक ओळख दिली आहे.

## २. सांस्कृतिक जतनाचे साधन:

ऐतिहासिक स्थळांमध्ये प्राचीन वास्तू, पुरातन स्मारके, आणि महत्त्वपूर्ण इमारती असतात, विविध काळातील समाजाच्या जीवनशैली, विचारधारा, आणि तंत्रज्ञानाची साक्ष देतात. या स्थळांचे जतन केल्याने त्या संस्कृतीचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचतो आणि त्या काळातील जीवनाचे अन्वेषण करणे शक्य होते. उदा.  तमिळनाडूमधील तंजावर, गंगैकुंडचोलापुरम, आणि दरासूरम येथील चोल राजांच्या काळातील मंदिरे ही भारतीय स्थापत्यकलेतील अमूल्य ठेवा आहेत. या मंदिरांनी चोल साम्राज्याच्या सांस्कृतिक आणि धार्मिक वारशाची ओळख जपली आहे.

## ३. पर्यटनामुळे संवर्धनाला चालना:

अनेक ऐतिहासिक स्थळे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाची असतात. जगभरातील पर्यटक या ठिकाणी भेट देतात, ज्यामुळे या स्थळांच्या संवर्धनासाठी आवश्यक निधी मिळतो. पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे सरकार आणि स्थानिक प्रशासन या स्थळांच्या देखभालीसाठी आणि त्यांच्याशी संबंधित सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनासाठी प्रयत्न करतात. अजिंठा-एलोरा लेणी (महाराष्ट्र) या लेणींच्या अप्रतिम शिल्पकलेमुळे दरवर्षी लाखो पर्यटक येथे येतात. यामुळे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग (ASI) यांच्या सहकार्याने संवर्धन कार्य सुरु आहे.

## ४. शिक्षण आणि संस्कृतीचे संरक्षण:

ऐतिहासिक स्थळे ही शिकण्यासाठी आणि इतिहासाची समज वाढवण्यासाठी एक अमूल्य साधन आहेत. पर्यटक आणि स्थानिक लोक या स्थळांमधून इतिहासाची माहिती घेतात आणि त्या स्थळांच्या सांस्कृतिक महत्त्वाचा सन्मान करतात. यामुळे लोकांमध्ये सांस्कृतिक वारशाचे महत्त्व वाढते आणि जतन करण्याची इच्छाही निर्माण होते.  उदा. जंतर मंतर (जयपूर, दिल्ली) हे प्राचीन खगोलशास्त्राचे केंद्र आहे. महाराजा जयसिंग याने खगोलशास्त्राच्या अभ्यासासाठी बांधलेली ही वेधशाळा भारताच्या प्राचीन वैज्ञानिक वारशाचे प्रतीक आहे. जंतर मंतरच्या पर्यटनामुळे खगोलशास्त्राच्या परंपरेचे संरक्षण झाले आहे. येथे खगोलशास्त्रातील संशोधनासाठी आणि शिक्षणासाठी भरपूर संधी उपलब्ध आहे.

## ५. स्थानिक कला आणि परंपरांचा प्रचार:

ऐतिहासिक स्थळांमुळे स्थानिक कला, हस्तकला, संगीत, आणि नृत्य यांचा प्रचार होतो. पर्यटकांना स्थानिक सांस्कृतिक कार्यक्रम आणि परंपरा अनुभवण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्या संस्कृतीची जागतिक स्तरावर प्रसिद्धी होते. उदाहरणार्थ, राजस्थानातील उंट मेळा किंवा केरळातील कथकली नृत्य या परंपरागत कला आणि संस्कृतीच्या प्रदर्शनामुळे जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहेत. तसेच काश्मीरच्या सुंदर शाल आणि पाश्मिनाचे उत्पादन हे पर्यटनामुळे जिवंत राहिले आहे. पर्यटक येथून स्थानिक पाश्मिना शाल, कालीन, आणि हस्तकला खरेदी करतात. या वस्त्र उद्योगाला मिळणारा पर्यटनाचा प्रतिसाद काश्मिरी कापड परंपरेचे

संरक्षण करतो. पारंपरिक वस्त्रोद्योग जिवंत ठेवण्यासाठी स्थानिक लोकांना काम आणि आर्थिक सहाय्य मिळते.

**६. सांस्कृतिक ओळखीचे संवर्धन:**

अनेक ठिकाणी ऐतिहासिक स्थळे आणि सांस्कृतिक वारसा धोक्यात येऊ शकतो, विशेषतः आधुनिक विकासाच्या प्रक्रियेत. पण या स्थळांचे संवर्धन केल्याने त्यांची सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवणे शक्य होते. या स्थळांवर आधारित पर्यटनामुळे स्थानिक प्रशासन आणि समाजाला त्यांचे जतन करण्यासाठी प्रोत्साहन मिळते. उदा. केरळमधील तेय्यम हा धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा एक प्रकार आहे, ज्यामध्ये लोकगायक, नर्तक, आणि कलाकार विविध देवी-देवतांचे रूप घेऊन प्राचीन कथांचे पुनरावलोकन करतात. पर्यटनामुळे या पारंपरिक नृत्य-नाट्य प्रकाराची लोकप्रियता वाढली आहे. अनेक परदेशी पर्यटक हे खास अनुभवण्यासाठी केरळला येतात, ज्यामुळे तेय्यम परंपरेचे संवर्धन होते.

ऐतिहासिक स्थळे आणि सांस्कृतिक जतन हे केवळ भूतकाळाचे स्मरण करण्यासाठी नाही, तर त्या संस्कृतीचे सखोल अध्ययन, संरक्षण, आणि जागतिक स्तरावर प्रसार करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. अशा स्थळांचे जतन केल्याने जागतिक सांस्कृतिक वारसा समृद्ध होतो आणि भविष्यातील पिढ्यांना आपला इतिहास आणि परंपरा समजून घेण्याची संधी मिळते.

## ● ऐतिहासिक पर्यटन आणि संवर्धन

पर्यटनामध्ये इतिहास वारसा संवर्धनाची महत्त्वाची भूमिका पार पाडतो. पर्यटक अनेक ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेटी देत असतात. अनेकदा या स्थळांवर येणाऱ्या पर्यटकांमुळे स्थानिक प्रशासन आणि सरकार यांना त्यांच्याबाबत जागरूकता येते आणि त्या स्थळांचे जतन करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

**१. आर्थिक उत्पन्न आणि संवर्धनासाठी निधी:**

पर्यटनामधून मिळणारे उत्पन्न वारसा स्थळांच्या देखभाल, पुनर्बांधणी, आणि जतनासाठी वापरले जाते. ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी पर्यटक तिकीट खरेदी करतात, त्याचबरोबर हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, आणि स्थानिक विक्रेते यांच्यामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ मिळतो. हा निधी वारसा स्थळांच्या संरचनेचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या नियमित देखभालीसाठी वापरला जातो. उदा. ताजमहाल हे जगातील सात आश्चर्यांपैकी एक असल्याने येथे लाखो पर्यटक भेट देतात. प्रवेश शुल्कातून मोठे उत्पन्न मिळते. तसेच भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) आणि केंद्र सरकारकडून संवर्धनासाठी विशेष निधी दिला जातो. याशिवाय, आंतरराष्ट्रीय संस्था यासाठी आर्थिक मदत करतात.

**२. स्थळांच्या जतनाची जनजागृती:**

पर्यटनामुळे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांचे महत्त्व जगभर पोहोचते. जेव्हा पर्यटक एखाद्या ऐतिहासिक स्थळाला भेट देतात, तेव्हा त्या स्थळाचा इतिहास, त्याचे महत्त्व, आणि त्याच्याशी संबंधित सांस्कृतिक परंपरा जाणून घेतात. यामुळे या स्थळांच्या जतनाची गरज वाढते आणि जनजागृती होते. उदा.

अजिंठा–एलोरा (महाराष्ट्र) लेण्यांमधील शिल्पकलेचे रक्षण करण्यासाठी पर्यटकांना फ्लॅश फोटोग्राफीवर बंदी आहे, तसेच लेण्यांच्या संरचनेला हात न लावण्याची सूचना दिली जाते. पर्यटकांना लेणींच्या जतनाबद्दल शैक्षणिक माहिती दिली जाते.

**३. स्थानिक समुदायांचा माध्यमातून संवर्धन :**

पर्यटनामुळे स्थानिक समुदायांना आर्थिक फायदा होतो, ज्यामुळे तेही वारसा स्थळांच्या संरक्षणात सक्रिय होतात. स्थानिक लोकांना रोजगार मिळतो आणि ते आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी आणि पर्यटकांना आपली परंपरा सांगण्यासाठी प्रेरित होतात. वारसा पर्यटनामुळे स्थानिक संस्कृती आणि परंपरांची जपणूक होते. उदा. हम्पी (कर्नाटक) येथील उत्सव हा स्थानिक संस्कृती, नृत्य, आणि संगीताचा मोठा उत्सव आहे, ज्यात पर्यटक आणि स्थानिक लोक एकत्र येतात. विजयनगर साम्राज्याच्या वैभवशाली परंपरांचा उगम आणि जतन येथे पाहायला मिळतो.

**४. वारसा स्थळांच्या पुनरुज्जीवनाला चालना:**

अनेक ऐतिहासिक स्थळे काळाच्या ओघात दुर्लक्षित होतात, परंतु पर्यटनामुळे या स्थळांचे पुनरुज्जीवन केले जाते. पर्यटकांच्या आकर्षणामुळे सरकार किंवा खाजगी संस्था यांना या स्थळांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. हे स्थळ पुन्हा एकदा समाजाच्या आणि पर्यटकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. उदा. ''रानी की वाव'' ही गुजरातमधील प्रसिद्ध ऐतिहासिक बावडी आहे. युनेस्कोने २०१४ मध्ये याला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले. बावडीच्या शिल्पकलेचे पुनरुज्जीवन आणि जतन करण्यात आले आहे. जागतिक वारसा स्थळ झाल्यानंतर पर्यटन वाढले आणि पुनरुज्जीवनासाठी निधी मिळाला. गुजरात सरकारने विशेष पुनरुज्जीवन योजना आखून बावडीच्या संवर्धनासाठी प्रयत्न केले आहेत.तसेच उत्तरप्रदेश येथील वाराणसी हे भारतातील सर्वात जुने धार्मिक आणि सांस्कृतिक शहर आहे. गंगा नदीच्या घाटांचे पुनरुज्जीवन आणि स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. ''नमामी गंगे'' योजनेमुळे घाटांची स्वच्छता, नदीतील प्रदूषण कमी करणे, आणि घाटांचे सौंदर्यीकरण यावर भर दिला गेला आहे.

पर्यटनामध्ये इतिहासाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. इतिहास हे केवळ भूतकाळाचे स्मरण देणारे माध्यम नसून, ते आपल्या सांस्कृतिक आणि सामाजिक वारशाचे जतन करण्यास मदत करते. वारसा पर्यटन हे पर्यटन क्षेत्राचे एक महत्त्वाचे अंग आहे, जे पर्यटकांना ऐतिहासिक स्थळांचा सखोल अनुभव देऊन जागतिक वारशाचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वाचे योगदान देते.

## ● ऐतिहासिक पर्यटन आणि शिक्षण आणि जागरूकता

इतिहासाच्या माध्यमातून पर्यटन हे पर्यटकांना शिक्षण आणि जागरूकता देण्यासाठी एक प्रभावी साधन आहे. जेव्हा पर्यटक ऐतिहासिक स्थळांना भेट देतात, तेव्हा त्यांना त्या ठिकाणाचा इतिहास, संस्कृती, परंपरा, आणि सामाजिक जीवनाचा सखोल अनुभव घेण्याची संधी मिळते. पर्यटन हे केवळ मनोरंजनासाठी नसते, तर

त्यातून खूप काही शिकण्यास मिळते. खालीलप्रमाणे इतिहासाच्या माध्यमातून पर्यटकांना शिक्षण आणि जागरूकता मिळवता येते:

### १. इतिहासाच्या साक्षात्कारातून शिक्षण:

ऐतिहासिक स्थळांना भेट दिल्याने प्रवाशांना त्या ठिकाणच्या इतिहासाचा साक्षात्कार होतो. उदाहरणार्थ, किल्ले, मंदिरं, प्राचीन वास्तू, आणि स्मारके हे त्या स्थळाच्या राजकीय, सामाजिक, आणि सांस्कृतिक जीवनाचे प्रतीक असतात. या ठिकाणी भेट दिल्याने प्रवाशांना भूतकाळातील महत्त्वपूर्ण घटना, व्यक्तिमत्त्वे, आणि जीवनशैली समजते, ज्यातून त्यांचे इतिहासाबद्दलचे ज्ञान वाढते. उदा. सांची स्तूप हे भारतातील सर्वात प्राचीन आणि महत्त्वाचे बौद्ध स्तूप आहे. येथे गौतम बुद्धाच्या जीवनाशी संबंधित विविध शिक्षण, कला, आणि तत्त्वज्ञानाचे जतन केले गेले आहे. सांची स्तूपाच्या पर्यटनामुळे बौद्ध धर्माच्या वैचारिक आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करण्यात मदत झाली आहे. बौद्ध स्थापत्यशास्त्र आणि शिल्पकलेच्या अभ्यासासाठी हे स्थळ एक शिक्षण केंद्र बनले आहे.

### २. सांस्कृतिक विविधतेची जाणीव:

पर्यटनाच्या माध्यमातून प्रवाशांना विविध संस्कृती आणि परंपरांची माहिती मिळते. ऐतिहासिक स्थळांना भेट देताना प्रवाशांना त्या ठिकाणच्या संस्कृतीचा अनुभव येतो आणि त्या संस्कृतीशी जुळलेली विविधता जाणवते. यामुळे जागतिक स्तरावर सांस्कृतिक समृद्धी आणि परस्पर समज वाढते. उदा. फतेहपूर सिक्री हे अकबराच्या राज्यकारभाराचे उदाहरण आहे, ज्यात विविध धर्मांतील सहिष्णुता आणि परस्पर आदर दाखविला गेला. येथे हिंदू, इस्लामी, आणि जैन स्थापत्यशैलींचा संगम आहे. कबरीवर ''दीन-ए-इलाही'' तत्त्वज्ञानातून विविध धर्मांचा आदर आणि समन्वय दिसतो, ज्यामुळे भारतीय समाजात सांस्कृतिक विविधतेचे महत्त्व अधोरेखित होते.

### ३. भूतकाळातील चुका आणि शिकवण:

इतिहासाच्या माध्यमातून पर्यटन प्रवाशांना भूतकाळातील चुका आणि त्यातून घेतलेल्या शिकवणींची जाणीव होते. ऐतिहासिक स्थळे पाहून ते त्या काळातील महत्त्वाच्या घटनांचा अभ्यास करतात, ज्यामुळे त्यांना पूर्वीच्या चुका समजतात आणि भविष्यात त्या चुका टाळण्याचे महत्त्व पटते. उदाहरणार्थ, भीमबेटका लेणी (मध्य प्रदेश) आदिमानवाच्या काळातील जीवनशैली आणि त्यांच्या संघर्षांचा इतिहास येथे पाहायला मिळतो. येथे जगण्याच्या संघर्षातून आदिमानवाने केलेले प्रयोग आणि चुका यांचे चित्रण आढळते. या ठिकाणावरून मानवजातीच्या आदिम काळातील चुका, शिकवणी आणि प्रगती यांची जाणीव होते. सभ्यता कशी विकसित होत गेली आणि पूर्वजांनी त्यातून कसे शिकले, याचे दर्शन या लेण्यांतून घडते. तसेच जलियांवाला बाग (अमृतसर, पंजाब) येथे इ.स. १९१९ मध्ये ब्रिटिश सैन्याने शांततामय भारतीय नागरिकांवर केलेल्या गोळीबारात अनेक लोक मारले गेले. हा हल्ला भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक काळा अध्याय ठरला. या ठिकाणी जाणाऱ्यांना शांततेची आणि मानवतेची महत्त्वाची शिकवण मिळते, तसेच या घटनेने ब्रिटिश शासकांच्या क्रौर्याचा इतिहास समोर आणला.

### ४. सामाजिक जागरूकता:

ऐतिहासिक स्थळांना भेट देताना पर्यटकांना त्या ठिकाणच्या सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भाची माहिती मिळते. प्रवासी जेव्हा इतिहासाच्या साक्षीदार ठिकाणांवर जातात, तेव्हा तेथील समाजजीवन, धार्मिक परंपरा, आणि सांस्कृतिक मूल्ये समजून घेतात. उदाहरणार्थ, धार्मिक स्थळांवर भेट दिल्याने धर्म, आचार-विचार, आणि त्याच्याशी संबंधित रूढी-परंपरांची माहिती मिळते. उदा. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली साबरमती (अहमदाबाद, गुजरात) आश्रमातून भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात झाली. येथूनच गांधीजींनी अहिंसा आणि सत्याग्रहाच्या मार्गाने ब्रिटीश सत्तेविरुद्ध लढा दिला. येथे जाणाऱ्यांना अहिंसा, सामाजिक न्याय, आणि समानतेचे तत्त्वज्ञान शिकवले जाते. आधुनिक काळात शांतता आणि सहिष्णुतेच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण होते.

### ५. स्थल-विशिष्ट इतिहासाचा अभ्यास:

पर्यटनामध्ये स्थल-विशिष्ट इतिहासाचा अभ्यास करण्यात येतो. प्रत्येक ठिकाणाचा स्वतःचा इतिहास आणि परंपरा असतात. प्रवाशांना त्या ठिकाणाशी संबंधित खास घटना आणि व्यक्तिमत्त्वांची माहिती मिळते, ज्यामुळे त्यांची इतिहासाची समज विस्तृत होते. उदाहरणार्थ, सेल्युलर जेलात (अंदमान आणि निकोबार) ब्रिटिशांनी भारतीय स्वातंत्र्यसैनिकांना 'काळ्या पाण्याची शिक्षा' म्हणून ठेवले होते. येथे भारतीय स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित घटनांचा अभ्यास करता येतो. तसेच क्रांतिकारकांच्या जीवनाचा अभ्यास, त्यांची संघर्षकथा, आणि स्वातंत्र्यलढ्याचे महत्त्व स्पष्ट होते.

इतिहासाच्या माध्यमातून पर्यटन हे प्रवाशांना शिक्षण, जागरूकता, आणि सांस्कृतिक समृद्धी प्रदान करण्यासाठी एक प्रभावी साधन आहे. ऐतिहासिक स्थळांना भेट दिल्याने प्रवाशांना जगभरातील विविध संस्कृती, परंपरा, आणि ऐतिहासिक घटनांचे सखोल ज्ञान मिळते, ज्यामुळे त्यांच्या विचारसरणीत बदल होतो आणि ते अधिक जागरूक नागरिक बनतात.

## • ऐतिहासिक पर्यटन आणि आर्थिक लाभ

ऐतिहासिक पर्यटन म्हणजे प्राचीन स्थळे, स्मारके, किल्ले, राजवाडे, आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या इतर ठिकाणांना भेट देण्याची प्रक्रिया, जी पर्यटकांना त्या ठिकाणच्या सांस्कृतिक, सामाजिक, आणि ऐतिहासिक महत्त्वाचे ज्ञान देते. याच वेळी, ऐतिहासिक पर्यटन आर्थिक लाभाचे एक महत्त्वपूर्ण साधन ठरते. ऐतिहासिक स्थळे जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात, आणि त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

### १. स्थानिक रोजगार निर्मिती:

ऐतिहासिक स्थळांवर होणाऱ्या पर्यटनामुळे स्थानिक लोकांना नोकऱ्या मिळतात. गाईड, हॉटेल कर्मचारी, रेस्टॉरंट्स, स्थानिक हस्तकला विक्रेते, वाहतूक सेवा यांसारख्या विविध सेवा पुरवणारे लोक आर्थिकदृष्ट्या लाभान्वित होतात. पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी वाढतात, ज्यामुळे स्थानिक लोकांचे जीवनमान सुधारते.

### २. आर्थिक उत्पन्न आणि गुंतवणूक:

ऐतिहासिक पर्यटन हे पर्यटनाच्या इतर प्रकारांपेक्षा दीर्घकालीन आर्थिक उत्पन्नाचे स्रोत असते. पर्यटक तिकिटे, गाईड सेवा, आणि इतर सुविधांचा लाभ घेतात, ज्यामुळे या स्थळांवर सरकार आणि खाजगी क्षेत्राला मोठे उत्पन्न मिळते. हे उत्पन्न वापरून सरकारला त्या स्थळांची देखभाल, संवर्धन, आणि विकासासाठी गुंतवणूक करता येते, ज्यामुळे अधिक पर्यटकांना आकर्षित करता येते.

### ३. हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्ससाठी व्यवसायाच्या संधी:

ऐतिहासिक स्थळांच्या आसपास हॉटेल्स, लॉजेस, रेस्टॉरंट्स, आणि कॅफे यांसारख्या सुविधांचा विकास होतो. पर्यटनाच्या माध्यमातून येणारे पर्यटक याठिकाणी वास्तव्य करतात, जे स्थानिक व्यावसायिकांसाठी एक मोठा आर्थिक फायदा असतो. यामुळे पर्यटनाशी संबंधित सेवांचा विस्तार होतो आणि आर्थिक विकासाला गती मिळते.

### ४. स्थानिक उत्पादने आणि हस्तकलेचा प्रचार:

ऐतिहासिक पर्यटनामुळे स्थानिक हस्तकला, शिल्पकला, वस्त्र, आणि इतर परंपरागत उत्पादने जगभरातील पर्यटकांच्या संपर्कात येतात. पर्यटक स्थानिक बाजारातून स्मृतीचिन्हे, हस्तनिर्मित वस्तू, आणि स्थानिक उत्पादनांची खरेदी करतात. यामुळे स्थानिक कारागिर आणि उत्पादकांना प्रोत्साहन मिळते आणि त्यांचा व्यवसाय वाढतो. उदा. कोणार्क मंदिराच्या परिसरात ओडिशाची पारंपारिक साड्या आणि हस्तकलेच्या वस्तू विकल्या जातात, ज्यामुळे स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन मिळते.

### ५. अंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक संबंधांची निर्मिती:

ऐतिहासिक पर्यटनामुळे जागतिक स्तरावर आर्थिक संबंध प्रस्थापित होतात. विविध देशांतील पर्यटक या ऐतिहासिक स्थळांना भेट देतात, ज्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत आर्थिक देवाणघेवाण होते. परदेशी पर्यटकांनी स्थानिक उत्पादनांच्या खरेदीमुळे निर्यातीत वाढ होते, ज्यामुळे देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते. उदा. हम्पीच्या ऐतिहासिक स्थळांनी कर्नाटकमध्ये पर्यटन वाढवण्यास मदत केली आहे. इथे येणारे विदेशी पर्यटक स्थानिक उत्पादनांची खरेदी करून आर्थिक संबंध मजबूत करतात.

### ६. संवर्धनासाठी निधी उपलब्ध:

ऐतिहासिक पर्यटनातून मिळणारे आर्थिक उत्पन्न या स्थळांच्या जतन आणि संवर्धनासाठी वापरले जाते. ऐतिहासिक स्थळांची देखभाल, पुनर्बांधणी, आणि संवर्धनासाठी लागणारा निधी पर्यटनातून मिळतो. यामुळे वारसा स्थळांचे दीर्घकालीन संरक्षण होते, आणि त्यांचे सांस्कृतिक महत्त्व टिकवून ठेवता येते.

### ७. पर्यटनाच्या माध्यमातून शाश्वत विकास:

शाश्वत पर्यटन हा आर्थिक विकासाचा एक महत्त्वपूर्ण मार्ग आहे, जो पर्यावरणीय, सामाजिक, आणि सांस्कृतिक स्थिरतेसह अर्थव्यवस्थेला चालना देतो. ऐतिहासिक स्थळांचे शाश्वत विकासासाठी जतन आणि

संवर्धन केले जाते, जेणेकरून ते भविष्यातील पिढ्यांसाठीही उपलब्ध असतील आणि पर्यटन क्षेत्रातील उत्पन्न सातत्याने मिळत राहील. उदा. ताजमहालच्या संरक्षणासाठी विविध पर्यावरणीय शाश्वत विकासाचे उपक्रम राबवले जातात, जसे की वृक्षारोपण, प्रदूषण नियंत्रण, आणि पर्यावरण शिक्षण. या उपक्रमांमुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ आणि पर्यावरण संरक्षण यामध्ये संतुलन साधले जाते.

ऐतिहासिक पर्यटन हे केवळ सांस्कृतिक आणि ऐतिहासिक अनुभव घेण्याचे साधन नसून, ते आर्थिक विकासाचे एक मोठे साधन आहे. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला चालना मिळते, रोजगाराच्या संधी वाढतात, आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध होतो. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटनाला प्रोत्साहन देणे हे आर्थिक प्रगतीसाठी आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**स्वाध्याय**

**प्रश्न अ. रिकाम्या जागा भरा.**

१. ............ च्या मंदिरांनी भारतीय शिल्पकलेला जागतिक ओळख दिली आहे.

२. जयपूर व दिल्ली येथील ............ हे पर्यटन स्थळ हे प्राचीन खगोलशास्त्राचे केंद्र आहे.

३. केरळातील ............ नृत्यकला जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहेत.

४. ............ मूळे बौद्ध धर्माच्या वैचारिक आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करण्यात मदत झाली आहे.

५. ............ येथे जगण्याच्या संघर्षातून आदिमानवाने केलेले प्रयोग आणि चुका यांचे चित्रण आढळते.

### १.२.२ पर्यटन स्थळांची ऐतिहासिक दृष्टिकोनातून मांडणी (Historical Interpretation of tourist destination)

ऐतिहासिक घटक, घटना याबद्दल लोकांना कुतूहल व आस्था असते. अशा स्थळांना भेटी देण्याची इच्छा पर्यटकांना असते. तसेच तेथील इतिहास जाणून घेण्याचा मानस पर्यटकांचा असतो. अशा पर्यटन स्थळांची ऐतिहासिक दृष्टिकोनातून मांडणी केल्यास, ती स्थळे त्यांच्या सांस्कृतिक, धार्मिक, आणि ऐतिहासिक महत्त्वाचे प्रतिनिधित्व करतात. या स्थळांचा अभ्यास केल्याने, पर्यटकांना केवळ इतिहासाचीच माहिती मिळत नाही, तर त्यांना संस्कृतीच्या विविधतेचा आणि समृद्ध वारशाचा अनुभव घेता येतो. पर्यटन स्थळांच्या इतिहासाची मांडणी करताना, काही ठरावीक घटकांमध्ये माहिती मांडणे महत्त्वाचे असते. यामुळे माहिती अधिक सुसूत्र आणि प्रभावी बनते. पर्यटन स्थळांचे इतिहासाच्या अनुषंगाने वर्णन करताना काही महत्त्वाचे घटक लक्षात ठेवून त्याची माहिती द्यावी लागते. हे घटक स्थळाच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, आणि धार्मिक महत्त्वावर आधारित असतात. खालीलप्रमाणे काही महत्त्वाची ऐतिहासिक पर्यटन घटक आणि त्यांची इतिहासाच्या दृष्टिकोनातून मांडणी करण्यात आलेली आहे:

## ● किल्लेः

ऐतिहासिक कालखंड आणि किल्ले यांचे अतूट नाते एकमेकांशी जोडलेले आहेत. शत्रूपासून संरक्षण, शत्रूच्या हल्ल्याला प्रतिकार, लोकांचे, मालमत्तेचे आणि जीविताचे रक्षण इत्यादी उद्दिष्टे केवळ किल्ल्याद्वारेच साध्य होतात. त्यामुळे प्राचीन आणि मध्ययुगीन काळात किल्ल्यांना खूप महत्त्व होते. केवळ भारतातच नाही तर युरोप आणि अमेरिकेतही किल्ल्यांनी युद्धात विलक्षण भूमिका बजावली. मराठेशाहीचा इतिहास हा किल्ल्यांचा जय-पराजयाचा इतिहास आहे. भारतातील शासकांनी मैदानावर, नद्यांच्या काठावर, संगमावर, तसेच डोंगरमाथ्यावर किल्ले बांधले गेले. त्यांच्या स्थानानुसार त्यांचे भुईकोट किल्ले, डोंगरी किल्ले तसेच सागरी किल्ले असे वर्गीकरण केले जाते. मध्ययुगीन किल्ल्यांपैकी फारच कमी किल्ले आज चांगल्या स्थितीत आहेत, तर बहुतांश किल्ले भग्नावस्थेत, अवशेषांच्या स्वरूपात आहेत. तरीही त्यांची भव्यता, स्थापत्य, संरक्षण व्यवस्था, मोठे दरवाजे, भक्कम तटबंदी पर्यटकांच्या मनावर छाप पाडतात.भारतातील किल्ले हे येथील इतिहासाचे साक्षीदार आहेत. अशा या किल्ल्यांच्या अस्तित्वामुळे अनेक ऐतिहासिक स्थळे आता पर्यटन स्थळे बनलेली आहेत. आज भारतात अनेक किल्ल्यांना पर्यटन दृष्टिकोनातून महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यातील काही निवडक किल्ल्यांची माहिती पुढीलप्रमाणे,

### १. राजगड किल्ला (महाराष्ट्र)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पहिल्या राजधानीचे ठिकाण असलेल्या 'राजगड' किल्ल्याला मराठा इतिहासात विशेष स्थान आहे. हा किल्ला ट्रेकिंगसाठी प्रसिद्ध आणि इतिहासप्रेमींसाठी एक आकर्षक ठिकाण आहे. किल्ल्याच्या संरचनेत शिवकालीन युद्धकौशल्याचे दर्शन घडते.

### २. आग्रा किल्ला (उत्तर प्रदेश)

मुघल साम्राज्याच्या सामर्थ्याचे प्रतीक असलेला हा किल्ला, यूनेस्को जागतिक वारसा स्थळ आहे. ताजमहालाच्या जवळ असल्याने येणाऱ्या पर्यटकांसाठी एक प्रमुख आकर्षण आहे. या किल्ल्यात मुघल काळातील वास्तुशैली आणि सांस्कृतिक महत्त्व असलेली अनेक महत्त्वाची इमारती आहेत.

### ३. ग्वालियर किल्ला (मध्य प्रदेश)

अनेक राजवटींनी सत्तेचा केंद्रबिंदू असलेला हा किल्ला भारताच्या राजकीय इतिहासात महत्त्वपूर्ण आहे. किल्ल्यातील शिलालेख, जैन मूर्तिकला आणि दंतकथांमुळे हा किल्ला एक ऐतिहासिक आकर्षण आहे. ग्वालियरच्या राजवंशांच्या गौरवशाली इतिहासाचे दर्शन येथे घडते.

### ४. लाल किल्ला (दिल्ली)

मुघल साम्राज्याचे शाही मुख्यालय असलेला आणि भारतीय स्वातंत्र्याच्या क्षणांचा साक्षीदार असलेला लाल किल्ला भारताच्या राजकीय आणि ऐतिहासिक जीवनातील महत्त्वपूर्ण ठिकाण आहे. येथे दरवर्षी स्वातंत्र्यदिन साजरा केला जातो, आणि हजारो पर्यटक याला भेट देतात.

५. **चित्तोडगड किल्ला (राजस्थान)**

राजस्थानातील सर्वात मोठा किल्ला, चित्तोडगडच्या रजपूत राज्याच्या गौरवशाली इतिहासाचा साक्षीदार आहे. अनेक युद्धकथा, सतीचे किस्से, आणि रजपूत शौर्याचे प्रतीक म्हणून या किल्ल्याला भेट देणाऱ्या पर्यटकांचे आकर्षण आहे.

- **राजधान्या :**

भारतात प्रसिद्ध ऐतिहासिक पर्यटक स्थळांमध्ये त्या काळातील राजधान्यांचा प्रामुख्याने समावेश होतो. राज्याचा विस्तार जेवढा जास्त, प्रदेश जेवढा संपन्न तेवढा त्याच्या राजधानीचा विकास अधिक, लोकसंख्या जास्त, सांस्कृतिक व कला क्षेत्रात दबदबा अधिक असतो. अगदी प्राचीन काळापासून भारताच्या राजधानीचा दर्जा दिल्लीलाच मुख्यत्वे मिळाला आहे. महाभारत काळापासून, मुघलांपर्यंत आणि नंतरही ब्रिटिशकाळात तसेच स्वातंत्र्यानंतरही दिल्लीच राजधानी म्हणून स्थान अढळ राहिले. राजधान्यांची शहरे संपन्न, वैभवशाली असतात, राजांचे, सरदारांचे, सावकार व कलाकारांचे वास्तव्य राजधानीत असल्यामुळे त्यांचे भव्य प्रासाद राजधानीच्या वैभवात भर घालतात. ऐतिहासिक कालखंडातील अशी राजधान्यांची स्थाने शक्यतो किल्ल्यांची असत. कारण त्यामुळे सुरक्षा व संरक्षण मिळत असे. काळाच्या ओघात राज्ये नाहीशी झाली, राजधान्या ओस पडल्या. भारताच्या प्रसिद्ध ऐतिहासिक पर्यटक स्थळांमध्ये अनेक ठिकाणे आहेत जी त्या काळातील राजधान्या म्हणून ओळखल्या जात होत्या. या स्थळांनी भारताच्या सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक इतिहासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. राजधान्यांच्या या स्थळांचा वारसा आजही आकर्षणाचे केंद्र आहे, कारण या स्थळांवर प्राचीन राजवटींची वास्तुकला, संस्कृती आणि जीवनशैली यांचे दर्शन घडते. खाली काही महत्त्वाच्या ऐतिहासिक राजधान्यांचे पर्यटक स्थळांमध्ये महत्त्व वर्णन केले आहे:

१. **दिल्ली**

दिल्ली अनेक शतकांपासून भारताची राजधानी होती आणि मुघल साम्राज्याची प्रमुख राजधानी होती. लाल किल्ला, कुतुब मिनार, हुमायूँचा मकबरा, पुराणा किला आणि इंडिया गेट या ठिकाणांमुळे दिल्ली आजही ऐतिहासिक पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. दिल्ली भारताच्या प्राचीन, मुघल आणि ब्रिटीश काळातील इतिहासाचे महत्त्वाचे केंद्र आहे.

२. **कन्नौज (उत्तर प्रदेश)**

कन्नौज हे प्राचीन भारतातील हर्षवर्धन साम्राज्याचे प्रमुख केंद्र होते. प्राचीन भारतातील व्यापार, संस्कृती आणि धार्मिक केंद्र म्हणून कन्नौजचा इतिहास खूप महत्त्वाचा आहे. येथे प्राचीन किल्ले, मंदिरे आणि बाजारपेठा पर्यटकांसाठी आकर्षण आहेत.

३. **वाराणसी (काशी, उत्तर प्रदेश)**

वाराणसीला प्राचीन काशी राज्याची राजधानी मानले जाते आणि तसेच हिंदू धर्मातील सर्वात पवित्र शहर आहे. गंगा घाट, काशी विश्वनाथ मंदिर, सारनाथ येथील बुद्ध स्थळे यांमुळे वाराणसी हे धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून एक ऐतिहासिक ठिकाण आहे.

### ४. जयपूर (राजस्थान)

जयपूर ही राजपूतांच्या कछवाहा वंशाच्या राजांची राजधानी होती. आमेर किल्ला, हवा महल, सिटी पॅलेस आणि जंतर मंतर यामुळे जयपूरला 'पिंक सिटी' म्हणून ओळखले जाते. जयपूरचे शाही वास्तुकलेचे नमुने आणि सांस्कृतिक महत्त्व पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे.

### ५. उज्जैन (मध्य प्रदेश)

उज्जैन हे प्राचीन अवंती राज्याची राजधानी होते, आणि गुप्त साम्राज्यातही महत्त्वाचे ठिकाण होते. महाकालेश्वर मंदिर, कालीदेह पॅलेस, आणि कुंभमेळा येथे पर्यटनाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. उज्जैनला धार्मिक पर्यटनात विशेष स्थान आहे.

### ६. म्हैसूर (कर्नाटक)

म्हैसूर हे वाडियार राजांच्या साम्राज्याचे मुख्यालय होते. म्हैसूर पॅलेस, चामुंडी हिल्स, आणि श्रीरंगपट्टणम येथे असलेली टिपू सुलतानची राजधानी पाहण्यासारखी आहे. म्हैसूरच्या राजवाड्याच्या प्रकाशयोजनेचे पर्यटन महत्त्व आहे.

- **युद्ध स्थाने** (War grounds) :

'युद्धस्य कथा रम्य' असे म्हटले जाते. युद्ध जरी विध्वंसक असले, हजारो-लाखो लोक त्यामुळे जरी मृत्युमुखी पडत असले आणि प्रचंड प्रमाणात वित्तहानी होत असली तरी लोकांना त्याबद्दल नेहमीच प्रचंड कुतूहल असते. युद्धाच्या कथा नेहमीच आवडीने सांगितल्या व ऐकल्या जातात. जय-पराजय हे युद्धाचे दोन आविष्कार असले तरी जेत्याला नेहमीच अभिमान वाटतो तर पराजिताला अपमानाची खंत बोचत राहते आणि यातूनच पुन्हा दुसऱ्या युद्धाची नांदी होते. पहिल्या महायुद्धाचा (१९१०-१९१५) परिणाम म्हणूनच दुसरे महायुद्ध (१९३९-१९४५) झाले.

भारतातील प्रत्येक राज्यात अशी युद्धक्षेत्रे असतात. त्याच्या कटुगोड आठवणी जागविण्यासाठी पर्यटक येथे नेहमीच मोठ्या संख्येने येतात. भारताच्या इतिहासातील विविध युद्धस्थळे महत्त्वपूर्ण आहेत कारण ती राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक बदलांचे केंद्र ठरली. या युद्धस्थळांवर झालेल्या लढायांनी इतिहासाची दिशा ठरवली, ज्यामुळे ते आजही पर्यटकांच्या आकर्षणाचे ठिकाण आहेत. भारतातील काही प्रसिद्ध युद्धस्थळे आणि त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वाबद्दल खालीलप्रमाणे चर्चा केली आहे:

### १. कारगिल

भारतातील कारगिल या ठिकाणाला हाजारो पर्यटक येथे भेट देत असतात. कारण कारगिल या ठिकाणाला ''द वॉर लँड' म्हणून ओळखले जाते, येथे भारत आणि पाकिस्तान दरम्यान इ.स. १९९९ मध्ये झालेल्या कारगिल युद्धाच्या आठवणी आहेत.

### २. पानीपत (हरियाणा)

पानीपत हे ठिकाण तीन मोठ्या युद्धांसाठी प्रसिद्ध आहे. पहिले युद्ध इ.स. १५२६ मध्ये बाबर आणि इब्राहिम लोदी यांच्यात झाले, दुसरे युद्ध इ.स. १५५६ मध्ये अकबर आणि हेमचंद्र विक्रमादित्य (हेमू) यांच्यात, तर तिसरे युद्ध इ.स. १७६१ मध्ये अहमद शाह अब्दाली आणि मराठ्यांमध्ये झाले. यामुळे आजही येथील युद्धस्थळे आणि स्मारके इतिहासप्रेमींना आकर्षित करतात.

### ३. तलिकोटा (कर्नाटक)

तलिकोटाचे युद्ध (इ.स.१५६५) विजयनगर साम्राज्य आणि मुस्लिम सुलतानांमध्ये झाले होते.या युद्धामुळे विजयनगर साम्राज्याचा ऱ्हास झाला, जो मध्ययुगीन भारतातील एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. तलिकोटा येथील युद्ध स्थळ, विजयनगर साम्राज्याचे अवशेष आणि हम्पीचे ऐतिहासिक स्थळ पर्यटकांना विशेष आकर्षित करते.

### ४. कुरुक्षेत्र (हरियाणा)

महाभारताचे युद्ध (प्राचीन काळात) कुरुक्षेत्रात लढले गेले होते. हिंदू धर्मातील सर्वात महत्त्वाचे युद्ध, ज्यामध्ये धर्म, अधर्म आणि कर्म यांचे तत्त्वज्ञान स्पष्ट केले गेले. कुरुक्षेत्र येथे महाभारताशी संबंधित अनेक स्थळे आणि धार्मिक केंद्रे आहेत, ज्यामुळे हे ठिकाण धार्मिक आणि ऐतिहासिक पर्यटनासाठी महत्त्वाचे आहे.

### ५. हल्दीघाटी (राजस्थान)

हल्दीघाटीचे युद्ध (इ.स. १५७६) मेवाडच्या महाराणा प्रताप आणि मुघल सम्राट अकबराच्या सैन्यादरम्यान झाले होते. महाराणा प्रताप यांचे स्वातंत्र्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक असलेल्या या युद्धाने राजस्थानच्या इतिहासावर मोठा प्रभाव टाकला. हल्दीघाटीच्या युद्धस्थळाजवळ महाराणा प्रताप संग्रहालय आणि स्मारके आहेत, जी पर्यटकांना आकर्षित करतात.

## • समाधी/ जन्म आणि मृत्यू ठिकाण:

भारतामध्ये इतिहासाची साक्ष देणारे अनेक मोठमोठे राजे महापुरुष, तत्त्वेवेते, समाज सुधारक, यांची जन्म व मृत्यूचे आणि समाधी ठिकाणे पर्यटनासाठी खुली आहे. त्यांच्या इतिहासातील आठवणींना येथे भेटी दिल्यानंतर उजाळा मिळतो. भारतातील अनेक प्रसिद्ध व जुन्या समाधी आहेत. जे पर्यटकांच्या पसंतीत उतरलेल्या आहेत हजारे लोक ही समाधी ठिकाणे पाहण्यासाठी येतात. भारतातील ऐतिहासिक पर्यटक स्थळांमध्ये समाधी स्थळांना विशेष महत्त्व आहे, कारण या ठिकाणी महान नेत्यांचे, संतांचे आणि योद्ध्यांचे स्मरण केले जाते. या समाधी स्थळांनी भारतीय इतिहासात तसेच धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय महत्त्व प्राप्त केले आहे. येथे काही प्रमुख समाधी स्थळे दिली आहेत, जी ऐतिहासिक काळातील आणि आजही पर्यटकांना आकर्षित करतात.

### १. रायगड

रायगड किल्ला हे भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण ठिकाण आहे. या किल्ल्याचे मराठा साम्राज्याचे स्थापक 'छत्रपती शिवाजी महाराज' यांच्याशी असलेले ऐतिहासिक आणि सांस्कृतिक नाते हे त्याचे महत्त्व अधोरेखित करते. रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी आहे. या ठिकाणी जाण्याचा अर्थ त्यांच्या जीवनकार्याचा आदर करणे आहे. पर्यटक या समाधीला भेट देऊन त्यांच्याप्रती श्रद्धा व्यक्त करतात.

### २. ताजमहाल (आग्रा, उत्तर प्रदेश)

मुघल सम्राट शाहजहानने आपल्या पत्नी 'मुमताज' महलच्या स्मरणार्थ ताजमहालाची निर्मिती केली. हे जगातील सात आश्चर्यांपैकी एक आहे. ताजमहाल एक भव्य समाधीस्थळ असून त्याच्या सुंदर शिल्पकलेसाठी आणि स्थापत्यकलेसाठी प्रसिद्ध आहे. जगभरातून लाखो पर्यटक ताजमहाल बघण्यासाठी येतात.

### ३. गोल घुमट (विजापूर, कर्नाटक)

गोल घुमट विजापूरच्या आदिल शाही राजघराण्याचे एक उत्कृष्ट स्थापत्यशास्त्र आहे, आणि येथे सुलतान 'मुहम्मद आदिलशाह' यांची समाधी आहे. हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे घुमट म्हणून ओळखले जाते. गोल घुमटची ध्वनी प्रतिध्वनीची खासियत आणि विशाल घुमट यामुळे ते पर्यटकांचे आकर्षण आहे.

### ४. फतेहपुरी सीकरी (उत्तर प्रदेश)

'शेख सलीम चिश्ती' हे प्रसिद्ध सूफी संत होते, आणि मुघल सम्राट अकबराने त्याच्या पुत्र जन्मासाठी त्यांच्या आशीर्वादाची मागणी केली होती. त्यांच्या समाधीमुळे फतेहपुरी सीकरी हे महत्त्वाचे धार्मिक ठिकाण बनले. फतेहपुरी सीकरी हे युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांपैकी एक आहे, आणि येथे येणारे पर्यटक ऐतिहासिक स्थळांचे सौंदर्य आणि धार्मिक महत्त्व अनुभवतात.

### ५. बिबी का मकबरा (औरंगाबाद, महाराष्ट्र)

बिबी का मकबरा हे मुघल स्थापत्यकलेचे एक सुंदर उदाहरण आहे, जे औरंगजेबाने आपली पत्नी 'दिलरास बानू' बेगमच्या स्मरणार्थ बांधला आहे. हे ताजमहालाशी साधर्म्य राखणारे असल्यामुळे ''दखखनचा ताजमहाल'' म्हणून ओळखले जाते. या स्थळाला भेट देणारे पर्यटक या मकबऱ्याच्या स्थापत्यकलेमुळे आकर्षित होतात.

## • स्मारके

भारतीय इतिहासात प्राचीन, मध्ययुगीन आणि ब्रिटिश काळात अनेक शूरवीर आपल्या कार्याच्या माध्याममातून इतिहासात अजरामर झाले. त्यांच्या कार्य कर्तुत्वाला उजाळा देण्यासाठी अनेक ठिकाणी स्मारकांची निर्मिती केलेली आहे. या वारशाचे प्रतीक म्हणजे विविध स्मारके आणि स्थळे जी देशाच्या

भूतकाळाच्या विविध कालखंडातील वास्तुकलेची, संस्कृतीची, आणि इतिहासाची साक्ष देतात. या स्मारकांना विविध भागातील पर्यटक येऊन भेटी देतात व त्यांचा इतिहास जाणून घेतात. त्यामुळे त्या ठिकाणांना पर्यटन दृष्ट्या महत्त्व प्राप्त झालेले आहे.

खालीलप्रमाणे भारतातील काही प्रसिद्ध ऐतिहासिक स्मारके आणि त्यांचे पर्यटनातील महत्त्व आधोरेखित केले आहे,

**१. जालियनवाला बाग**

जालियनवाला बाग हत्याकांड १३ एप्रिल १९१९ रोजी घडलेली घटना, ब्रिटिश सैन्याने 'जालियनवाला बाग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोकळ्या जागेत नि:शस्त्र भारतीयांच्या मोठ्या जमावावर गोळीबार केला. आज जालियनवाला बाग हे ऐतिहासिक ठिकाण आहे आणि पर्यटक मोठ्या संख्येने त्याला भेट देतात.

**२. इंडिया गेट (दिल्ली)**

इ.स. १९३१ मध्ये 'इंडिया गेट' हे पहिल्या महायुद्धात शहीद झालेल्या भारतीय सैनिकांच्या स्मरणार्थ बांधलेले स्मारक आहे. याची तुलना पॅरिसच्या आर्क दे त्रायोम्फ बरोबर केली जाते. इंडिया गेट हे दिल्लीतील प्रमुख पर्यटन स्थळ आहे, जे पर्यटकांना इतिहासाची आणि शहीद सैनिकांच्या बलिदानाची आठवण करून देते.

**३. सांचीचे स्तूप (मध्य प्रदेश)**

'सांचीचे स्तूप' हे सम्राट अशोकाने बुद्धाच्या स्मरणार्थ बांधलेले आहे. हे भारतातील सर्वात जुने आणि महत्त्वाचे बौद्ध स्मारक आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट असलेले सांचीचे स्तूप बौद्ध स्थापत्यकलेचे एक उत्कृष्ट नमुना आहे आणि देशभरातून बौद्ध धर्मीय आणि पर्यटक यांना आकर्षित करतो.

**४. कुतुब मिनार (दिल्ली)**

'कुतुब मिनार' हे दिल्ली सल्तनतीच्या स्थापनेचे प्रतीक आहे आणि भारतातील सर्वात उंच मीनार आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट असलेले हे एक ऐतिहासिक आणि स्थापत्यकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. कुतुब मिनारचा भव्य आकार, लाल वाळूच्या दगडाची रचना, आणि आसपास असलेल्या इतर स्मारकांमुळे पर्यटक आकर्षित होतात.

**५. चारमीनार (हैदराबाद, तेलंगणा)**

हैदराबाद शहराचे प्रतीक असलेले चारमीनार कुतुबशाही 'सुलतान मोहम्मद कुली कुतुबशाह' यांनी प्लेगच्या साथीच्या समाप्तीच्या स्मरणार्थ बांधले होते. चारमीनारच्या आसपासच्या बाजारपेठा, मुघल स्थापत्यकला, आणि इस्लामिक शिल्पकलेचा नमुना पाहण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी असते.

## ● वस्तुसंग्रहालय

वस्तुसंग्रहालयास मानवी जीवनात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व पर्यटनाच्या दृष्टीने अन्यनसाधारण महत्त्व आहे. वस्तुसंग्रहालय ही काळ व वेळ या दोन संस्कृतींना जोडणारा आणि वर्तमानाला दिशा देणारे संस्था म्हणून ओळखले जाते.वस्तूसंग्रहालय ही एक प्रकारे समाजाचा आरसा आहे यामध्ये मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचा उल्लेख प्राप्त होतो. यामुळे वस्तूसंग्रहालय ही भावी पिढीला दीपस्तंभ प्रमाणे मार्गदर्शन करणारी एक संस्था म्हणून ओळखली जाते. आपल्या पूर्वजांचा ठेवा वस्तुसंग्रहालयाच्या माध्यामातून जतन करून प्रदर्शित केला जातो. संग्रहालयातील वस्तूंच्या माध्यमातून विविध कालखंडातील माहिती प्राप्त होते. संग्रहालये पर्यटकांना भारतीय इतिहास आणि सांस्कृतिक वारसा समजून घेण्यासाठी एक अमूल्य साधन आहेत. यामुळे पर्यटक या ठिकाणांच्या कडे आकर्षित होतात. खालीलप्रमाणे भारतातील काही प्रसिद्ध वस्तुसंग्रहालयांची माहिती दिली आहे:

### १. भारतीय राष्ट्रीय संग्रहालय (नॅशनल म्युझियम), दिल्ली

'भारतीय राष्ट्रीय संग्रहालय' हे भारतातील सर्वात मोठे आणि प्रमुख संग्रहालय आहे. येथे प्राचीन ते आधुनिक काळातील विविध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वस्तूंचा समृद्ध संग्रह आहे. संग्रहालयात हडप्पा संस्कृती, मुघल काळातील शिल्पकला, भारतीय लघुचित्रे, हस्तकला, आणि इतर ऐतिहासिक वस्तूंचे प्रदर्शन आहे. पर्यटकांना इथे प्राचीन भारताच्या विविध कालखंडांतील इतिहासाची झलक मिळते.

### २. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (प्रिंस ऑफ वेल्स म्युझियम), मुंबई

'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' हे मुंबईतील एक प्रसिद्ध संग्रहालय आहे, जे भारताच्या ऐतिहासिक, पुरातात्त्विक आणि कलात्मक वारशाचे जतन करते. येथे भारतीय शिल्पकला, मध्ययुगीन वस्त्रकला, प्राचीन हिंदू आणि बौद्ध शिल्पे, आणि इतर ऐतिहासिक वस्त्रसंग्रह पाहायला मिळतो. तसेच, प्राचीन अस्त्रे-शस्त्रांची गॅलरी आणि मुघल चित्रकला इथे पाहता येते.

### ३. सालारजंग संग्रहालय, हैदराबाद

'सालारजंग संग्रहालय' हे भारतातील सर्वात मोठ्या खासगी संग्रहालयांपैकी एक आहे, ज्यामध्ये सालारजंग कुटुंबाचे प्रचंड वैयक्तिक कलावस्त्र संग्रह आहे. येथे युरोपियन, मुघल, आणि भारतीय कला यांचा एकत्रित संग्रह आहे. या संग्रहालयात विविध प्रकारच्या वस्त्रकला, शिल्पकला, चित्रकला, आणि प्राचीन हस्तकलेचा सुंदर संग्रह पाहता येतो.

### ४. आर्मी हेरिटेज म्युझियम, दार्जिलिंग

भारतीय सैन्याचा इतिहास आणि पराक्रम दाखवणारे हे संग्रहालय भारतीय सैन्याच्या विविध रणांगणातील शौर्यगाथांचे दर्शन घडवते. संग्रहालयात भारतीय सैन्याचे शस्त्रास्त्र, रणांगणातील पोशाख, आणि ऐतिहासिक दस्तऐवजांचे प्रदर्शन आहे. युद्धप्रेमी आणि इतिहासप्रेमींसाठी हे एक प्रमुख ठिकाण आहे.

५. **ग्वाल्हेर किल्ला संग्रहालय, मध्य प्रदेश**

ग्वाल्हेर किल्ला हा एक प्राचीन किल्ला असून, येथे ग्वाल्हेरच्या शासकांचे आणि तोमर घराण्याचे वैयक्तिक वस्त्रकलेचा संग्रह आहे. येथे तोमर शस्त्रसंग्रह, मूर्ती, आणि विविध ऐतिहासिक दस्तऐवज पाहता येतात. किल्ल्याच्या स्थापत्यशास्त्राचे आणि ऐतिहासिक वस्त्रांचे प्रदर्शन पर्यटकांसाठी आकर्षण आहे.

- **लेणी**

लेणी म्हणजे डोंगर, टेकडी, पर्व, खडक कोरून तयार केलेल्या गुहा होय. ज्यांच्या उपयोग संन्यासी, भिक्खूंना तपस्या, साधना करणे अथवा विश्रांती घेणे ह्यासाठी केला जाई. भारतामध्ये अनेक ठिकाणी डोंगरदऱ्या खोदून प्राचीन कालखंडात लेणी निर्माण केली आहे. कलावंतांनी आपले कौशल्य वापरून असंख्य अशा सुंदर लेणी निर्माण केली आहे. या लेणींमध्ये धार्मिक, सांस्कृतिक आणि कलात्मक दृष्टीने महत्त्वाच्या वास्तू आणि शिल्पे आहेत. प्राचीन काळातील बौद्ध, हिंदू, आणि जैन धर्माच्या अनुयायांनी या लेणींचे निर्माण केले, आणि त्यामध्ये शिल्पकलेचे अप्रतिम नमुने आहेत. या लेण्याच्या माध्यमातून तेथे कोरलेल्या लेखांवरून भारताच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीवर प्रकाश पडतो. लेण्यांतील अनेक लेखांत तत्कालीन राजे व त्यांच्या कारकीर्दी यांचे उल्लेख आहेत. त्यांवरून राजकीय घडामोडी आणि तत्कालीन आर्थिक स्थिती यांची कल्पना येते.यामुळे इतिहास अभ्यासक तसेच पर्यटक येथे भेटी देण्यासाठी येतात.

१. **अजंठा लेणी (महाराष्ट्र)**

अजंठा लेणींमध्ये बौद्ध धर्माशी संबंधित चित्रकला आणि शिल्पकला आहे. लेणींमध्ये भगवान बुद्धाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे भित्तीचित्र रूपात दर्शन आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट असलेल्या या लेण्यांमध्ये शिल्पकला आणि भित्तीचित्रे आहेत, जी जगभरातील पर्यटक आणि इतिहासप्रेमींना आकर्षित करतात. येथील शिल्पकलेची आणि चित्रकलेची बारकाई पर्यटकांना मंत्रमुग्ध करते.

२. **वेरूळ लेणी (महाराष्ट्र)**

वेरूळ लेणी ही बौद्ध, हिंदू आणि जैन धर्माच्या अनुयायांनी निर्माण केली आहेत. यातील सर्वात प्रसिद्ध म्हणजे कैलाश मंदिर, ज्याचे पूर्णतः दगडातून खोदलेले शिल्प आहे. या लेण्यांमध्ये हिंदू पुराणांवरील शिल्पकला, भगवान बुद्धाच्या प्रतिमा, आणि जैन तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत. विशेषतः कैलाश मंदिरातील शिल्पकलेचा भव्य नमुना पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात येथे येतात.

३. **एलीफंटा लेणी (महाराष्ट्र)**

मुंबईच्या जवळ असलेल्या एलीफंटा बेटावर ह्या लेणी आहेत. येथे शंकर भगवानाच्या विविध रूपांची मूर्ती शिल्पे आहेत. यातील सर्वात प्रसिद्ध शिल्प म्हणजे त्रिमूर्ती शंकराच्या तीन रूपांचे भव्य शिल्प आहेत. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट असलेल्या या लेण्यांमध्ये शिवलिंग, शिल्पकला आणि त्रिमूर्ती पाहण्यासाठी जगभरातून पर्यटक येतात.

४. **उदयगिरी लेणी (मध्य प्रदेश)**

उदयगिरी लेणी गुप्त काळातील आहेत आणि येथे हिंदू धर्माच्या विविध देवी-देवतांची शिल्पे आहेत. विष्णूच्या वराह अवताराचे शिल्प हे या लेण्यांचे प्रमुख आकर्षण आहे. उदयगिरीच्या लेण्यांमध्ये असलेली प्राचीन हिंदू शिल्पकला आणि देवतांच्या मूर्ती पाहण्यासाठी पर्यटक येतात. येथे गुप्त काळातील स्थापत्यकलेचे दर्शन होते.

५. **अमरावती लेणी (आंध्र प्रदेश)**

अमरावती लेणी बौद्ध धर्माच्या महायान संप्रदायाशी संबंधित आहेत. या लेण्यांमध्ये बुद्धाच्या जीवनातील प्रसंगांवर आधारित शिल्पकला आहे. येथील शिल्पकला आणि शिल्पातील बारकाई पाहण्यासाठी पर्यटक येतात. अमरावती स्तूप हा बौद्ध धर्मातील प्रमुख तीर्थक्षेत्र आहे.

- **प्राचीन गुहा**

भारताच्या प्राचीन ऐतिहासिक वारशाचा एक अनमोल खजिना म्हणजे गुहा, ज्यांमध्ये असलेल्या भित्तिचित्रांमुळे त्या गुहांना विशेष ओळख मिळाली आहे. या गुहा भारतातील प्राचीन भित्तिचित्रकलेचा उत्कृष्ट नमुना आहेत. या भित्तिचित्रांमधून प्राचीन मानवाचे जीवन, त्यांची श्रद्धा, धार्मिक विधी, आणि सांस्कृतिक घटक यांचे चित्रण केलेले आहे. हे चित्रण त्या काळातील जीवनशैलीचे आणि कलेचे ऐतिहासिक दस्तऐवज आहेत, जे आजही इतिहास प्रेमी आणि संशोधकांसाठी महत्त्वाचे आहेत.खाली भारतातील काही प्रमुख गुहांचे उल्लेख आहे, ज्या त्यांच्या भित्तिचित्रांसाठी प्रसिद्ध आहेत:

१. **आदमगढ गुहा (मध्य प्रदेश)**

आदमगढ येथे आढळलेली चित्रे प्राचीन काळातील शिकारी जीवनशैलीचे चित्रण केले आहे. येथे शिकारी, प्राणी, आणि मानवांच्या विविध कृतींचे रंगीत चित्रण आढळते.

२. **चक्रधरपूर (झारखंड)**

चक्रधरपूरमधील गुहांमध्ये आदिमानवाच्या जीवनशैलीचे आणि त्यांच्या धार्मिक श्रद्धांचे चित्रण आढळते. येथे मोठ्या प्रमाणात भित्तिचित्रे आहेत, जी प्राचीन मानवांनी तयार केलेली आहेत.

३. **पंचमढी गुहा (मध्य प्रदेश)**

'पंचमढीमधील गुहा' त्यांच्या भित्तिचित्रांसाठी प्रसिद्ध आहेत. येथे प्राचीन धार्मिक विधी, मानवाचे नृत्य, आणि प्राण्यांचे चित्रण केलेले आहे.

४. **हुशंगाबाद (मध्य प्रदेश)**

'हुशंगाबाद येथील गुहा' प्राचीन काळातील शिकारी जीवनाचे आणि मानवाच्या धार्मिक विधींचे चित्रण करणाऱ्या भित्तिचित्रांसाठी ओळखली जाते. तसेच मानव आणि प्राण्यांचे रंगीत चित्रण केले आहे.

**५. पंचमढी गुहा (मध्य प्रदेश)**

'पंचमढीमधील गुहा' त्यांच्या भित्तिचित्रांसाठी प्रसिद्ध आहेत. येथे प्राचीन धार्मिक विधी, मानवाचे नृत्य, आणि प्राण्यांचे चित्रण केलेले आहे

## ● मंदिर वास्तुशिल्पे

भारतातील ऐतिहासिक मंदिरे त्यांच्या अद्वितीय वास्तूकला, शिल्पकला, आणि धार्मिक महत्वासाठी ओळखली जातात. विविध काळातील शिल्पकलेच्या उदाहरणांद्वारे, भारताच्या संस्कृतीचा आणि धार्मिक वारसाचा समृद्ध इतिहास दर्शवतात. भारताच्या वास्तु शिल्पांच्या भव्यतेमुळे आणि धार्मिक महत्त्वामुळे जगभरातील पर्यटकांना ही मंदिरे आकर्षित करतात. या मंदिरांमध्ये असलेल्या शिल्पकलेचे अध्ययन केल्यास, भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान, आणि धार्मिक आस्थांचा एक अद्भुत अनुभव मिळतो.खाली भारतातील काही प्रसिद्ध ऐतिहासिक मंदिरांचे उल्लेख केले आहेत:

**१. खजुराहोचे मंदिर (मध्य प्रदेश)**

'खजुराहोचे मंदिरे' त्यांच्या भव्य कामुक शिल्पकलेसाठी प्रसिद्ध आहेत. येथे विविध देवतांच्या मूळ आणि मानवाकृतींची भव्य शिल्पे आहेत. खजुराहोच्या मंदिरांचा समूह युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट आहे आणि भारतीय शिल्पकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

**२. स्वर्ण मंदिर (अमृतसर, पंजाब)**

'स्वर्ण मंदिर' किंवा 'हरिमंदिर साहिब' हे गोल्डन गुम्बज आणि भव्य स्थापत्यकलेसाठी प्रसिद्ध आहे. या मंदिरात बारीक काम केलेले आहे. हे सिख धर्माचे प्रमुख तीर्थ स्थळ आहे आणि येथील शांतता आणि सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करते.

**३. राजराजेश्वर मंदिर (तंजावूर, तामिळनाडू)**

'राजराजेश्वर मंदिर' चोल वास्तुकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे, ज्यामध्ये भव्य शिखर आणि विस्तृत शिल्पे आहेत. राजराजेश्वर मंदिर युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट आहे आणि भारतीय स्थापत्यकलेचे एक महत्त्वाचे ठिकाण आहे.

**४. सूर्य मंदिर (कोणार्क, ओडिशा)**

'सूर्य मंदिर' एक भव्य रथासारखा आकारलेला आहे, ज्यामध्ये काष्ठकलेच्या अद्भुत नमुन्यांचे प्रदर्शन आहे. हे सूर्य मंदिर सूर्य देवतेस समर्पित आहे आणि युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट आहे.

**५. जैन मंदिर (रणकपुर, राजस्थान)**

रणकपुर येथील 'जैन मंदिर' अत्यंत सुशोभित आहे, जिथे विविध शिल्पे आणि स्तंभ आहेत. या मंदिरात जैन धर्माच्या तत्त्वज्ञानाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शिल्पांची अद्भुतता आहे.

ऐतिहासिक स्थाने केवळ भूतकाळाचा इतिहास सांगत नाहीत, तर त्या वर्तमानातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पर्यटनाच्या माध्यमातून ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व अधोरेखित होते, ज्यामुळे स्थानिक संस्कृतीचा आदानप्रदान आणि आर्थिक विकास होतो. त्यामुळे ऐतिहासिक स्थळांचे संरक्षण आणि जतन करणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यातील पिढ्या त्यांचा अनुभव घेऊ शकतील.

**स्वाध्याय**

**प्रश्न ब. रिकाम्या जागा भरा.**

१. छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले राजधानीचे ठिकाण असलेल्या ............ किल्ल्याला ओळखले जाते.

२. राजस्थानातील सर्वात मोठा किल्ला, चित्तोडगड ............ राज्याच्या गौरवशाली इतिहासाचा साक्षीदार आहे.

३. ............ अनेक शतकांपासून भारताची राजधानी होती आणि मुघल साम्राज्याची प्रमुख राजधानी होती.

४. वाराणसीला प्राचीन ............राज्याची राजधानी मानले जाते.

५. ............हे वाडियार राजांच्या साम्राज्याचे मुख्यालय होते.

### १.२.३ भारतातील पर्यटनाचा इतिहास (Brief history of tourism in India)

भारताला प्रदीर्घ अशी ऐतिहासिक सांस्कृतिक व धार्मिक परंपरा लाभली आहे. प्राचीन भारतीय संस्कृती ही जगातील एक प्रगत संस्कृती समजली जाते. या देशात हिंदू, मुस्लिम, जैन, बौद्ध आणि ख्रिश्चन धर्मियांमुळे एक वेगळी व सर्वसमावेशक संस्कृती निर्माण झाली आहे. यातून या देशाला एक संपन्न व्यक्तीमत्व लाभलेले आहे. देशात आज शेकडो धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळे पर्यटन केंद्रे म्हणून प्रसिद्ध आहेत. भारताचा व्यापक विस्तार, विविध क्षेत्रातील वेगळेपण यामुळे जगातील प्रत्येक पर्यटकाला काहीना काही देण्याची क्षमता या देशात आहे. येथील शेकडो धार्मिक, पवित्र स्थळे, प्राचीन ऐतिहासिक वास्तूंचे सौंदर्य जगभरातील पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करतात. तसेच या देशाच्या इतिहासाने पर्यटन क्षेत्राच्या विकासावर आपला ठसा उमटविला आहे. त्यामुळेच पंडित नेहरुंनी आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात म्हटले आहे की, 'पूर्वी येथे असे लोक होऊन गेले की, त्यांना जीवन म्हणजे काय ते कळलेले होते. त्यांनी त्यांच्या विद्वतेने या देशाचा सांस्कृतिक इतिहास घडविला, तो हजारो वर्ष जिवंत आहे.'

### प्राचीन कालखंडातील पर्यटन

भारतीय पर्यटनाचा इतिहास पाहता प्राचीन काळापासून 'प्रवास' हा येथील मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. सुरुवातीच्या काळामध्ये आजच्या आधुनिक युगातील पर्यटनासारखे कोणतेही स्वरुप

नव्हते. प्राचीन काळामध्ये भारतात विविध उद्देशाने पर्यटन केले जात असे. यामध्ये प्रामुख्याने पुढील उद्देशांचा समावेश पर्यटनामध्ये होता.

**धार्मिक उद्देश**

भारत हा अनेक धर्मांची जननी आहे.प्राचीन काळात भारतामध्ये हिंदू, बौद्ध, जैन या प्रमुख धर्माचा उदय व विकास झाला. काही धर्माचा जगात इतर भागात प्रसार झाला. यातूनच भारतामध्ये धार्मिक पर्यटनास चालना मिळाली. धार्मिक ठिकाणी भेटी दिल्याने शांती व पापातून मुक्ती मिळते अशी भावना येथील लोकांमध्ये होती. हिंदूच्या प्राचीन ग्रंथात असे नमूद केले आहे की, 'देशातील चारधाम यात्रा केल्याशिवाय मनुष्याला मुक्ती मिळत नाही.' या धार्मिक भावनेतून जगन्नाथपुरी, रामेश्वर, द्वारका व बद्रिनाथ ही धार्मिक स्थळे विकसित झाली. यामुळे येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक भेटी देत होते. तसेच कांचीमधील एकाश्मेश्वर, श्रीरंगमध्ये जम्बुकेश्वर, तंजावरचे ब्रहद्दीश्वर मंदिर, चोल मंदिर, एहोळचे कैलासनाथ मंदिर, काशी ही हिंदूंची धार्मिक स्थळे विकसित झाली होती. हिंदू धर्माप्रमाणे भारतामध्ये बौद्ध धर्माचा उदय व विकास झाला. बौद्ध धर्म संस्थापक 'गौतम बुद्ध' यांच्या साध्या व सोप्या धार्मिक उपदेशामुळे या धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. या धर्मास राजाश्रय मिळाल्यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार स्वदेशी व विदेशामध्ये झाला. यामध्ये प्रामुख्याने चीन या देशात प्रसार झाला. चीनमधून कोरीया, मंगोलिया, जपान आणि तिबेट या देशात बौद्ध धर्माचा विस्तार झाला. सम्राट अशोक, ग्रीक सम्राट मिनान्दर, सम्राट कनिष्कामुळे मध्य आशियात सर्वत्र बौद्ध धर्माचा प्रसार झाला. बौद्ध धर्माच्या विस्तारामुळे बौद्ध धर्मिय लोक भारतामध्ये येऊन येथील पवित्र बौद्ध स्थळांना भेटी देत होते. यामध्ये लुम्बिनी हे गौतम बुद्धांचे जन्म स्थान, गया येथे बुद्धांना ज्ञानप्राप्ती व कुशिनगर येथे गौतम बुद्धांचे निर्वाण या धार्मिक स्थळांना बौद्ध पर्यटक भेट देत होते.सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी 'धर्मयात्रा' सुरु केल्या. तसेच भारतामध्ये जैन धर्माचा उदय व विकास झाला. भारतातील काही राजांनी जैन धर्माला राजाश्रय देऊन जैन मंदिरे बांधली. यामध्ये अबू पर्वतावरील जैन मंदिर व कर्नाटकातील श्रवणबेळगोळ हे प्रसिद्ध धार्मिक स्थळ होते. या सर्वातूनच धार्मिक पर्यटनाला चालना मिळाली. या काळात हिंदू, बौद्ध, जैन या धर्मांना राजाश्रय मिळाला. यामुळे येथे धार्मिक दृष्टिकोनातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली.

**व्यापारी उद्देश**

प्राचीन काळी भारतामध्ये पर्यटनाचा एक प्रमुख उद्देश म्हणजे व्यापार. भारत हा समृद्ध व सर्व संपन्न असणारा देश म्हणून ओळख होती. म्हणून प्राचीन काळात भारत हा व्यापार व वाणिज्यामध्ये जगात प्रसिद्ध होता. या काळात हडप्पा, मोहंजोदडो, तक्षशिला, उज्जैन, प्रतिष्ठान, वैशाली, पाटलीपुत्र, चंपा, बनारस, श्रीवस्ती,तगर ही शहरे व्यापारासाठी प्रसिद्ध होती. तसेच रोरुक, मृगकच्छक, कल्याण, सोपरा, नीलकंठ, कावेरीपटण, मच्छीलपट्टण, ताम्रलिती इ. प्रसिद्ध बंदरे होती. या शहरांमध्ये व बंदरात परदेशी व देशी व्यापारी व्यापार करण्याकरिता येत असत. समुद्रमार्गाने चीन, ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा, बॅबिलोन, इराण, रोम येथून व्यापारी भारतामध्ये व्यापार करण्यासाठी येत होते. अशाप्रकारे जगातील विविध देशातील व्यापारी

भारतामध्ये व्यापारासाठी येत होते. यातूनच पुढील काळात व्यापारी उद्देशाने येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण भारतामध्ये वाढले.

**शैक्षणिक उद्देश**

प्राचीन काळात भारतामध्ये शैक्षणिक विकासमुळे पर्यटनाचा मिळाली. वेद, पुराण, धर्मग्रंथ, हिंदू संस्कृती, तसेच बौद्ध व जैन साहित्याचा अभ्यास विविध विद्यापीठामध्ये होत असे. हा अभ्यासक्रम आत्मसात करण्यासाठी तसेच भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी देश-विदेशातून अभ्यासक भारतामध्ये येत होते. भारतामध्ये या काळात अनेक विद्यापीठे होती.यामध्ये इ.स.पू. ४ शतकातील 'तक्षशिला' हे प्रसिद्ध विद्यापीठ होते. या विद्यापीठामध्ये अनेक विद्यार्थी व अभ्यासक उच्च अध्ययनाकरिता देश विदेशातून येत होते. तक्षशिला शिवाय 'नालंदा' हे प्राचीन भारतातील प्रसिद्ध विद्यापीठ होते. या विद्यापीठाखेरीज गुजरातमधील 'वल्लभ', बिहार येथील 'विक्रमशील', 'कांचीपुरा', 'श्रीपर्वत' या विद्यापीठामध्ये अभ्यासक शिक्षणासाठी येत होते. याशिवाय विद्यार्थी राजकुमार अभ्यासपूर्ण झाल्यानंतर देश व विदेशी प्रवास करुन तेथील रीतीरिवाज जाणून घेण्यासाठी पर्यटन करत होते.अशा प्रकारे प्राचीन भारतामध्ये शैक्षणिक दृष्ट्या येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण जास्त होते. शैक्षणिक केंद्राना राजाश्रय मिळाल्यामुळे ही सर्व ठिकाणे पर्यटनदृष्ट्या विकसित झाली होती.

**परिषदा व पर्यटन**

पर्यटनामध्ये परिषद चर्चासत्र यांना महत्त्वाचे स्थान आहे. या परिषदामधून निरनिराळ्या भागात पर्यटक मोठ्या प्रमाणात हजर राहून आपल्या विचारांची देवाणघेवाण करतात. प्राचीन काळामध्ये भारतात विविध परिषदा भरल्या होत्या. या परिषदामध्ये विविध भागातील पर्यटक आले होते. यामध्ये बौद्ध धर्माच्या चार महत्त्वाच्या परिषदा झाल्या होत्या. गौतम बुद्धाच्या निर्वानानंतर इ.स.पू. ४८३ मध्ये 'महाकश्यप' याच्या अध्यक्षतेखाली राजगृह येथे पहिली बौद्ध परिषद भरली होती. या परिषदेत ५०० भिक्षुकांनी भाग घेतला होता.दुसरी परिषद इ.स.पू. ३८५ मध्ये वैशालीचा राजा 'कालाशोक' याने आयोजित केली होती. या परिषदेला ७०० पेक्षा जास्त भिक्षुकांनी भाग घेतला.बौद्ध धर्माची तिसरी परिषद सम्राट अशोकाने 'मोगली पुत्रतिस्स' याच्या अध्यक्षतेखाली पाटलीपुत्र या ठिकाणी आयोजित केली होती. या परिषदेस १००० भिक्षुक हजर होते. चौथी परिषद वसुमित्राच्या अध्यक्षतेखाली काश्मिर सम्राट कनिष्काने भरविली होती. या परिषदेला ५०० पेक्षा जास्त भिक्षुक आले होते.

बौद्ध धर्माप्रमाणे जैनधर्माच्या परिषदा प्राचीन काळामध्ये भरल्या होत्या. यामध्ये इ.स. ३१३ मध्ये पहिली धर्मसभा मथुरा येथे भरली. दुसरी सभा इ.स. ५१२ मध्ये वल्लभी येथे भरली. या परिषदामध्ये मोठ्या प्रमाणात धार्मिक अनुयायांनी सहभाग घेतला होता व आपल्या विचारांची देवाणघेवाण केली. बौद्ध व जैन परिषदाबरोबर इ.स. ६४३ मध्ये हर्षवर्धनने चीनी पर्यटक 'हयू-एन-त्सँग' यांच्या सन्मानार्थ कनौज येथे धर्मपरिषद आयोजित केली होती. या परिषदेत विविध देशातील राजे उपस्थित होते. तसेच नालंदा विद्यापीठातील १००० बौद्ध विद्वान व ३००० बौद्ध भिक्षुक या परिषदेत उपस्थित होते. ही परिषद २३ दिवस

सुरु होती. याशिवाय हर्षवर्धनने गंगा-यमुनेच्या तीरावर प्रयाग येथे एक धर्मसभा भरविली. या सभेत १८ राजे व पाच लाख नागरिक उपस्थित होते. ८ व्या शतकाच्या मध्यावर तामिळ कवींची 'संगम' आयेजित केली होती. या संगमांना १९७ पांड्य राजांनी मदत केली होती. ही संगम बरीच वर्षे सुरु होती. या संगामाना मोठ्या प्रमाणात कवी पर्यटक उपस्थित राहत होते.अशाप्रकारे प्राचीन काळात सभा व परिषदामधून मोठ्या प्रमाणात विद्वान व सामान्य लोकांनी सहभाग घेतला यातूनच हळूहळू पर्यटनाच्या कक्षा रुंदावत गेल्या.

**पर्यटकांना निवास व मार्गदर्शन सुविधा**

प्राचीन काळामध्ये भारतामध्ये व्यापाऱ्याच्या तसेच धार्मिक व शैक्षणिक उद्देशाने प्रवास करणारे पर्यटक मोठ्या प्रमाणात होते. या पर्यटकांना राहण्याची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी विविध ठिकाणी 'धर्मशाळा' बांधण्यात आल्या होत्या. या धर्मशाळा पर्यटकांच्या सोईसाठी असल्याने तेथे माफक दरात किंवा मोफत राहण्याची सुविधा उपलब्ध होती. धर्मशाळेचा व्यवस्थापक प्रामाणिक असे.हा व्यवस्थापक त्या भागाचे महत्त्व, पर्यावरणातील बदल व धार्मिक माहिती पर्यटकांना सांगत होता. मौर्य काळामध्ये पर्यटकांना मोठ्या प्रमाणात सार्वजनिक सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या होत्या. यामध्ये प्रत्येक आठ कोसावर रस्त्याच्या बाजूस पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी व धर्मशाळा बांधल्या होत्या. पर्यटकांच्या सोयीसाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूस आंब्याची व केळीची वने तयार केली होती. पशुपक्षी व माणसांसाठी सार्वज़निक दवाखाने सुरु केले होते. शहरामध्ये धर्मशाळेत राहणाऱ्या प्रवाशांची नोंद शहरातील अधिकाऱ्याला कळवली जात होती.

प्रवास करताना पर्यटकांना वाट चुकण्याची तसेच चोर, दरोडेखोर यांची भिती वाटत असे. यामुळे प्रवास करताना धाडसी व अनुभवी मार्गदर्शकाची (वाटाड्या) मदत घ्यावी लागत होती. या मार्गदर्शकाना त्या भागातील माहिती व येणाऱ्या संकटाशी मार्ग काढण्याचे ज्ञान होते. अनुभवी मार्गदर्शकामुळे पर्यटकांचा प्रवास सुखकर होण्यास मदत होत असे. शहरामध्ये प्रवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी व इतर नैसर्गिक आपत्तीपासून दूर ठेवण्यासाठी 'अंतपालांची' नेमणूक केली जात होती. याकरिता जो खर्च येत असे तो व्यापाऱ्यांच्या जकातीपासून मिळवली जात होता.त्याचबरोबर रस्त्यांची दुरुस्ती करणे, जंगली जनावरे व चोर-डाकू यांच्यापासून व्यापारांचे संरक्षण करणे यासारखी जबाबदारी विवीताध्यक्षाकडे सोपविली होती. मौर्यकाळात परकीय पर्यटकांची व्यवस्था करण्यासाठी स्वतंत्र खात्याची निर्मिती केली होती. या खात्यामार्फत त्याच्या राहण्याची, प्रवासाची आणि वैद्यकिय मदतीची योग्य तरतूद केली होती. मरण पावलेल्या परकीय पर्यटकांचे अंत्यविधी त्याच्या धर्माप्रमाणे करुन त्यांची मालमत्ता वारसदारांकडे पाठविली जात असे.

प्राचीन काळामध्ये परदेशी व देशी पर्यटकांच्याकडे राजाच्या परवानगीची 'मुद्रा' असणे गरजेचे होते. जो व्यक्ती मुद्रा न घेता प्रवास करीत असे. अशा देशी व्यक्तींना १२ पणाचा दंड होता.तर परदेशी व्यक्तीस ५०० पासून ते १००० पणाचा दंड आकारला जात असे. ज्या प्रवाशांना मध्यमार्गातून जावे लागत असे त्यांना 'मुद्राध्यक्ष' या अधिकाऱ्याकडून परवानगी घ्यावी लागत असे.

अशाप्रकारे प्राचीन काळामध्ये पर्यटकांची दळणवळणाची, राहण्याची, सुरक्षिततेची काळजी घेतली जात होती. मार्गदर्शकामार्फत पर्यटकांचा प्रवास सुखकर करण्याचा प्रयत्न केला जात असे. तसेच परकीय

प्रवाशांसाठी खास विभागाची निर्मिती करुन त्यांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्याचे लक्षात येते. असे असले तरी प्राचीन काळामध्ये प्रवास खडतर होता. पर्यटकांना निरनिराळ्या समस्यांचा सामना करावा लागत असे.

**प्राचीन कालखंडात भारताला भेटीस आलेले काही परकीय पर्यटक**

प्राचीन काळापासून भारत हा जगाचे आकर्षण राहिलेला आहे. भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणे, धार्मिक स्थळांना भेटी देणे यासाठी प्राचीन काळी परकीय पर्यटक भारतात भेट देत होते. यामध्ये इ.स. ३९९ साली चीनमधून 'फा-हियान' हा चीनी प्रवाशी भारतामध्ये आला होता. भारतात येवून मथुरा, श्रीवस्ती, कपिलवस्तू, वैशाली, पाटलीपुत्र, राजगृह, गया, वाराणसी, ताम्रप्लिती या महत्त्वाच्या शहरांना व बौद्ध पर्यटन स्थळांना त्याने भेटी दिल्या. त्यानंतर 'ह्यू-एन-त्सँग' हा चीनी प्रवासी इ.स. ६३० मध्ये भारतात आला. त्याने भारतात येऊन बौद्ध धर्माच्या परंपरा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. पवित्र बौद्ध स्थळांना भेटी दिल्या. त्यानंतर चीनमध्ये जावून ७४ भारतीयग्रंथाचे चिनी भाषेत अनुवाद केले. 'इ-स्तिंग' हा चीनी प्रवासी इ.स. ६७३-६८८ दरम्यान भारतामध्ये होता. भारतामधील पवित्र बौद्ध स्थळांना भेटी दिल्या. त्याचबरोबर नालंदा विद्यापीठामध्ये जावून बौद्ध धर्माचा अभ्यास केला.  इ-स्तिंग साठी श्रीगुप्त नावाच्या राजाने बुद्धगया येथे विहार बांधले होते. त्या विहाराला 'चीनी विहार' असे संबोधले जात होते. चीनी पर्यटकांच्याबरोबरच तिबेटचा'तारानाथ' मुस्लिम पर्यटक 'अलबेरुनी' भारतामध्ये आला होता. वरील ज्ञात असणाऱ्या परकीय पर्यटकांच्या व्यतिरिक्त धार्मिक व व्यापारी उद्देशाने भारतामध्ये पर्यटक येत होते.

अशाप्रकारे प्राचीन काळामध्ये धार्मिक, व्यापार, शिक्षण याद्वारे भारतातील पर्यटनाला चालना मिळत गेली. या पर्यटनातून भारतातील विविध प्रांतातील चालीरिती, धर्म, खानपान, परंपरा याची माहिती मिळाली. व्यापारानिमित्ताने येणाऱ्या परकीय पर्यटकांना भारताच्या संस्कृतीची व संपन्नतेची ओळख झाली. त्यांनी भारतातील व्यापार, धर्माची व संपन्नतेची माहिती आपल्या देशात जावून इतरांना सांगितली. त्यामुळे भारताकडे परकीय पर्यटक आकर्षिले गेले. पुढील काळात परकीय पर्यटक व्यापारानिमित्ताने भारताला मोठ्या प्रमाणात भेट देवू लागले. प्राचीन भारतामध्ये पर्यटनाच्या विकासामुळे येथे दळणवळण साधनाचा विकास झाला. येथे पर्यटकांना विविध सोयीसुविधा पुरविण्यात आल्या होत्या. भारतामध्ये आलेल्या अनेक परकीय पर्यटकांनी येथील सांस्कृतिक व सामाजिक जीवनाचा, अभ्यास करुन वृत्तांत लिहून ठेवले. यातूनच पुढील काळात इतिहासकारांना प्राचीन भारताचा अभ्यास करण्यास या प्रवास वर्णनाची मदत झाली.

- **मध्ययुगीन कालखंडातील पर्यटन**

भारतीय इतिहासातील अकराव्या शतकापासून ते पंधराव्या शतकापर्यंतचा काळ राजकीय दृष्ट्या अत्यंत अस्थिर व धामधुमीचा होता. गुप्तकाळाच्या सुवर्णकाळानंतर भारतात राजकीय विघटनाची प्रक्रिया सुरु झाली. भारतात एखादी केंद्रीय सत्ता अस्तित्वात येण्याऐवजी देशातील विविध प्रांतात वेगवेगळी बळकट राज्ये अस्तित्वात आली आणि त्या राजांनी आपापल्या राज्यात संरक्षण व अंतर्गत विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले होते. कला, उद्योग, व्यापार, व साहित्य इ. क्षेत्रात त्यांनी विकास घडवून आणला होता. ही सर्व स्थानिक

राज्ये आर्थिकदृष्ट्या संपन्न होती. भारतातील हा विकास व आर्थिक संपन्नता मध्य-पूर्व आशियातील सत्ताधिशांना भारतावर आक्रमण करण्यास प्रेरक ठरणारा महत्त्वाचा घटक होता. भारतामध्ये ११ व्या शतकापासून मध्यपूर्वेतील इस्लामी सत्ताधिशांच्या आक्रमणाचे जे सत्र सुरु झाले ते सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात मोगल सत्ता स्थिर होईपर्यंत चालूच होते. जवळपास पाचशे वर्षाच्या या संपूर्ण काळात भारतात सर्वत्र राजकीयदृष्ट्या अस्थिरता व असुरक्षितता नांदत होती. या अस्थिर परिस्थितीचा परिणाम पर्यटनावरही झाला होता.

**सुलतानशाही काळातील पर्यटन (इ.स. १२०६ ते इ.स. १५२६)**

दिल्ली सल्तनत स्थायी व सुदृढ होत गेली तेव्हा पर्यटनाचा विकास थोड्याफार प्रमाणात झाला. यावेळी पर्यटनाचा प्रमुख उद्देश व्यापार हाच होता. व्यापारी लोक सुरक्षेच्या कारणास्तव तांडा करून प्रवास करत होते. दैनंदिन गरजा भागवण्यासाठी या तांड्याबरोबर लहान लहान बाजार करणारे सुद्धा जात असत. विविध भागात विश्रांती घेऊन हे व्यापारी तांडे इच्छित स्थळी पोचत होते. त्या काळात चोर, लुटारु, दरोडेखोर यांच्यामुळे प्रवास करणे फार धोक्याचे आणि अवघड झाले होते. असे असले तरी राजमार्ग शक्य तितक्या स्थितीत सुरक्षित ठेवले जात होते. या मार्गावर प्रवाशांच्या सोईसाठी व सुरक्षिततेसाठी धर्मशाळा किंवा सराया बांधलेल्या होत्या. पेशावर ते सोनारगाव या राजमार्गांशिवाय, मुहमंद तुघलकने (इ.स.१३२५ ते १३५१) दौलताबादकडे जाणारा एक रस्ता बांधला होता. तसेच देशात टपाल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी त्वरीत नेण्याची सोय करण्यात आली होती. कुतुबुद्दीन ऐबकने (इ.स. १२०६ ते १२१०) आपल्या राज्यातील गर्व्हनरंना मुख्य रस्त्यावर, पुल बांधण्याचे तसेच लहान लहान मार्गावर सुरक्षिततेची चांगली व्यवस्था करुन व्यापाऱ्यांना सोयी-सुविधा पुरविण्याचे आदेश दिले होते. यामुळे पुल, विहीरी, सराई, सामानघराची इ. निर्मिती झाल्याने यात्री तसेच व्यापाऱ्यांना सोयीसुविधा निर्माण होत गेल्या. गयासुद्दीन बल्बनने (इ.स. १२६६ ते १२८७) मेवात मधील जंगले तोडून तेथील चोर डाकूपासून सुरक्षित व्यापारी मार्ग केला. तसेच जलालुद्दीन खलजीने (इ.स. १२९० ते ९६) दिल्ली ते लखनौच्या व्यापारी मार्ग चोर व लुटारुपासून सुरक्षित बनविला. त्यामुळे दिल्ली दूरदूरच्या प्रमुख व्यापारी मार्गांना जोडली गेली.

सुलतानशाही काळात संचार व दळणवळणासाठी विविध प्राण्यांच्या वाहनांचा व जलमार्गासाठी नावांचा वापर केला जात असे. यावेळी गाढव, खेचर, बैल, घोडे या प्राण्याचा वापर संचारासाठी केला जात होता. कमी अंतराच्या प्रवासासाठी 'डोलीचा' वापर केला जात असे.नोकरवर्ग आपल्या खांद्यावरुन डोली वाहून नेत होते.दूर अंतराच्या प्रवासासाठी पालखीचा वापर केला जात असे. पालखी सुद्धा नोकर वर्ग खांद्यावर ठेवून वाहून नेत होते. डोली व पालखी ही दोन्ही साधने श्रीमंत व प्रतिष्ठित लोक वापरत होते.या काळात लाहौर, थट्टा, देबल. भडौच, खंबात, अहमदाबाद, दिल्ली, देवगिरी, सतगाव, सोनारगाव, आग्रा, बनारस ही व्यापाऱ्यांची प्रमुख ठिकाणे होती.

अशाप्रकारे सामान्यपणे सुलतानशाही काळात प्रवासांसाठी वापरली गेलेली साधने तसेच सत्ताधिशांकडून झालेला मार्गाचा व सोयीसुविधाचा विकास यामुळे थोड्याफार प्रमाणात पर्यटनाला चालना मिळाली. तरीही

बऱ्याच वेळा नैसर्गिक आपत्ती, सतत होणारी युद्धे व संघर्ष यामुळे बरीच संकटे निर्माण होत होती. त्यामुळे हे पर्यटन क्षेत्र त्या काळात संपूर्णत: सुरक्षित नव्हते.

**विजयनगरकाळात धार्मिक पर्यटनाला मिळालेली चालना (इ.स. १३३६ ते इ.स. १६५०)**

विजयनगर साम्राज्यात धार्मिक पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. विजयनगरचे राज्य हरिहर आणि बुक्क या दोन बंधूनी इ. स. १३३६ मध्ये स्थापन केले. यानंतर विजयनगर राज्याचा आर्थिक, सामाजिक, धार्मिक या बाबींचा मोठ्या प्रमाणात विकास झाला.विजयनगरचे राजे धार्मिक वृत्तींचे असल्यामुळे या काळात धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. या काळात नवीन मंदिरे बांधण्यात आली. जुन्या मंदिरांची डागडुजी करण्यात आली होती. कृष्ण देवरायाच्या काळात कृष्ण मंदिर, लक्ष्मी नरसिंहमंदिर, हंपीच्या मार्गावरील अनंतशयनगुडी ही मंदिरे बांधण्यात आली.या मंदिराचे उत्सव ही मोठ्या प्रमाणात साजरे केले जात होते. या उत्सवाप्रसंगी नाचगाणे, कुस्ती, दारुकाम, घोड्यांच्या शर्यती यासारखे कार्यक्रम आयोजित केले जात. हे कार्यक्रम ९ ते १० दिवस चालत होते. यावेळी मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे उत्सवात सहभाग घेण्यासाठी येत होते.विजयनगरचे राजे धार्मिक यात्राना जात होते. यामध्ये कृष्णदेवरायने कांची, श्रीशैलम, अरुवाचलम, चिदम्बर, सिंहाचलम, श्रीकाकुलम, कलाहस्ती, तिरुपती या पर्यटन स्थळांना भेटी दिल्याचा उल्लेख सापडतो. तसेच त्याने कारुवनल्लुर, शालिवाहपुरम, कन्याकुमारी, तिरुचेंदूर, सेतू, रामेश्वर, धनुष्कोठी ह्या स्थळांना सुद्धा भेटी दिल्या होत्या. त्याने या स्थळांना भेटी देऊन या मंदिरांना देणग्या दिल्या होत्या. यातील श्री वेल्लीपुत्तूर स्थळावर पर्यटकासाठी पिण्याच्या पाण्यासाठी तळे खोदले होते.

अशाप्रकारे विजयनगरच्या साम्राज्यामध्ये धार्मिक पर्यटनाला चालना मिळाली. विजयनगर राजांनी बांधलेली हिंदू मंदिरे पर्यटनाची नवीन केंद्रे म्हणून पुढील काळामध्ये उदयास पावली.

**वास्को द–गामा**

बाबराने मुघल सत्तेची स्थापना करण्यापूर्वी २८ वर्ष आधी अशी एक घटना घडली की, ज्याने भारतीय पर्यटन इतिहासात मोठा बदल घडवून आणला. भारतामधून रोमनांच्या काळापासून, भारतामधील मसाले विशेषत: काळेमिरे आणि औषधे या वस्तूंची मागणी पश्चिमात्य देशात मोठ्या प्रमाणात होती. हे मसाले पदार्थ भारत आणि आग्नेय आशियातून मुख्यत्वे खुष्कीच्या मार्गाने व काही प्रमाणात जलमार्गाने इजिप्त आणि काळ्या समुद्रावरील बंदरापर्यंत आणली जात होते. इ.स. १४५३ ला तुर्कांनी रोमन साम्राज्याच्या ताब्यातील मध्ये कॉन्स्टॅन्टिनोपल जिंकून घेतले. हे शहर युरोपचे प्रवेशद्वार होते. कॉन्स्टॅन्टिनोपल वरील तुर्कांच्या वर्चस्वामुळे युरोपियन व्यापाऱ्यांचा पूर्वेकडील व्यापारासाठी असलेला खुष्कीचा मार्ग बंद झाला. त्यामुळे व्यापारासाठी नवीन जलमार्ग शोधण्याची गरज निर्माण झाली. या गरजेतून युरोपियन खलाशांना पूर्वेकडे जाणारा नवीन जलमार्ग शोधण्याची प्रेरणा मिळाली. यातूनच २१मे १४९८ रोजी पोर्तुगीज खलाशी 'वास्को–द–गामा', केप ऑफ गुडस्ला वळसा घालून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदरात पोहोचला. तेथील झामोरीन राजाशी संगनमत करुन पोर्तुगालकरिता अनेक व्यापारी सवलती त्याने मिळविल्या. या नवीन जलमार्गाच्या शोधामुळे मोठ्या संख्येने युरोपियन प्रवाशी भारताकडे येऊ लागले. पोर्तुगीजांच्या माध्यमातून

भारताला पहिल्यांदा पाश्चात्य विज्ञान व सुधारणावादाची ओळख झाली. या सर्व गोष्टीमुळे भारतीय पर्यटनाला चालना मिळाली. वास्को-द-गामाच्या या साहसी कृत्याने प्रभावित होऊन नवीन प्रदेशांच्या शोधार्थ जणू संपूर्ण युरोप प्रवासासाठी बाहेर पडला. या उत्साहाला मुलूखप्राप्ती, धर्मप्रसार व व्यापार या तीन गोष्टींनी चालना दिली.

**मध्ययुगीन कालखंडात आलेले काही परकीय प्रवाशी**

भारतीय संस्कृती, संपन्नता, सामाजिक जीवन, व्यापारी दृष्ट्या असलेले महत्त्व हे जाणून घेण्यासाठी भारतामध्ये मध्ययुगीन काळात परकीय पर्यटक येत होते. यामधील पहिला ज्ञात मध्ययुगीन प्रवासी म्हणजे ट्युडेलामधील 'बेंजामिन' याने इ.स. ११६० मध्ये सॅरोगासापासून प्रवासाला सुरुवात केली. त्याने १३ वर्ष प्रवास करुन युरोप, पॅरिस व भारताला भेटी दिल्या. त्यानंतर 'मार्कोपोलो' हा परकीय प्रवासी भारतात आलेल्याची माहिती मिळते. मार्कोपोलो याने इ.स. १२७१ मध्ये व्हेनिस येथून आपल्या वडील व काकासोबत पार्शिया, अफगाणिस्तान मार्गे प्रवास करत पामिरच्या पठाराला भेट दिली. नंतर चीनमध्ये २० वर्षे राहिला. परतीच्या मार्गावर त्याने सुमात्रा, जावा, भारत, सिलोन आणि इटलीस भेटी दिल्या. दुसरा एक मध्ययुगीन काळाचा महत्त्वाचा प्रवासी म्हणजे 'इन्ब-बतुता'. याचा जन्म इ.स. १३०४ मध्ये टॅजियर मध्ये झाला. १३२५ सालापासून प्रवासाला सुरुवात करुन अरेबिया, मेसोपोटेनिया, आशियातील मिनरला भेट दिली. त्याने समरकदमार्गे भारतात येऊन दिल्ली सुल्तान, मुहमदबीन तुघलक याच्या दरबारात आठ वर्षे वास्तव्य केले होते.

फ्रान्सिस्को फ्रेअर, मॉटे कोर्लोचा जॉन यांनी चीनहून परतीच्या प्रवासावेळी साधारण १३ व्या शतकाच्या शेवटी भारतास भेटी दिल्याचे उल्लेख सापडतात. नंतरच्या महत्त्वाचा प्रवासी म्हणजे 'अफनासि निकितीन' हा रशियन प्रवासी १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये आला आहे. त्याने 'Travelling Across the Three Seas' या पुस्तकामध्ये आपल्या प्रवासाचे वर्णन केले आहे. त्यामध्ये कॅस्पियन समुद्र, इराक, इरान आणि पशियन गल्फमार्गे प्रवास केल्याचा उल्लेख सापडतो. त्याचा मुख्य उद्देश व्यापार असला तरी त्याने ज्या गावांना भेटी दिल्या, तेथील वास्तुशिला विषयी नोंदी केलेल्या आहेत. भारतातील धार्मिकतेविषयक आणि त्यांच्या आदरातिथ्याचे वर्णन केले आहे. 'निकोलो मनुची' हा आणखी एक महत्त्वाचा परकीय प्रवासी ज्याने भारताला भेट दिली होती. तो मुघल दरबाराच्या हालचालींचा इ.स. १६५३ ते १७०८ पर्यंत साक्षीदार होता. मुघल दरबाराचा आणखी एक साक्षीदार म्हणजे 'फैंक्रि बर्नियर' हा होता. याच्या लिखाणातून औरंगजेबच्या काळातील माहिती मिळते. बर्नियरच्या लिखाणात जगन्नाथ पुरीच्या यात्रेचा उल्लेख केला आहे. जगन्नाथपुरीच्या ८ ते ९ दिवस चालणाऱ्या या यात्रेस दिड लाखापेक्षा जास्त यात्रेकरु येतात अशी नोंद आहे.

**मुघलकालीन पर्यटन (इ.स. १५२० ते इ.स. १८५७)**

मुघलकाळात भारतातील अस्थिर परिस्थिती कमी झाल्याने भारतीय पर्यटनाला चालना मिळाली. मुघलकाळात शहरे, व्यापारी पेठा, औद्योगिक केंद्रे, बंदरे एकमेकास जोडली गेली होती. मुघल कालखंडात

स्थापत्याचा विकास झाला होता. सुंदर अशा कलाकुसरीनीयुक्त अशा उत्तुंग वास्तु निर्माण झाल्या. या काळातील सुंदर कला कौशल्ययुक्त वास्तूंनी संपूर्ण जगाला मोहित केले. यामुळे पहिल्यांदा धार्मिक व व्यापारांपुरत्या असणाऱ्या पर्यटनाच्या कक्षा रुंदावत जावून मुघलकाळात वास्तू कला पाहण्याच्या उद्देशाने पर्यटनास चालना मिळाली.

**मुघल कालखंडात पर्यटकांना उपलब्ध असलेल्या सोयी–सुविधा**

मुघल सत्ताधिशांनी पर्यटनपुरक विविध सोयी सुविधा निर्माण केल्या. यामध्ये बाबरने आग्रा ते काबूल या मार्गाची लांबी मोजून ९–९ कोसावर उंच मिनार बनवले. तसेच प्रत्येक १८ कोसावर घोडे व डाक घराची व्यवस्था केली होती. ज्यामध्ये घोड्यांच्या चारा–पाण्याची व्यवस्था केली होती. शेरशहाचे धोरण व कार्य जनहिताचे होते. त्याने अनेक सार्वजनिक कामे केली. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे तसेच पर्यटकांसाठी धर्मशाळा व पिण्याच्या पाण्याच्या सोयी सुविधा निर्माण केल्या होत्या. त्याने एकूण १७०० सराया बांधल्याचा उल्लेख सापडतो. तेथे सर्व धर्मीयांना राहण्याची व जेवण्याची व्यवस्था केली होती. शेरशहाने प्रत्येक सराईत 'हरकरे' नेमले होते. ते दररोज किमान ७०–८० मैल प्रवास करून संदेश पोहोचविण्याचे काम करत होते. सम्राट अकबरानेदेखील प्रवाशांच्या गरजेकडे लक्ष पुरविले होते. पूर्वीच्या सोई–सुविधांबरोबर त्याने धर्मशाळेत थांबणाऱ्या व रस्त्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सरंक्षणाची जबाबदारी कोतवालाकडे दिली होती.

जहांगिरच्या काळात बंगाल ते आग्रा व आग्रा ते अटक असे पक्के रस्ते होते व रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावली होती. त्याचप्रकारे रस्त्याच्या कडेला प्रत्येक साडेतीन मैल अंतरावर अंतर दर्शविणारे दहा फूट उंचीचे दगड उभारले होते. जुने पूल दुरुस्त केले होते व काही नवीन पूल बांधले होते. तसेच प्रवासी व व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेतली जात होती.

अशाप्रकारे मुघलकालखंडात सरायांची व प्रवाशी थांबे यांच्या निर्मितीमुळे पर्यटकांना चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध झाल्या. या सराया व प्रवाश्यांच्या सुरक्षिततेमुळे पर्यटकांच्या हालचाली गतीमान बनल्या. पुढील काळात मुघल सत्तेच्या ऱ्हासानंतर आणि ब्रिटीशांच्या आगमनामुळे या सरायांना पाश्चात्य पद्धतीच्या हॉटेल्सचे स्वरुप प्राप्त झाले. १७ व्या शतकात मुघल राज्यकर्ते हे काश्मिरच्या दऱ्याखोऱ्यांच्या प्रदेश तसेच पंजाबमधील पिंजोर पर्वतांकडे जाणाऱ्या थंड हवेच्या ठिकाणी काही काळ वास्तव्य करत असत. त्यांचा उद्देश नैसर्गिक सौंदर्य पाहण्यापेक्षा उन्हाळ्यातील उष्मा त्रासापासून मुक्ती मिळवणे हा होता. सामान्यत: ही पर्यटन ठिकाणे लांबच्या पल्ल्याची असल्याने सामान्य व्यक्ती क्वचितच या ठिकाणी जात असत.

**१८ व्या शतकातील पर्यटन**

मोगल सत्तेच्या विघटनांमुळे १८ व्या शतकात छोटीछोटी राज्य निर्माण झाली. या राज्यातील सततच्या संघर्षामुळे अठराव्या शतकात पर्यटनास अडथळे निर्माण झाले. सतत होणारी युद्धे आणि अठराव्या शतकात देशातील अनेक भागात ढासळलेली कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती यामुळे प्रवास करणे कष्टदायक बनले. अनेक व्यापारी मार्गावर दरोडेखोरांच्या संघटित टोळ्या कार्यरत होत्या. व्यापारी व यात्रेकरुंचे तांडे यांची लूटमार करण्यात येत असे. समुद्रमार्गे चालणाऱ्या व्यापारात वाढ झाली असली तरी अस्थिरतेमुळे

अफगाणिस्तान व पार्शियामार्गे चालणाऱ्या खुष्कीच्या व्यापारात मात्र अडथळे निर्माण झाले होते. व्यापराप्रमाणे राजकीय घटकांचा विपरीत परिणाम शहरी उद्योगांवरही झाला. परिणामी, दिल्ली, आग्रा, मथुरा, लाहोर या महत्त्वाच्या शहरांचा ऱ्हास होऊ लागला. असे असूनही युरोपियन व्यापारी कंपन्यांच्या वाढत्या हालचालीमुळे युरोपियन देशाशी चालणारा व्यापार वाढतच होता. वस्तुत: तरीही अठराव्या शतकाच्या सुरुवातीला भारत हे जागतिक व्यापार व उद्योग यांचे प्रमुख केंद्र होते.

या कालखंडात मराठ्यांचे वर्चस्व वाढले होते. मराठ्यांचा कारभार छत्रपती तर्फे पेशवे सांभाळत होते. पेशवे हे धार्मिक वृत्तीचे असल्यामुळे त्यांच्या काळामध्ये धार्मिक पर्यटन वाढीस लागले होते. पेशवेकाळात नाशिक, त्र्यंबक, अनंतपूर, पंढरपूर ही महत्त्वाची धार्मिक पर्यटन स्थळे विकसित झाली होती. येथे मोठ्या प्रमाणात यात्रेकरु भेट देत होते. यामुळे पेशव्यांनी तसेच सरदारांनी या ठिकाणी यात्रेकरुंसाठी विविध सोयीसुविधा निर्माण केल्या होत्या. उदा. नदीवर घाट बांधले, रस्त्यावर विहिरी खोदून प्रवाशांना पिण्यासाठी पाण्याची सोय, रस्त्यांच्या दुर्तफा झाडे इ. कामे केली होती.तसेच करवीर राज्यामध्ये कोल्हापूर हे महत्त्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ होते. करवीर राज्यातील महालक्ष्मी, जोतिबा ही महत्त्वाची धार्मिक पर्यटन स्थळे विकसित झाली होती. येथील छत्रपतींनी या क्षेत्राचा विकास करुन पर्यटकांना विविध सोयीसुविधा पुरविल्या होत्या.

पेशवेकाळात काशी यात्रेला महत्त्व प्राप्त झाले होते. 'काशी' हे हिंदूंचे अत्यंत पवित्र असे स्थळ आहे. आयुष्यात जर मोक्ष मिळवावयाचा असेल तर काशीला गेल्याशिवाय मिळू शकत नाही. अशी हिंदूंची धारणा असल्याने आयुष्यात एकदातरी काशीला जाणे म्हणजे काशीयात्रा करणे हे हिंदूचे कर्तव्य ठरत असे. पेशवेकाळात काशी यात्रेला जाणे म्हणजे 'महायात्रेस' जाणे असे संबोधले जात होते. जेव्हा गोपाळराव पटवर्धन यांची बायको सरस्वतीबाई काशीयात्रेस जाण्यास निघाल्या त्यावेळेस सांगली, कुरुंदवाड, गणेशवाडी, हरिपूर, तासगाव, इचलकरंजी, जमखिंडी, तेरदाळ तसेच नरगुंद, रामदुर्ग या दूरच्या ठिकाणाहून यात्रेकरु मिरजेत गोळा झाले होते. सामान्य व गरीब लोकांना स्वतंत्रपणे यात्रा करणे अवघड असल्यामुळे कोणातरी राज्याच्या व संस्थानिकांच्या सहाय्याने यात्रा करावी लागत असे. पहिला बाजीरावांची पत्नी काशीबाई जेव्हा काशी यात्रेस बाहेर पडल्या तेव्हा तिच्याबरोबर दहा हजार यात्रेकरु होते. असा तात्कालीन कागदपत्रामध्ये उल्लेख सापडतो. अशाप्रकारे पेशवे काळात धार्मिक पर्यटनाला महत्त्व प्राप्त झाले होते. पेशवेकाळात धार्मिक पर्यटन स्थळी केलेल्या सुविधामुळे आजही पर्यटकांना त्याचा उपयोग होतो. तसेच धार्मिक भावनेतून काशीयात्रेस चालना मिळाली होती असे दिसून येते.

अशाप्रकारे मध्ययुगीन कालखंडात भारतामध्ये विशेषत: मोगल कालखंडात पर्यटनास चालना मिळाली. मोगलांनी केलेल्या सोयी सुविधामुळे पर्यटकांचा प्रवास सुखकर झाला. विजयनगर व मराठा कालखंडात धार्मिक पर्यटनास चालना दिला. यातूनच विविध धार्मिक स्थळांवर पर्यटनपूरक सोयीसुविधा निर्माण झाल्या.

## ● आधुनिक कालखंडातील पर्यटन

भारतामध्ये पर्यटनास अधिक संयोजित रुप ब्रिटीश कालखंडात निर्माण झाले.व्यापाऱ्यांच्या मार्गाने ब्रिटीशांनी हळुहळू भारतामध्ये राजकीय वर्चस्व प्रस्थापित करुन संपूर्ण भारत आपल्या ताब्यात आणला. भारतामध्ये ब्रिटीशांच्या सुधारणामुळे भारतीय पर्यटनास व्यापक रुप प्राप्त झाले.

१९ व्या शतकात भारतास विविध परकीय प्रवाशांनी भेट दिली. भारतामध्ये आलेल्या परकीय प्रवाश्यांनी भारताचा अभ्यास करुन भारतीय संस्कृतीचा प्रसार आपल्या देशात केला. हॉलंड पोर्तुगाल लोकांनी युरोपियन भाषांमध्ये त्यांच्या लिखाणातून भारतावर प्रकाश टाकला. १९ व्या शतकात आलेला परकीय प्रवासी मार्क ट्रवेन याने भारताबद्दल असे उद्गार काढले, "This is indeep India the land of dreams and romance, of fabulous poverty of splendour and rags of Palaces and hovels...... Cradle of human race, birth place of human speech, mother of history, grandmother of legends, great grandmother of tradition the one land that all men desired to see." परकीय प्रवाशांनी केलेल्या अशा वर्णनामुळे भारताकडे परकीय प्रवासी मोठ्या प्रमाणात आकर्षले गेले. १९ व्या शतकात पर्यटनास नवी दिशा प्राप्त झाली. यामध्ये गटाने पर्यटन ही संकल्पना रुजली. जगभरातील पर्यटक युरोप, मिडल ईस्ट, फार ईस्ट, भारत, अमेरिका, आफ्रिका या देशांना भेटी देऊ लागले. तेथील स्मारके, म्युझियम्स, ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांना भेट देत होते. या सर्व गोष्टीतून भारतीय पर्यटनास नवेरुप प्राप्त झाले.

### थंड हवेची ठिकाणे

भारतात थंड हवेच्या पर्यटन केंद्रांचा विकास ब्रिटीश काळात झाला. उन्हाळ्यात सपाट भूप्रदेश बराच तापत असल्यामुळे समशीतोष्ण कटिबंधातील इंग्लंडमधून आलेल्या ब्रिटीशांना हा उन्हाळा तापदायक ठरत असे. या कारणानेच या ऋतूत उंच पर्वत भागातील निसर्गरम्य ठिकाणी वास्तव्य करण्याची ब्रिटीशांची प्रवृत्ती वाढली. भारतामध्ये ब्रिटीश सत्ताधिश व विविध संस्थानिक राजांनी अनेक 'हिल स्टेशन' विकसित केली. काश्मिरच्या दऱ्याखोऱ्यांपासून ते पंजाब, उत्तर प्रदेशातील पर्वतमय प्रदेश आणि देशाच्या पूर्वेकडील भागात 'थंड हवेची' ठिकाणे विकसित केली. ब्रिटीशांची सिमला ही उन्हाळी राजधानी बनवली. तसेच या काळात मसुरी, राणीखेत, दार्जिलिंग, पंचमगढीच्या टेकड्या ही थंड हवेची पर्यटन स्थळे उदयास आली. यामुळे भारतीय पर्यटनाचे स्वरुप हळुहळू बदलत गेले.

### वाहतूक व संपर्क साधनांचा विकास

भारतामध्ये पर्यटनास 'डाक व्यवस्थेमुळे' चालना मिळाली. ईस्ट इंडिया कंपनीच्या पोस्टल डिपार्टमेंटतर्फे प्रवासाचे सुरक्षित असणारे प्रसिद्ध माध्यम म्हणून 'पालखी' व्यवस्था निर्माण केली. ज्या व्यक्तींना याच्या माध्यमातून प्रवास करावयाची इच्छा असेल त्यांनी त्याच्या पूर्व नियोजित प्रवासांची माहिती पंधरा दिवस अगोदर पोस्ट मास्तरला द्यावी लागत होती. चार व्यक्तींकडून नेल्या जाणाऱ्या पालखीमधून त्यांच्या प्रवासास सुरुवात होत असे. काही ठराविक अंतरावर पालखींचे भोई बदलले जात होते. उन्हाळ्यामध्ये हा प्रवास

रात्रीचा करत आणि त्यांना मार्गदर्शनाचे कार्य रस्त्यातून दिवे घेऊन फिरणारे गस्तवाले करत होते. प्रवासाच्या दरम्यान राहण्यासाठी डाक बंगल्यांची निर्मिती करण्यात आली होती. कमी वेग व जास्त मनुष्यबळाचा वापर यामुळे पालखीचा दळणवळणातील वापर ही मोठा खर्चिक बाब होती. एप्रिल १८५० मध्ये 'टंटी मूल' यांनी पहिली 'हॉर्स डाक' व्यवस्था सुरु केली. या व्यवस्थेत घोड्यावरुन प्रवास केला जात असे. ही व्यवस्था पहिल्या व्यवस्थेच्या तुलनेत कमी खर्चिक व अधिक वेगवान होती. याच दरम्यान अशा असंख्य दळणवळण कंपन्याचा उदय भारतामध्ये झाला. या प्रवाशांच्या नवीन साधनांमुळे पर्यटकांचा प्रवास सुखकर बनत गेला.

**रेल्वेमार्गाची उभारणी**

भारतात वर्चस्व ठेवण्यासाठी ब्रिटीशांनी दळणवळण, वाहतूक इ. चा विकास केला. त्या विकासाचा फायदा भारतीय पर्यटनास झाला. यातून भारतामध्ये आधुनिक पर्यटनास चालना मिळाली. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतात वाहतुकीची साधने मागासलेली होती. बैल व घोडागाडीपर्यंतच ती मर्यादित होती. ब्रिटीश राज्यकर्त्यांना सुलभ वाहतूक व्यवस्था आवश्यक असल्याची जाणीव लवकरच झाली. त्यांनी नद्यांमधून मोठ्या जहाजांनी वाहतूक सुरु केली. तसेच रस्ते सुधारण्यास सुरुवात केली. कलकत्ता, दिल्ली दरम्यानच्या ग्रँड ट्रंक रोडचे बांधकाम इ.स. १८३९ मध्ये सुरु करण्यात आले. १८५० च्या दशकात हे काम पूर्ण केले. देशात प्रमुख शहरे, बंदरे व बाजारपेठांना जोडणारे रस्ते बांधण्याचे प्रयत्न करण्यात येऊ लागले. अर्थात भारतात रेल्वेमार्ग बांधल्यानंतरच वाहतुकीमध्ये खरी सुधारणा घडून आली. इ.स. १८५३ मध्ये मुंबई ते ठाणे हा पहिला रेल्वेमार्ग वाहतुकीसाठी खुला झाला. इ.स.१८६९ च्या अखेरपर्यंत भारतात ६,००० कि.मी. लांबीचे रेल्वेमार्ग बांधण्यात आले. त्यानंतर इ.स.१९०५ पर्यंत ४५,००० कि.मी. लांबीचे रेल्वेमार्ग तयार करण्यात आले.

अशाप्रकारे रस्ते व रेल्वेमार्गाच्या उभारणीमुळे भारतीय पर्यटनास गती मिळाली. भारतातील प्रमुख शहरे व पर्यटन स्थळे दळणवळणाच्या व वाहतुकीच्या माध्यमातून एकमेकांना जोडली गेली. यामुळे कमी कालावधीत जास्त पर्यटन स्थळे बघणे शक्य झाले. याचा परिणाम भारतामध्ये पर्यटन हे उद्योगाच्या रुपाने विकसित होऊ लागले.

**सार्जंट समिती (The Sargent Committee)**

पर्यटन विकासाचे आर्थिक महत्त्व दुसऱ्या महायुद्धापूर्वी तात्कालिन ब्रिटीश सरकारला माहित होते. त्या दृष्टीने भारतातील ब्रिटीश सरकारने या व्यवसायाला उत्तेजन देण्याचे ठरविले. परंतु दुसऱ्या महायुद्धामुळे हा प्रश्न काही काळ बाजूस पडला. नंतर पर्यटनाच्या विकासाकरिता जाणीवपूर्वक संघटितरित्या प्रयत्न करण्यात आले. या देशात पर्यटनाला प्रोत्साहन देऊन पर्यटन व्यवसायाचा विकास कसा करावा याचा विचार करुन उपाययोजना सुचविण्यासाठी इ.स. १९४५ मध्ये त्या वेळचे शिक्षणविषयक सल्लागार सर जॉन सार्जंट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. तिला 'सार्जंट समिती' म्हणतात. या समितीच उद्देश पर्यटनाच्या संभाव्यतेचे सर्वेक्षण करणे हा होता. सार्जंट समितीने आपला अंतरिम अहवाल ऑक्टोबर १९४६ मध्ये सादर केला. या समितीने देशी व विदेशी पर्यटकांना उत्तेजन व पर्यटन उद्योगाच्या विकासाविषयी काही उपाय

सुचविले होते. या समितीने निमशासकिय दर्जाची प्रातिनिधिक संघटना असावी, अशी महत्त्वाची शिफारस केली. पुढे या समितीने असे सुचविले की, पर्यटनाचा विकास हा राष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असल्याने याकडे जातीने लक्ष देण्यासाठी एक वेगळी संघटना असावी.

सार्जंट समितीने केलेल्या शिफारशीनुसार पर्यटनासंबंधी पायाभूत गोष्टी, देशात व परदेशात पर्यटनासंबंधी जाहिराती, पर्यटन उद्योग हाताळण्यासाठी सर्व पातळ्यांवरील लोकांमध्ये परस्पर संबंध, इत्यादींवर भर देण्यात आला. त्यामुळे स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला भारताकडे पर्यटन उद्योगांचा संपूर्ण आराखडा उपलब्ध होता. त्यावेळी देशी व विदेशी पर्यटकांच्या गरजांच्या पूर्तीसाठी देशभर हॉटेलांचे जाळे तयार झाले होते. देशात पुरेशी वाहतूक व दळणवळणाची पद्धत होती. बहुतेक पर्यटन केंद्राकडे जाणारे रस्ते व लोहमार्ग व काही ठिकाणी हवाईमार्गही होते. देशातील बरेच विमानतळ हे आंतरराष्ट्रीय पर्यटक पोहोचतील असे होते, परंतु त्यावेळी मध्यवर्ती पर्यटन संघटना नव्हती. त्यामुळे विविध पर्यटनविषयक सेवांमध्ये परस्पर संबंध नव्हता.

**मध्यवर्ती पर्यटन संघटना (Central Tourist Organisation)**

सार्जंट समितीने आपला अहवाल १९४६ मध्ये सरकारला सादर केला. सार्जंट समितीच्या शिफारशींनुसार भारतात 'मध्यवर्ती पर्यटन संघटने'ची स्थापना झाली. या समितीच्या शिफारशींनुसार देशात दिल्ली, कोलकाता, मुंबई व चेन्नई (मद्रास) येथे प्रादेशिक पर्यटन कार्यालये सुरू करण्यात आली. एक पर्यटन वाहतूक अस्थायी समिती स्थापन करण्याची सूचना केली. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर सार्जंट समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणात करण्यात आली. खऱ्या अर्थाने भारतीय पर्यटन उद्योगास चालना मिळाली.

**पर्यटन मंत्रालयाची स्थापना**

पर्यटन उद्योगाच्या सर्व बाबींकडे लक्ष देता यावे म्हणून भारतात १ मार्च, १९५८ रोजी वाहतूक मंत्रालयात पर्यटनासाठी एक वेगळे खाते सुरु करण्यात आले. याचा कारभार एका महासंचालकाकडे सोपविण्यात आला. या महासंचालकास मदत करण्यासाठी एक उपमहासंचालक आणि चार संचालक होते. यांच्याकडे प्रशासन, जाहिराती, प्रवास संपर्क, नियोजन व विकास ही कामे देण्यात आली. १४ मार्च १९६७ रोजीच्या राष्ट्रपतीच्या अध्यादेशानुसार भारतात स्वतंत्र पर्यटन व नागरी हवाई वाहतूक विभागाची स्थापना झाली. यासाठी स्वतंत्र मंत्रालय निर्माण करण्यात आले. ज्याचा संपूर्ण कारभार एका पूर्णवेळ मंत्र्याकडे सोपविण्यात आला. अशाप्रकारे १८ वर्षानंतर पर्यटन खाते वेगळे करुन त्याला एक वेगळा दर्जा देण्यात आला. त्यामुळे पर्यटन उद्योगाच्या विकासाला चालना मिळाली.

अशाप्रकारे ब्रिटिशांच्या भारतातील धोरणामुळे पर्यटन हे उद्योगांच्या स्वरुपात निर्माण झाले. ब्रिटिशांनी भारतामध्ये आधुनिक दळणवळणाच्या सोयीसुविधा निर्माण केल्या. पर्यटनांच्या विकासासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न सुरु केले. परिणामी प्राचीन व मध्ययुगीन, धार्मिक व व्यापारापुरते मर्यादित असलेले पर्यटन ब्रिटीश काळात व्यापक स्वरुप प्राप्त झाले आणि पर्यटनांच्या कक्षा रुंदावून मनोरंजन आणि आनंदासाठी या

आधुनिक पर्यटनाच्या संकल्पना भारतामध्ये रुजल्या. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने पर्यटनासाठी स्वतंत्र विभाग सुरु करुन त्यास उद्योगाचे स्वरुप प्राप्त करुन दिले.

**स्वाध्याय**

प्रश्न : रिकाम्या जागा भरा.

१. ............ हे गौतम बुद्धांचे जन्म स्थान आहे.

२. अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी ............ सुरु केल्या.

३. ............ हे प्राचीन भारतातील प्रसिद्ध विद्यापीठ होते.

४. भारतामध्ये ............ हा चीनी प्रवासी इ.स. ६३० मध्ये भारतात आला.

५. विजयनगर साम्राज्यात ............ पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली.

## १.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१. MTDC - Maharashtra Tourism Development Corporation.

२. ASI- Archaeological Survey of India.

३. युनेस्को (UNESCO) –युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन

## १.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. | १. खजुराहो | २. जंतर मंतर | ३. कथकली | ४. सांची स्तूप | ५. भीमबेटका लेणी |
| ब. | १. राजगड | २. रजपूत | ३. दिल्ली | ४. काशी | ५. मैसूर |
| क. | १. लुम्बिनी | २. धर्मयात्रा | ३. नालंदा | ४. ह्यू-एन–त्सँग | ५. धार्मिक |

## १.५ सारांश

पर्यटनामध्ये इतिहासाची भूमिका महत्त्वाची आहे कारण ती प्रवाशांना भूतकाळाशी जोडते, सांस्कृतिक वारसा जतन करते, आणि आर्थिक प्रगतीला चालना देते. ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व आणि त्यांचे संरक्षण केल्यास पर्यटन क्षेत्र अधिक शाश्वत बनेल, ज्यामुळे स्थानिक आणि जागतिक स्तरावर पर्यटनाचा विस्तार होण्यास मदत होईल. तसेच पर्यटन स्थळांची ऐतिहासिक दृष्टिकोनातून मांडणी केल्यास या स्थळांच्या ऐतिहासिक महत्त्व, स्थापत्यशास्त्र, आणि सांस्कृतिक घटकांचा आढावा घेतला जातो. ऐतिहासिक पर्यटन स्थळांचे इतिहासाच्या परिभाषेत विवेचन केल्यास, केवळ त्यांचा ऐतिहासिक महत्त्वच समजून येत नाही, तर त्या स्थळांच्या मागील कथा, संस्कृती, आणि परंपरांचे थोडक्यात आढावा घेतला जातो. या स्थळांचा अभ्यास करण्याने पर्यटकांना स्थानिक संस्कृतीशी आणि इतिहासाशी जुळवून घेण्यास मदत होते. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था, सांस्कृतिक आदानप्रदान, आणि जागतिक वारसा संवर्धनाला हातभार लागतो.

भारतीय पर्यटनाचा इतिहास हा विविध काळांतील सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक विकासाचे प्रतिबिंब आहे. प्राचीन काळातील धार्मिक यात्रा आणि व्यापारापासून ते आजच्या आधुनिक आणि शाश्वत पर्यटनापर्यंत, भारताने एक वैश्विक पर्यटन केंद्र म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे. आज भारतीय पर्यटन हे ऐतिहासिक स्थळे, सांस्कृतिक वारसा, निसर्गरम्य ठिकाणे, आणि आध्यात्मिक अनुभव यांच्यामध्ये परिपूर्ण असे एक विस्तृत क्षेत्र आहे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

१. ............ आगामनामुळे मध्ययुगीन कालखंडात भारतीय पर्यटन इतिहासात मोठा बदल घडवून आणला.

२. ............ कालखंडात पंढरपूर ही महत्त्वाची धार्मिक पर्यटन स्थळ विकसित झाले.

३. भारतामध्ये पर्यटनास अधिक संयोजित रुप ............ कालखंडात निर्माण झाले.

४. ब्रिटीश सरकारने या व्यवसायाला उत्तेजन देण्यासाठी सार्जंट समिती नेमली.

५. 'अफनासि निकितीन' हा............ १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये आला आहे.

६. कारगिल या ठिकाणाला ............ म्हणून ओळखले जाते.

७. ............ हे ठिकाण तीन मोठ्या युद्धांसाठी प्रसिद्ध आहे.

८. महाभारताचे युद्ध (प्राचीन काळात) ............ लढले गेले होते.

९. ............ किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी आहे.

१०. गुजरात मधील रानी की बाव या पर्यटन स्थळाला २०१४ साली ............ ने जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले.

**सरावासाठी स्वाध्याय उत्तरे**

| | | | |
|---|---|---|---|
| १. वास्को-दी-गामाच्या | २. मराठा | ३. ब्रिटीश | ४. सार्जंट ५. रशियन प्रवासी |
| ६. द वॉर लँड | ७. पानीपत | ८. कुरुक्षेत्रात | ९. रायगड १०. युनेस्को |

## १.७ संदर्भ ग्रंथ आणि पुस्तके

१. डॉ. नागतोडे, प्रा. पारधी, पर्यटन भूगोल, विद्या प्रकाशन, नागपूर, २००६.

२. विनोद अग्रवाल, पर्यटन मार्केटिंग एवं विकास, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, जयपूर

३. मोतीचंद, पारथी मा.कृ. (संपा.), सार्थवाहक, साहित्य अकादेमी, न्यू दिल्ली, दुसरी आवृत्ती, २०१०.

४. शर्मा आर. एस., एन्शट इंडिया, वासंती फडके (अनु.), के सागर प्रकाशन, पुणे, २००७

५. महाजन, वी.डी., भटनागर, महेश (संपा.), मध्यकालीन भारत, एस. चन्द एण्ड कंपनी लि., नई दिल्ली, २००९.

६. मोरलँड डब्ल्यु.एच., बनहट्टी राजेंद्र(अनु.),अकबर ते औरंगजेब, डायमंड पब्लिकेशन, पुणे प्रथमावृत्ती, २००६

७. Jag Pradeep.,*Tourism Development,* Murari Lal and Sons, New Delhi, 2008.

८. Kabia S.K., *Tourism Industry*, Reference Press, New Dehli, 2005.

९. Lowton Laura, Weaver, David, *Tourism Management*, Wiley Publication, 2000.

१०. Negi J. Manohar G., *Toursim*, B.R. Publication, New Delhi.

११. Nihalani Meeta, *Management of International Tourism,* RBSA Publishers, Jaipur.

१२. Shing Rantadip, *Toursm Today,* Volume-I, Delhi, 1994.

❑❑❑

**घटक २**

# भारतीय पर्यटन उद्योगाचा विकास

(Development of Indian Tourism Industry)

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ भारतीय पर्यटन विकास महामंडळ (Indian Tourism Development Corporation)

२.२.२ भारताचे पर्यटन धोरण (India's Tourism Policy)

२.२.३ भारतीय अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे महत्त्व (Importance of Tourism in Indian Economy)

२.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

२.४ सारांश

२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ सरावासाठी स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे

२.८ संदर्भ ग्रंथ आणि पुस्तके


## २.० उद्दिष्टे

१. भारतीय पर्यटन विकास महामंडळाने राबविलेल्या योजनांचा अभ्यास करणे.

२. विविध कालखंडात राबविलेले भारतीय पर्यटन धोरणाचा अभ्यास करणे.

३. भारतीय अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे महत्त्व याचा अभ्यास करणे.

## २.१ प्रस्तावना

भारताचे पर्यटन क्षेत्र देशाच्या आर्थिक, सांस्कृतिक, आणि सामाजिक जीवनात एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. भारताची विविधता आणि वैविध्यपूर्ण वारसा देशात आणि जगभरातील पर्यटकांना आकर्षित करते. भारत हे सांस्कृतिक, ऐतिहासिक, आणि नैसर्गिक वैविध्याने भरलेले देश आहे, आणि या विविधतेमुळे भारताचे पर्यटन क्षेत्र जागतिक स्तरावर महत्त्वपूर्ण ठरते. भारताचे पर्यटन देशाच्या आर्थिक विकासात मोठे

योगदान देत आहे, हे क्षेत्र सांस्कृतिक प्रचार, आणि आंतरराष्ट्रीय संबंध सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले. हे क्षेत्र मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करते, विशेषतः असंघटित क्षेत्रात. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, स्थानिक विक्रेते, वाहतूक सेवा, गाईड, आणि हस्तकला व्यवसाय यांना पर्यटन क्षेत्रामुळे चांगला फायदा झाला आहे. पर्यटनाचे आर्थिक महत्त्व लक्षात घेता भारत सरकारने या उद्योगाच्या विकासासाठी विविध योजनाची अक्षमलबजावणी केली. या योजनांच्या माध्यमातून भारतीय पर्यटन उद्योगाला प्रोत्साहन दिले.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ भारतीय पर्यटन विकास महामंडळ (Indian Tourism Development Corporation)

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पर्यटन हा मानवाचा एक महत्त्वाचा आर्थिक व्यवसाय बनला आहे. या व्यवसायाचे वैशिष्ट्य म्हणजे जगातील विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांमध्ये तो विकसित होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पर्यटन विकासाला विशेष चालना मिळाली. कारण वाहतुकीची विविध साधने, विशेषत: हवाई वाहतूक या काळात मोठ्या प्रमाणात पसार झाला. त्यामुळे जगातील कोणत्याही भागात कमीत कमी वेळेत पोहोचणे शक्य झाले. या शतकाच्या उत्तरार्धात वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, राहणीमान, शिक्षणाचा प्रसार आणि इतर उद्योगांच्या विकासामुळे पर्यटनाला चालना मिळाली. यामुळे पर्यटन हा जागतिक व्यवसाय बनला. पर्यटनाचे आर्थिक महत्त्व लक्षात घेऊन जगातील विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांमध्ये पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. याच अनुषंगाने पर्यटन उद्योगाचे महत्त्व ओळखून भारत सरकारने सन १९६३ मध्ये पर्यटन उद्योगाच्या विकासासाठी 'झा समिती' गठित केली. झा समितीची मुख्य उद्दिष्टे भारतातील पर्यटन धोरणांचे पुनरावलोकन करणे, पर्यटनासंबंधी सरकारच्या धोरणांना अधिक प्रभावी बनविणे, पर्यटन पायाभूत सुविधा उभारणे, आणि देशात पर्यटन उद्योगाला चालना देणे हे होते. त्यावेळी पर्यटन क्षेत्राला अधिक व्यावसायिक, पारदर्शक आणि आधुनिक पद्धतींनी विकसित करण्याची गरज होती. समितीने पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी स्वतंत्र मंडळ नेमण्याची शिफारस केली. त्यानुसार १) भारतीय पर्यटन परिवहन महामंडळ, २) भारतीय पर्यटन महामंडळ, ३) हॉटेल कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात आली. ही तिन्ही मंडळे स्वतंत्रपणे काम करू लागल्याने त्यांच्यात समन्वयाचा अभाव दिसून आला. त्यामुळे तिन्ही महामंडळांचे विलीनीकरण १ ऑक्टोबर १९६६ रोजी भारतीय पर्यटन विकास महामंडळाची (ITDC) स्थापना करण्यात आली. या महामंडळाला पर्यटन स्थळांचा विकास, पायाभूत सुविधांचा विकास, पर्यटन स्थळांचा प्रचार आणि विविध पर्यटन महोत्सवांचे आयोजन करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. भारतीय पर्यटन विकास महामंडळाने देशात पर्यटन क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम हाती घेतले. त्याच्या स्थापनेमागील काही महत्त्वाचे उद्देश खालीलप्रमाणे होते:

**१. पर्यटन पायाभूत सुविधा उभारणी:**

देशातील पर्यटनस्थळांवर हॉटेल्स, लॉज, रेस्टॉरंट्स, आणि अन्य निवास व्यवस्था उभारून पर्यटकांना दर्जेदार सेवा प्रदान करणे. तसेच रस्ते, वाहतूक, आणि अन्य मूलभूत सुविधांची उभारणी करून देशात पर्यटनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे.

**२. पर्यटनाचे प्रचार आणि प्रसार:**

भारतातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, आणि नैसर्गिक स्थळांचे जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार करणे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करता येईल.

**३. पर्यटकांना विविध सुविधा उपलब्ध करणे:**

हॉटेल्स व्यवस्थापन, टूर ऑपरेटर सेवा, वाहतूक सेवा, मार्गदर्शन सेवा, आणि अन्य पर्यटन सेवा पुरवणे. तसेच आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत पर्यटकांना सोयीस्कर आणि सुरक्षित प्रवास अनुभव प्रदान करणे.

**४. भारताच्या सांस्कृतिक वारशाचे संवर्धन आणि प्रचार:**

भारतीय संस्कृती, परंपरा, कला, आणि हस्तकलेचा प्रसार करून पर्यटनाला चालना देणे. त्याचबरोबर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून देशाच्या सांस्कृतिक वारशाचे जतन करणे आणि पर्यटनाच्या माध्यमातून जगासमोर सादर करणे.

**५. पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती:**

पर्यटन क्षेत्रात हॉटेल व्यवस्थापन, वाहतूक, आणि मार्गदर्शन सेवा यांसारख्या क्षेत्रांत रोजगाराच्या संधी निर्माण करणे. तसेच स्थानिक समुदायांचा पर्यटनाच्या उपक्रमांमध्ये समावेश करून ग्रामीण आणि शहरी भागात रोजगाराच्या संधी वाढवणे.

**६. सहकार्य आणि भागीदारी:**

खाजगी क्षेत्रासह सहकार्याने हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, आणि अन्य पर्यटन-संबंधित व्यवसायांच्या उभारणीसाठी प्रोत्साहन देणे आणि विविध राज्य सरकारांसह आणि खाजगी क्षेत्रातील उद्योगांशी भागीदारी करून पर्यटन क्षेत्रात प्रगती साधणे.

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने भारतीय पर्यटन विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्याच्या विविध उपक्रमांमुळे देशातील पर्यटन पायाभूत सुविधा, सेवा, आणि पर्यटकांच्या अनुभवात मोठी सुधारणा झाली आहे. भारतीय पर्यटन विकास महामंडळाने पर्यटन विकासासाठी दिलेल्या योगदानाची माहिती पुढीलप्रमाणे,

## ● हॉटेल्स आणि निवासव्यवस्थांच्या विकास:

**१. अशोक ग्रुप ऑफ हॉटेल्स (Ashok Group of Hotels):**

अशोक ग्रुप ऑफ हॉटेल्स ही भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या अंतर्गत एक प्रतिष्ठित हॉटेल्सची मालिका आहे. ही हॉटेल्स पर्यटनासाठी महत्त्वाच्या ठिकाणी उभारण्यात आली आहेत. याचबरोबर अशोक हॉटेल्स भारतातील विविध शहरांमध्ये आहेत, जसे की दिल्ली, जयपूर, कोलकाता, चेन्नई, बेंगळुरू, पाटणा, इत्यादी. या हॉटेल्समध्ये विविध प्रकारच्या निवासव्यवस्था, रेस्टॉरंट्स, आणि अन्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच अशोक ग्रुप हॉटेल्सने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सेवा पुरवल्या, ज्यामुळे विदेशी पर्यटकांना उत्तम अनुभव मिळाला.

**२. देशभरात हॉटेल्स आणि निवास सुविधा उभारणी:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळानने भारतातील विविध प्रमुख पर्यटन स्थळांवर हॉटेल्स, लॉजेस, गेस्ट हाऊसेस आणि टूरिस्ट कॉम्प्लेक्स उभारले. यामुळे पर्यटकांना निवासाची चांगली सोय उपलब्ध झाली. याचबरोबर बुद्ध सर्किट, गंगटोक, ऋषिकेश, पोर्टब्लेअर, आणि अन्य पर्यटनस्थळांवर भारतीय पर्यटन विकास महामंडळाने विविध प्रकारच्या निवास सुविधांची निर्मिती केली.

**३. पर्यटकांचे बजेट आणि आवश्यकता लक्षात घेऊन हॉटेल्स:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने विविध बजेट असलेल्या पर्यटकांसाठी निवासाची सोय केली. त्यांनी लक्झरी हॉटेल्स पासून ते मिड-रेंज आणि बजेट हॉटेल्सपर्यंत विविध प्रकारच्या हॉटेल्स उभारल्या. यामुळे पर्यटकांना त्यांच्या बजेटनुसार निवासव्यवस्था उपलब्ध झाल्या, ज्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटक दोघांनाही फायदा झाला.

**४. आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय दर्जाच्या सुविधांची उपलब्धता:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने आपल्या हॉटेल्समध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सेवा आणि सुविधा पुरवल्या. यामध्ये रेस्टॉरंट्स, कॉन्फरन्स हॉल्स, बँक्वेट्स, आणि इतर सुविधा समाविष्ट होत्या. अशोक ग्रुप ऑफ हॉटेल्स च्या माध्यमातून भारतीय पर्यटन विकास महामंडळाने अनेक आंतरराष्ट्रीय पातळीवरील परिषदा, सेमिनार्स, आणि इव्हेंट्स आयोजित केले.

**५. MICE पर्यटन (Meetings, Incentives, Conferences, Exhibitions):**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने हॉटेल्सच्या माध्यमातून MICE पर्यटनला मोठी चालना दिली. त्यांनी कॉन्फरन्स आणि सेमिनार्ससाठी विशेष सुविधा पुरवल्या. त्यांच्या हॉटेल्समध्ये मोठे कन्व्हेन्शन सेंटर्स आणि बँक्वेट हॉल्स उपलब्ध केले, ज्याचा उपयोग व्यवसाय आणि व्यापार पर्यटनासाठी करण्यात आला.

**६. सांस्कृतिक आणि स्थानिक अनुभवांची जोड:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने त्यांच्या हॉटेल्समध्ये भारतीय संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडवले. हॉटेल्सच्या डिझाइनपासून ते त्यांच्या सेवा आणि खाद्यपदार्थांमध्ये भारतीयता झळकली. विविध ठिकाणी स्थानिक हस्तकला, कला, आणि खाद्य संस्कृतीला प्रोत्साहन देऊन भारतीय पर्यटन विकास महामंडळाने पर्यटकांना स्थानिक अनुभव मिळवून दिला.

**७. खाजगीकरण आणि अद्ययावत सेवा:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने आपल्या काही हॉटेल्सचे खाजगीकरण केले, ज्यामुळे त्यांचा विकास अधिक व्यावसायिक आणि आधुनिक पद्धतीने झाला. खाजगी कंपन्यांशी भागीदारी करून हॉटेल्सच्या सेवांचे आधुनिकीकरण करण्यात आले. हॉटेल्सच्या या सुविधांमध्ये तांत्रिक सुधारणा, डिजिटल बुकिंग, आणि ई-सेवांचे समावेश करून पर्यटकांना सोयीस्कर सेवा पुरवण्यात आल्या.

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने हॉटेल्स आणि निवासव्यवस्थांच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. अशोक ग्रुप ऑफ हॉटेल्स आणि अन्य निवास सुविधांद्वारे भारतीय पर्यटन विकास महामंडळाने भारतातील पर्यटन पायाभूत सुविधा उभारून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना उत्कृष्ट अनुभव दिला आहे. यामुळे भारताचे पर्यटन क्षेत्र अधिक आकर्षक आणि स्पर्धात्मक बनले आहे.

## ● ट्रॅव्हल आणि टूर ऑपरेशन सेवा:

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने पर्यटनासंबंधित सेवा पुरविण्यासाठी ट्रॅव्हल एजन्सी, टूर ऑपरेशन, आणि वाहतूक व्यवस्थापनाच्या सेवा पुरवल्या. या माध्यमातून भारतीय पर्यटन विकास महामंडळाने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी सोयीसुविधा निर्माण केल्या.

**१. ट्रॅव्हल एजन्सी सेवांमध्ये प्राविण्य:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने 'ट्रॅवल विंग्ज' **(Travel Wings)** नावाने ट्रॅव्हल एजन्सीची सेवा सुरू केली, जी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही प्रकारच्या पर्यटकांसाठी ट्रॅव्हल बुकिंग सेवा पुरवते. या सेवांमध्ये विमान, ट्रेन, बस, आणि अन्य प्रवासी वाहतूक सेवा बुकिंग, तसेच हॉटेल बुकिंग आणि पर्यटन स्थळांची माहिती पुरवणे यांचा समावेश आहे.

**२. व्यापक टूर पॅकेजेसची उपलब्धता:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी विविध टूर पॅकेजेस तयार केली आहेत, जसे की ऐतिहासिक स्थळे, धार्मिक पर्यटन, साहसी पर्यटन, आणि सांस्कृतिक पर्यटन यांच्यावर आधारित पॅकेजेस. या टूर पॅकेजेसमध्ये ट्रान्सपोर्ट, हॉटेल्स, मार्गदर्शन, आणि अन्य सुविधांचा समावेश केला जातो, ज्यामुळे पर्यटकांना संपूर्ण सेवा एका ठिकाणी मिळतात.

### ३. विदेशी पर्यटकांसाठी विशेष सेवा:

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने विदेशी पर्यटकांसाठी विशेष पॅकेजेस आणि सेवा विकसित केल्या आहेत. या सेवांमध्ये विदेशी पर्यटकांना त्यांच्या गरजांनुसार टूर प्लानिंग, मार्गदर्शन, आणि भाषांतर सुविधा दिल्या जातात. भारतात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय पर्यटकांना स्थानिक संस्कृती, परंपरा, आणि वारसा समजून घेण्यासाठी भारतीय पर्यटन विकास महामंडळाने स्थानिक आणि खासगी मार्गदर्शकांच्या सेवांचे आयोजन केले.

### ४. ई–टूरिझम सेवा:

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने आपली सेवा अधिक सुलभ आणि सोयीस्कर करण्यासाठी ई–टूरिझम सेवा सुरू केली आहे. पर्यटकांना ऑनलाइन बुकिंग, टूर पॅकेज निवड, आणि पेमेंट सेवा एकाच प्लॅटफॉर्मवर मिळते. या डिजिटल सुविधांमुळे पर्यटकांना प्रवासाचे नियोजन करणे अधिक सोपे झाले आहे.

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने लक्झरी ट्रेनच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. लक्झरी ट्रेन पर्यटनामुळे पर्यटकांना भारतातील समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा अनुभवण्याची अनोखी संधी मिळते. भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या आणि व्यवस्थापित करण्यात आलेल्या लक्झरी ट्रेन सेवा भारतातील पर्यटन उद्योगाला एक नवीन ओळख देतात.

## • लक्झरी ट्रेन पर्यटन

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने लक्झरी ट्रेनच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. लक्झरी ट्रेन पर्यटनामुळे पर्यटकांना भारतातील समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा अनुभवण्याची अनोखी संधी मिळते. भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या आणि व्यवस्थापित करण्यात आलेल्या लक्झरी ट्रेन सेवा भारतातील पर्यटन उद्योगाला एक नवीन ओळख देतात.

### १. पॅलेस ऑन व्हील्स (Palace on Wheels):

'पॅलेस ऑन व्हील्स' ही भारतातील सर्वात प्रसिद्ध लक्झरी ट्रेनपैकी एक आहे. भारतीय पर्यटन विकास महामंडळ आणि राजस्थान सरकारच्या संयुक्त प्रयत्नांतून ही ट्रेन सुरू करण्यात आली होती. १९८२ मध्ये सुरू झालेली "Palace on Wheels" पर्यटकांना भारतातील राजेशाही अनुभव आणि ऐतिहासिक स्थळांचे दौरे करण्याची संधी देते. या ट्रेनमधून राजस्थानातील प्रसिद्ध किल्ले, महाल, आणि सांस्कृतिक वारसा स्थळांना भेट दिली जाते. या ट्रेनमध्ये आरामदायक आणि लक्झरी केबिन्स, खास डाइनिंग रेस्टॉरंट्स, राजेशाही सजावट, आणि शाही सेवांच्या सुविधा उपलब्ध आहेत.

### २. महाराज एक्सप्रेस (Maharajas' Express):

'महाराज एक्सप्रेस' ही आणखी एक प्रसिद्ध लक्झरी ट्रेन आहे, जी भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या प्रयत्नांतून विकसित करण्यात आली आहे. ही ट्रेन इ.स.२०१० मध्ये सुरू करण्यात आली.

महाराज एक्सप्रेस विविध मार्गांवर चालवली जाते, ज्यामध्ये उत्तर भारतातील ऐतिहासिक ठिकाणांचा समावेश आहे. काही लोकप्रिय मार्गांमध्ये दिल्ली, आग्रा, जयपूर, वाराणसी, उदयपूर, रणथंबोर, खजुराहो यांसारख्या पर्यटन स्थळांना भेट दिली जाते. महाराज एक्सप्रेस ला तिच्या उत्कृष्ट सेवांसाठी जगभरात प्रशंसा मिळाली आहे, आणि तिला आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. या ट्रेनमधून पर्यटकांना विविध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठिकाणांना भेट देण्याची संधी मिळते. ट्रेनमध्ये फाईव्ह-स्टार हॉटेल्सच्या सोयीसुविधा आहेत.

**३. द गोल्डन चेरियट (The Golden Chariot) :**

'द गोल्डन चेरियट' ही भारतीय पर्यटन विकास महामंडळ आणि कर्नाटक सरकारच्या संयुक्त प्रयत्नांतून सन २००८ सुरू करण्यात आलेली लक्झरी ट्रेन आहे. ही ट्रेन दक्षिण भारतातील सांस्कृतिक, ऐतिहासिक, आणि नैसर्गिक स्थळांना भेट देते. द गोल्डन चेरियट मधून कर्नाटक, तामिळनाडू, आणि केरळमधील विविध ठिकाणांवर पर्यटनाची संधी दिली जाते. या ट्रेनमध्ये आरामदायक केबिन्स, राजेशाही सजावट, आणि उत्कृष्ट खाद्यपदार्थांच्या सुविधा दिल्या जातात.

**४. रॉयल राजस्थान ऑन व्हील्स (Royal Rajasthan on Wheels):**

'रॉयल राजस्थान ऑन व्हील्स' ही ट्रेन इ. स २००९ मध्ये सुरू करण्यात आली, आणि ती पॅलेस ऑन व्हील्स च्या यशानंतर सुरू करण्यात आली होती. ही लक्झरी ट्रेन राजस्थानातील प्रसिद्ध किल्ले आणि महाल यांच्यासह अन्य ऐतिहासिक स्थळांना भेट देते. ट्रेनमध्ये लक्झरी केबिन्स, शाही जेवण, आणि उत्कृष्ट सेवा दिली जातात. ही ट्रेन पर्यटकांना एक राजेशाही अनुभव देण्याचे उद्दिष्ट ठेवते.

**५. डेक्कन ओडीसी (Deccan Odyssey) :**

'डेक्कन ओडीसी' ही महाराष्ट्र टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (MTDC) च्या सहकार्याने सन २००४ साली भारतीय पर्यटन विकास महामंडळाने विकसित केलेली आणखी एक लक्झरी ट्रेन आहे. ही ट्रेन पश्चिम आणि दक्षिण भारतातील महत्त्वाच्या पर्यटन स्थळांना भेट देते. विशेषतः महाराष्ट्रातील अजंठा-वेरूळ लेण्या, गोवा, आणि गुजरातमधील स्थळांना ही ट्रेन जोडते. ट्रेनमध्ये आलिशान केबिन्स, स्वादिष्ट आंतरराष्ट्रीय खाद्यपदार्थ, आणि उत्कृष्ट मार्गदर्शन सुविधा दिल्या जातात.

## • अतुल्य भारत मोहिमेचा प्रचार

''अतुल्य भारत'' (Incredible India) मोहिम भारत सरकारची एक प्रमुख पर्यटन प्रचार मोहिम आहे, जी २००२ साली मध्ये भारतातील विविधता आणि सांस्कृतिक वारसा दर्शवण्यासाठी सुरू करण्यात आली. भारतीय पर्यटन विकास महामंडळने ''अतुल्य भारत'' (Incredible India) मोहिमेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, आणि नैसर्गिक वैभव प्रदर्शित करून, भारतीय पर्यटन विकास महामंडळाने जगभरातील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी एक सशक्त व्यासपीठ निर्माण केले आहे. ''अतुल्य भारत'' मोहिमेने भारतीय पर्यटनाच्या विविध अंगांना एकत्र करून, भारताच्या समृद्ध पर्यटन वारशाला आणि आधुनिक सुविधांना एकत्रितपणे जगासमोर आणले आहे. या मोहिमेने भारतातील निसर्ग,

सांस्कृतिक विविधता, आणि अध्यात्मिक संपदा यांना उजाळा दिला आहे, ज्यामुळे भारताकडे जगभरातील पर्यटकांचे आकर्षण वाढले आहे.

## • संस्कृतीवर आधारित इव्हेंट्स आणि महोत्सव

भारतीय पर्यटन विकास महामंडळने सांस्कृतिक पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध इव्हेंट्स आणि महोत्सव आयोजित केले आहेत. या कार्यक्रमांचे उद्दिष्ट भारतीय संस्कृती, कला, आणि परंपरेचा प्रचार करणे आणि स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देणे आहे. येथे काही प्रमुख संस्कृतीवर आधारित इव्हेंट्स आणि महोत्सवांची माहिती दिली आहे:

**१. खजुराहो नृत्य महोत्सव (Khajuraho Dance Festival):**

खजुराहो, मध्य प्रदेश प्रत्येक वर्षी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात 'खजुराहो नृत्य महोत्सव'चे आयोजन केले जाते. हा महोत्सव भारतीय शास्त्रीय नृत्याचे प्रदर्शन करतो, ज्यात भरतनाट्यम, कथक, ओडिसी, कुचिपुडी, आणि मोहिनीअट्टम यांचा समावेश आहे. खजुराहोच्या विश्वविख्यात मंदिरांच्या पार्श्वभूमीवर हे नृत्यांचे प्रर्दशन होते.

**२. कोणार्क नृत्य महोत्सव (Konark Dance Festival):**

कोणार्क, ओडिशा येथे प्रत्येक वर्षी डिसेंबरमध्ये 'कोणार्क नृत्य महोत्सव'चे आयोजन केले जाते. हा महोत्सव कोणार्कच्या सूर्य मंदिराच्या अद्भुत वातावरणात आयोजित केला जातो. या महोत्सवात विविध भारतीय शास्त्रीय नृत्य शैलींचा समावेश असतो आणि स्थानिक तसेच राष्ट्रीय स्तरावरील कलाकारांचा सहभाग असतो.

**३. सूरजकुंड आर्ट्स मेला (Surajkund International Crafts Mela):**

सूरजकुंड, हरियाणा येथे प्रत्येक वर्षी फेब्रुवारीमध्ये 'सूरजकुंड आर्ट्स मेला'चे आयोजन केले जाते. हा महोत्सव स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय हस्तकलेला प्रोत्साहन देतो. या मेळ्यात हस्तनिर्मित वस्त्र, सजावटीचे सामान, आणि स्थानिक खाद्यपदार्थांची विक्री केली जाते. स्थानिक कलाकारांचे प्रर्दशन आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

**४. धन्वंतरी जयंती महोत्सव:**

वाराणसी, उत्तर प्रदेश येथे प्रत्येक वर्षी 'धन्वंतरी जयंती महोत्सव'चे आयोजन केले जाते. या महोत्सवात आयुर्वेद आणि भारतीय औषधीय परंपरेला प्रोत्साहन दिले जाते. विविध कार्यशाळा, चर्चासत्रे, आणि प्रदर्शन आयोजित केले जातात.

**५. कुंभ महापर्व:**

कुंभ मेळा प्रयागराज, हरिद्वार, नासिक, आणि उज्जैन येथे १२ वर्षांतून एकदा भरला जातो. कुंभ मेळा म्हणजे भारतीय धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वपूर्ण कार्यक्रम आहे. या महोत्सवात

जगभरातील साधू, संत, आणि भक्त एकत्र येतात. भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून या मेळ्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि शैक्षणिक कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

**६. दिल्ली हाट (Delhi Haat):**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने 'दिल्ली हाट' या स्थळावर स्थानिक हस्तकला आणि खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण केले आहे. येथे देशभरातील हस्तकला आणि विविध राज्यांचे खाद्यपदार्थ उपलब्ध असतात. हा कार्यक्रम वर्षभर चालतो.

**७. ताज महोत्सव:**

आग्रा येथे प्रत्येक वर्षी फेब्रुवारीमध्ये 'ताज महोत्सव' हा ताजमहलच्या सुंदरतेला आणि भारतीय सांस्कृतिक वारशाला समर्पित असतो. या महोत्सवात स्थानिक कला, हस्तकला, आणि खाद्यपदार्थांचे प्रदर्शन केले जाते.

भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या सांस्कृतिक इव्हेंट्स आणि महोत्सवांनी भारतीय संस्कृती, कला, आणि परंपरेला जागतिक स्तरावर लोकप्रिय करण्यास मदत केली आहे. या उपक्रमांनी स्थानिक कलाकारांना एक व्यासपीठ दिले आहे, आणि भारतीय विविधतेचा अनुभव घेण्यासाठी पर्यटकांना एक अद्वितीय संधी प्रदान केली आहे. भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या या प्रयत्नांमुळे भारतीय सांस्कृतिक पर्यटनाला एक नवीन दिशा मिळाली आहे.

## • धार्मिक पर्यटनाला चालना:

भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC) ने धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले आहेत. भारतात विविध धार्मिक स्थळे आणि तीर्थक्षेत्रे आहेत, ज्यामुळे देशभरातून लाखो श्रद्धाळू आणि पर्यटक येथे येतात. भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून या क्षेत्रात योगदान देणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या नुसार खालील योजना राबवण्यात आल्या.

**१. धार्मिक स्थळांचे संवर्धन:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने भारतातील महत्त्वाच्या धार्मिक स्थळांचे संवर्धन आणि विकास केला आहे. जसे की, हरिद्वार, ऋषिकेश, काशी, अमृतसर, तिरुपती, आणि उज्जैन यांसारखी स्थळे. या स्थळांचे चांगले व्यवस्थापन, स्वच्छता, आणि पर्यटकांसाठी सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात येते.

**२. संपूर्ण धार्मिक पॅकेजेस:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने धार्मिक स्थळांच्या आधारे पॅकेजेस विकसित केले आहेत, ज्या श्रद्धाळू व्यक्तींना धार्मिक स्थळांची सखोल माहिती व भेट घेण्याची संधी देतात. तीर्थयात्रा पॅकेजेसमध्ये गंगेच्या काठी वसलेले तीर्थक्षेत्र, पंढरपूर, आणि वैष्णो देवी यांसारखी प्रसिद्ध स्थळे समाविष्ट असतात. तसेच भारतीय पर्यटन विकास महामंडळाने विशेष पिल्ग्रिमेज ट्रेन सेवा सुरू केली आहे, ज्या श्रद्धाळू लोकांना

लोकप्रिय तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची सुविधा देतात. उदाहरणार्थ, ''धार्मिक रेल्वे पर्यटन'' द्वारे श्रद्धाळूंना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी सुविधा दिली जाते.

**३. आंतरराष्ट्रीय धार्मिक पर्यटन:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी विशेष धार्मिक टूर पॅकेजेस विकसित केले आहेत, जे भारतीय धार्मिक स्थळांचे महत्त्व जागतिक स्तरावर प्रदर्शित करतात. या पॅकेजेसमध्ये मुख्यतः बौद्ध, जैन, आणि हिंदू धार्मिक स्थळांचा समावेश असतो.

## ● साहसी पर्यटन विकास:

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने साहसी पर्यटनासाठी विविध साहसी क्रिडा प्रकारांची सोय केली, जसे ट्रेकिंग, राफ्टिंग, पॅराग्लायडिंग, आणि स्कूबा डायव्हिंग. हिमालय, गोवा, आणि अंडमान-निकोबारसारख्या ठिकाणांवर साहसी पर्यटनाला प्रोत्साहन दिले. भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या साहसी पर्यटन उपक्रमांमुळे देशात साहसी क्रिडा प्रकारांना अधिक आकर्षण प्राप्त झाले. भारतीय पर्यटन विकास महामंडळाने साहसी पर्यटन विकासासाठी विविध स्थानिक सरकारे, NGO's, आणि साहसी पर्यटनाच्या संस्थांसोबत सहयोग केले आहे. यामुळे स्थानिक कलाकार, क्रीडापटू, आणि छोटे व्यावसायिक यांना उपयुक्त संधी प्राप्त झाली.

भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या साहसी पर्यटन विकासाच्या प्रयत्नांनी भारतातील साहसी पर्यटनाला एक नवी दिशा मिळवली आहे. विविध साहसी पर्यटन पॅकेजेस, नैसर्गिक सौंदर्याचे संवर्धन, आणि स्थानिक मार्गदर्शक यामुळे पर्यटकांना रोमांचक आणि संस्मरणीय अनुभव प्राप्त होतो. भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या या उपक्रमांमुळे साहसी पर्यटनाच्या क्षेत्रात स्थानिक समुदायांचे योगदान वाढवले आहे आणि पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व देखील अधोरेखित केले आहे.

## ● वैद्यकीय पर्यटन क्षेत्रातील योगदान

भारतीय पर्यटन विकास महामंडळने भारतातील वैद्यकीय पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम आणि धोरणे राबवली आहेत. भारत वैद्यकीय पर्यटन क्षेत्रात एक प्रमुख केंद्र बनत आहे, कारण येथे उच्च गुणवत्तेची वैद्यकीय सेवा, तज्ञ डॉक्टर, अत्याधुनिक तंत्रज्ञान, आणि परवडणारी चिकित्सा उपचार उपलब्ध आहेत. भारतीय पर्यटन विकास महामंडळाने या क्षेत्राचा विकास करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**१. वैद्यकीय पर्यटन पॅकेजेस:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने वैद्यकीय पर्यटनासाठी विशेष पॅकेजेस तयार केले आहेत, ज्यात उपचारांसोबत पर्यटकांना भारतातील प्रसिद्ध स्थळांना भेट देण्याची सुविधा मिळते. या पॅकेजेसमध्ये उपचार, राहण्याची व्यवस्था, आणि पर्यटनाचा अनुभव समाविष्ट असतो. पॅकेजेसमध्ये प्रमुख शस्त्रक्रिया, सौंदर्य उपचार, आणि उपचारोत्तर काळजीसाठीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

**२. अंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचार:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतातील वैद्यकीय पर्यटनाचे प्रचार करण्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय पर्यटन मेळावे आणि प्रदर्शनांमध्ये सहभाग घेतला आहे. यामध्ये World Travel Market (WTM) आणि ITB Berlin सारख्या कार्यक्रमांत भारतातील वैद्यकीय पर्यटनाच्या संधींना जागतिक स्तरावर प्रमोट केले जाते.

**३. होलिस्टिक आणि आयुर्वेदिक उपचारांचा प्रचार:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने भारतातील पारंपरिक आयुर्वेदिक आणि होलिस्टिक उपचारांना प्रोत्साहन दिले आहे. या उपचारांमध्ये पंचकर्म, योग, ध्यान, आणि नैसर्गिक चिकित्सा यांचा समावेश आहे, ज्यामुळे पर्यटकांना मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठी संधी मिळते. केरळ आणि उत्तराखंड सारख्या राज्यांत आयुर्वेदिक उपचारांची वैशिष्ट्यपूर्ण केंद्रे आहेत, जे वैद्यकीय पर्यटकांना आकर्षित करतात.

भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या प्रयत्नांमुळे भारतातील वैद्यकीय पर्यटन क्षेत्राचा वेगाने विकास झाला आहे. उच्च दर्जाची आरोग्यसेवा, परवडणारे उपचार, आणि पर्यावरणीय व सांस्कृतिक विविधता यामुळे भारत जगभरातील वैद्यकीय पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या या धोरणात्मक उपाययोजनांमुळे वैद्यकीय पर्यटन क्षेत्रात भारताचे महत्त्व वाढले आहे, आणि भारत एक प्रमुख वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून उदयास आले आहे.

- **सांस्कृतिक पर्यटनाचा प्रचार**

भारतीय पर्यटन विकास महामंडळने सांस्कृतिक पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक उपक्रम राबवले आहेत. भारताची समृद्ध सांस्कृतिक विविधता, परंपरा, कला, संगीत, नृत्य, आणि सण-उत्सव यांचे महत्त्व दर्शवण्यासाठी भारतीय पर्यटन विकास महामंडळाने पुढील प्रकारे सांस्कृतिक पर्यटनाचा प्रचार केला आहे

**१. सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने विविध स्थानिक आणि राष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन केले आहे, जिथे पर्यटक भारतीय संस्कृतीच्या विविध पैलूंना अनुभवू शकतात. उदाहरणार्थ, दुर्गा पूजा, गणेश चतुर्थी, दीवाली, आणि होळी यांसारख्या उत्सवांमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात, ज्यात नृत्य, संगीत, आणि कला प्रदर्शनांचा समावेश असतो.

**२. आर्ट एंड क्राफ्ट प्रमोशन:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने भारतातील विविध हस्तकला आणि पारंपरिक कलेला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित केले आहेत. पर्यटकांना स्थानिक कलेची माहिती आणि अनुभव देण्यासाठी कार्यशाळा आणि प्रदर्शन आयोजित केले जातात. यामध्ये विविध प्रकारच्या हस्तकला जसे की काश्मीरी शॉल, पैठणी साडी, आणि वाराणसीच्या बनारसी साड्या यांचा समावेश होतो.

**३. स्थानिक कला आणि संस्कृतीचे प्रचार:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने स्थानिक कला आणि संस्कृतीचा प्रचार करण्यासाठी विविध डिजिटल माध्यमांचा वापर केला आहे. सोशल मीडिया, वेबसाइट, आणि ब्लॉगच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीला जागतिक स्तरावर प्रसिद्ध केले जाते.

भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या सांस्कृतिक पर्यटन प्रोत्साहनासाठीच्या उपक्रमांमुळे भारतीय संस्कृती जागतिक स्तरावर प्रसिद्ध झाली आहे. स्थानिक परंपरांचा जतन, विकास, आणि प्रचार यामुळे भारताची सांस्कृतिक वैभवता वाढली आहे, ज्यामुळे पर्यटकांना एक समृद्ध आणि अद्वितीय अनुभव मिळतो. भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या या उपक्रमांनी भारताला एक सांस्कृतिक पर्यटन केंद्र म्हणून जगभरात ओळखण्यास मदत केली आहे.

**स्वाध्याय**

**प्रश्न : रिकाम्या जागा भरा**

१. १ ऑक्टोबर १९६६ रोजी ............ विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

२. ............ हॉटेल्स ही भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या अंतर्गत एक प्रतिष्ठित हॉटेल्सची मालिका आहे.

३. भारतीय पर्यटन विकास महामंडळाने ............ नावाने ट्रॅव्हल एजन्सीची सेवा सुरू केली.

४. ............ ही भारतातील सर्वात प्रसिद्ध लक्झरी ट्रेन राजस्थान मधील पर्यटन स्थळांना भेट देते.

५. महाराज एक्सप्रेस ही प्रसिद्ध लक्झरी ट्रेन ............ मध्ये सुरू करण्यात आली.

## २.२.२ भारताचे पर्यटन धोरण (India's Tourism Policy)

भारताचे पर्यटन धोरण (India's Tourism Policy) हे देशातील पर्यटन उद्योगाच्या वाढीसाठी आणि त्याच्या क्षमता विकसित करण्यासाठी सरकारने आखलेले धोरण आहे. हे धोरण मुख्यतः पर्यटकांना आकर्षित करणे, पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करणे, आणि भारताच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक, धार्मिक, आणि नैसर्गिक वारशाचे संवर्धन करण्यावर केंद्रित आहे. पर्यटन धोरणाचा उद्देश देशातील वेगवेगळ्या राज्यांतील पर्यटन स्थळांना अधिक विकासाच्या दिशेने नेणे आहे. तसेच भारताचे पर्यटन धोरण देशातील सांस्कृतिक आणि नैसर्गिक संपत्तीचा समतोल साधत आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. भारत सरकारने पर्यटन धोरणानुसार विविध प्रकल्प आणि योजना राबवून पर्यटन क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण कामे केली आहेत. या कामांमुळे देशातील पर्यटनाच्या वाढीस चालना मिळाली आहे. खालीलप्रमाणे काही महत्त्वाच्या योजनांचा आणि प्रकल्पांचा उल्लेख करता येईल:

● **सन १९६१ च्या पहिल्या पर्यटन धोरणानुसार योजना:**

इ.स.१९६१ मध्ये भारताचे पहिले पर्यटन धोरण लागू करण्यात आले. हे धोरण भारतातील पर्यटन उद्योगाच्या विकासाला चालना देण्यासाठी तयार करण्यात आले होते. त्याचे उद्दिष्ट भारतातील पर्यटन क्षेत्राच्या समृद्धीसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि देशभरातील पर्यटन स्थळांचे प्रमोशन करणे हे होते. भारताचे पहिले पर्यटन धोरण इ.स.१९६१ आणि त्याअंतर्गत अमलात आणलेल्या योजना:

**१. पर्यटन स्थळांचा विकास:**

ऐतिहासिक, सांस्कृतिक, आणि नैसर्गिक स्थळांचे विकास करण्यात आले. यामध्ये प्रमुख पर्यटन स्थळांचे संरक्षण, पुनरुज्जीवन आणि सौंदर्यीकरण यावर भर दिला गेला.

**२. आधारभूत सुविधा:**

प्रमुख पर्यटन स्थळांवर रस्ते, रेल्वे, आणि हवाई वाहतूक सुधारण्यावर विशेष लक्ष दिले. पर्यटकांच्या सोयीसाठी सार्वजनिक वाहतूक सुविधांचा विकास करण्यात आला.

**३. हॉटेल्स आणि निवास सुविधा:**

हॉटेल्सच्या गुणवत्तेत सुधारणा आणि नवीन हॉटेल्सचे विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. तसेच पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या विविध निवास सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला.

**४. प्रशिक्षण आणि जनजागृती:**

पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सामान्य जनतेत पर्यटनाचे महत्त्व वाढवण्यासाठी जनजागृती अभियान राबवण्यात आले.

**५. सांस्कृतिक कार्यक्रम:**

भारतीय संस्कृती, कला, आणि परंपरांचे संवर्धन करण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, उत्सव, आणि मेळे आयोजित करण्यात आले.

**६. संवर्धन आणि प्रचार:**

''इंडिया टूरिझम'' हा ब्रँड निर्माण करून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे पर्यटन स्थळांचे प्रमोशन करण्यात आले. विविध प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करून भारतातील पर्यटन स्थळांची माहिती जगभरात पसरवण्यात आली.

**७. आंतरराष्ट्रीय सहकार्य:**

इतर देशांच्या पर्यटन संस्थांसोबत सहयोग साधून अनुभव आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्याचा प्रयत्न केला.

८. **प्रशासनिक सुधारणा:**

१४ मार्च १९६७ रोजी भारतात 'पर्यटन आणि नागरी वाहतूक मंत्रालय' ची स्थापना करण्यात आली. या मंत्रालयाची स्थापना भारतातील पर्यटन क्षेत्राच्या समृद्धीसाठी आणि नागरी वाहतूक व्यवस्थेच्या सुधारणा करण्यासाठी करण्यात आली होती. पर्यटन मंत्रालयाची स्थापना करून भारतात पर्यटनाच्या विकासासाठी विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती केली.

इ. स.१९६१ च्या भारताच्या पहिले पर्यटन धोरणाने पर्यटन क्षेत्राला एक ठोस आधार दिला आणि यामुळे पुढील काळात पर्यटनाची महत्त्वपूर्ण वाढ झाली. या धोरणानुसार राबवलेल्या योजनांनी भारतातील पर्यटन व्यवसायाचा विकास साधण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले.

## • सन १९८२ च्या पर्यटन धोरणानुसार योजना :

इ.स.१९८२ मध्ये भारताने आपले दुसरे पर्यटन धोरण सादर केले, ज्यात पर्यटन क्षेत्राच्या महत्त्वाला मान्यता देण्यात आली. भारताचे इ.स.१९८२ चे पर्यटन धोरण हे देशातील पर्यटन क्षेत्राच्या नियोजन आणि विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा होता. इ.स.१९८२ च्या धोरणाचा उद्देश पर्यटन क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे आणि त्याद्वारे रोजगार निर्मिती, विदेशी चलन वाढवणे आणि देशाच्या सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे होता. खालील योजनांचा समावेश होता:

१. **भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC):**

पर्यटन क्षेत्रात पायाभूत सुविधा, हॉटेल्स, ट्रॅव्हल एजन्सीज, आणि पर्यटनाशी संबंधित इतर सेवांचा विकास करण्यासाठी भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC) चा विस्तार करण्यात आला. भारतीय पर्यटन विकास महामंडळ ने भारतातील महत्त्वाच्या पर्यटन स्थळांवर हॉटेल्स, लॉज, आणि पर्यटकांच्या सुविधा निर्माण करण्यावर भर दिला.

२. **धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनाचा विकास:**

इ.स. १९८२ च्या धोरणाने भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि धार्मिक वारशाला प्रोत्साहन दिले. धार्मिक स्थळांचा विकास करण्यासाठी विशेषत: वाराणसी, तिरुपती, बद्रीनाथ, आणि अजमेर शरीफ यांसारख्या तीर्थस्थळांचे पायाभूत सुविधांच्या दृष्टीने विकास केला. तसेच धार्मिक स्थळांसाठी पर्यटन सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष योजना आखण्यात आल्या.

३. **राष्ट्रीय पर्यटन सर्किट्स:**

पर्यटनाच्या विविध प्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी थीम-आधारित राष्ट्रीय सर्किट्स तयार करण्याची योजना राबवण्यात आली. उदाहरणार्थ, ऐतिहासिक पर्यटनासाठी दिल्ली-आग्रा-जयपूर (गोल्डन ट्रायंगल) सर्किट, आणि धार्मिक पर्यटनासाठी वाराणसी-खजुराहो सर्किट.

### ४. पर्यटन सेवा विस्तार:

हॉटेल्स आणि ट्रॅव्हल सेवा सुधारण्यासह विविध सेवा उद्योगांमध्ये गुंतवणूक वाढवण्याची योजना राबवली गेली. स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना अधिक चांगली सेवा मिळवण्यासाठी पर्यटन सेवा पुरवणाऱ्या एजन्सींचा विस्तार करण्यात आला. स्थानिक मार्गदर्शक, ट्रॅव्हल एजंट, आणि टुर ऑपरेटर्स यांना प्रशिक्षण देण्याच्या योजना हाती घेतल्या गेल्या.

### ५. साहसी आणि निसर्ग पर्यटनाला प्रोत्साहन:

पर्यावरणपूरक पर्यटन, साहसी पर्यटन (उदा. ट्रेकिंग, पर्वतारोहण, राफ्टिंग) आणि वन्यजीव पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध सर्किट्स तयार करण्यात आले. त्याचबरोबर हिमालयीन प्रदेश, राजस्थानातील वाळवंट भाग, आणि केरळ व कर्नाटकातील जंगल पर्यटन स्थळांचा विकास करण्यात आला.

### ६. पर्यटकांच्या सोयीसाठी पायाभूत सुविधा विकसित करणे:

प्रमुख पर्यटन स्थळांवर हवाई, रेल्वे, आणि रस्ते दळणवळण व्यवस्था सुधारण्याचे काम हाती घेण्यात आले. तसेच हॉटेल्स, लॉजेस, टुरिस्ट बंगलोज, आणि सार्वजनिक सुविधा उभारण्यावर भर दिला गेला. त्याचबरोबर पर्यटन स्थळांवर स्वच्छता, आरोग्य सुविधा, आणि वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी योजना आखण्यात आल्या.

### ७. आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करणे:

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या पर्यटन स्थळांचा प्रचार करण्यासाठी विविध प्रचार मोहिमा राबवल्या. भारतातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, आणि नैसर्गिक स्थळांच्या आकर्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटन प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले.

### ८. पर्यटन माहिती केंद्रे:

विविध पर्यटन स्थळांवर आणि प्रमुख शहरांमध्ये पर्यटन माहिती केंद्रे स्थापन करण्यात आली, ज्यातून पर्यटकांना पर्यटन स्थळांची माहिती, पर्यटन सेवा, आणि स्थानिक आकर्षणे यासंबंधी माहिती मिळू शकते.

### ९. हॉस्पिटॅलिटी आणि प्रशिक्षण कार्यक्रम:

इ. स. १९८२ च्या धोरणात पर्यटन उद्योगातील सेवा दर्जा सुधारण्यासाठी हॉस्पिटॅलिटी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आले. विविध हॉटेल व्यवस्थापन संस्थांची स्थापना करण्यात आली, ज्यातून तरुणांना प्रशिक्षण दिले जाऊन त्यांना पर्यटन आणि अतिथी सेवा उद्योगात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

इ. स. १९८२ च्या पर्यटन धोरणानुसार राबवलेल्या या योजनांनी भारतातील पर्यटनाचा पाया मजबूत केला. धार्मिक, सांस्कृतिक, साहसी, आणि ऐतिहासिक पर्यटनाला चालना देणाऱ्या योजना आणि पायाभूत सुविधांच्या विकासामुळे भारताचे पर्यटन क्षेत्र पुढील काळात अधिक सक्षम झाले. यामुळे देशातील पर्यटन वाढवणे, रोजगार निर्मिती, आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे हे उद्दिष्ट साध्य करण्यात आले.

## • सन १९९७ च्या पर्यटन धोरणानुसार योजना:

इ. स. १९९७ च्या पर्यटन धोरणानुसार भारतातील पर्यटनाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना आणि धोरणे राबवण्यात आली. या धोरणाचा मुख्य उद्देश होता पर्यटनाला रोजगार निर्मितीचे साधन बनवणे, पायाभूत सुविधांचा विकास करणे, आणि विविध पर्यटन प्रकारांना चालना देणे. या धोरणात खासकरून परकीय चलन मिळवणे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकट करणे यावर भर दिला गेला. खालीलप्रमाणे काही महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली:

**१. थीम आधारित पर्यटन विकास योजना:**

इ स.१९९७ च्य च्या धोरणानुसार, थीम-आधारित पर्यटन सर्किट्स तयार करण्यात आले. यामध्ये भारताच्या विविध प्रदेशांतील सांस्कृतिक, ऐतिहासिक, धार्मिक, आणि साहसी पर्यटन स्थळांना प्रोत्साहन देण्याचे काम झाले. उदाहरणार्थ, धार्मिक सर्किट्स, साहसी सर्किट्स, ऐतिहासिक सर्किट्स, आणि वन्यजीव सर्किट्स यांचा विकास करण्यात आला. तसेच गोल्डन ट्रायंगल (दिल्ली-आग्रा-जयपूर) आणि दक्षिण भारतीय मंदिर सर्किट यांसारख्या पर्यटन सर्किट्समध्ये गुंतवणूक वाढवण्यात आली.

**२. वैयक्तिक आणि खासगी क्षेत्रातील सहभाग :**

इ स.१९९७ च्या धोरणाने खासगी क्षेत्राला पर्यटनाच्या पायाभूत सुविधांच्या विकासात सहभागी होण्याचे प्रोत्साहन दिले. खासगी गुंतवणूक आणि सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून हॉटेल्स, रिसॉर्ट्स, आणि इतर पर्यटनाशी संबंधित सुविधा विकसित करण्यात आल्या. या धोरणामुळे भारतातील पर्यटन उद्योगात खासगी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची झाली.

**३. पर्यटन क्षेत्रातील रोजगार निर्मिती:**

पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून स्थानिक आणि ग्रामीण स्तरावर रोजगार निर्मितीवर विशेष भर दिला गेला. हॉटेल व्यवस्थापन, गाइड सेवा, स्थानिक हस्तकला, आणि इतर पर्यटनाशी संबंधित व्यवसायांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. विशेषत: ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी स्थानिक कौशल्ये आणि हस्तकलेला प्रोत्साहन देण्यात आले.

**४. पर्यटन प्रचार आणि विपणन योजना:**

भारताच्या विविध पर्यटन स्थळांचा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचार करण्यासाठी व्यापक विपणन मोहीम राबवण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय प्रदर्शन, प्रवासी महोत्सव, आणि परदेशी बाजारात भारताच्या पर्यटन स्थळांचा प्रचार करून आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला गेला. ''अतुल्य भारत'' (Incredible India) मोहिमेचा प्रारंभ याच धोरणाच्या पार्श्वभूमीवर पुढे २००२ मध्ये झाला.

**५. ईको–टूरिझमला प्रोत्साहन:**

इ स.१९९७ च्या धोरणात पर्यावरणपूरक पर्यटनाला (इको–टूरिझम) प्रोत्साहन देण्यात आले. नैसर्गिक सौंदर्यस्थळे, वन्यजीव अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने यांचा विकास करताना पर्यावरणीय शाश्वतता जपली गेली. जंगल सफारी, ट्रेकिंग, आणि बायोडायव्हर्सिटी संवर्धन कार्यक्रमांचा भाग म्हणून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आले.

**६. वैद्यकीय आणि वेलनेस पर्यटन (Medical and Wellness Tourism):**

भारताच्या वैद्यकीय सेवा, आयुर्वेद, योग, आणि नैसर्गिक उपचारांना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेऊन वैद्यकीय पर्यटनाला प्रोत्साहन दिले. वैद्यकीय सुविधांची जागतिक पातळीवर जाहिरात करण्यात आली, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटक भारतात उपचार घेण्यासाठी येऊ लागले.

**७. सांस्कृतिक आणि धार्मिक पर्यटन:**

भारतातील प्रमुख धार्मिक स्थळांचा विकास करून धार्मिक पर्यटनाला चालना देण्यात आली. यामध्ये विशेषतः वाराणसी, तिरुपती, हरिद्वार, अमृतसर आणि अजमेर यांसारख्या धार्मिक स्थळांचा समावेश होता. याचबरोबर सांस्कृतिक उत्सव, जत्रा, आणि धार्मिक कार्यक्रमांवर आधारित पर्यटन सेवा सुधारण्यात आल्या.

**८. माहिती तंत्रज्ञानाचा वापर (IT):**

पर्यटनाशी संबंधित माहिती सुलभ करण्यासाठी आणि सेवांची उपलब्धता वाढवण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला गेला. पर्यटनाच्या वेबसाइट्स, ऑनलाइन बुकिंग सुविधा, आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून पर्यटकांना अधिक चांगली सेवा दिली गेली.

**९. अंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत पर्यटनाला प्रोत्साहन:**

इ. स.१९९७ च्या धोरणात देशांतर्गत पर्यटन वाढवण्यावर विशेष भर दिला गेला. भारतीय नागरिकांना देशातील विविध पर्यटन स्थळे पाहण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी विविध प्रचार मोहिमा राबवण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी भारताचे विविध पर्यटन उत्पादने, जसे की सांस्कृतिक पर्यटन, साहसी पर्यटन, आणि वैद्यकीय पर्यटन यांची जाहिरात करण्यात आली.

इ. स.१९९७ च्या पर्यटन धोरणाने भारतातील पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी एक व्यापक आराखडा तयार केला. या धोरणात थीम–आधारित पर्यटन सर्किट्स, पायाभूत सुविधा विकास, आंतरराष्ट्रीय प्रचार, आणि स्थानिक रोजगार निर्मितीवर विशेष भर दिला गेला. या धोरणामुळे भारतातील पर्यटन उद्योगाला मोठी चालना मिळाली, आणि पर्यटन हा भारताच्या आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा घटक बनला.

## ● सन २००२ च्या पर्यटन धोरणानुसार योजना :

इ.स.२००२ च्या पर्यटन धोरणानुसार भारतातील पर्यटन उद्योगाच्या विकासासाठी विविध महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. या धोरणाचा मुख्य उद्देश पर्यटनाला देशाच्या आर्थिक वाढीचे प्रमुख साधन बनवणे, रोजगार निर्मिती, परकीय चलन मिळवणे, आणि विविध पर्यटन प्रकारांना चालना देणे

हा होता. इ.स. २००२ नंतर पर्यटन धोरणात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा उंचावणे यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. खालीलप्रमाणे इ.स. २००२ च्या धोरणानुसार राबवलेल्या काही प्रमुख योजनांची माहिती दिली आहे:

### १. ''अतुल्य भारत'' (Incredible India) मोहीम:

इ.स. २००२ मध्ये सुरू करण्यात आलेली ''अतुल्य भारत'' मोहीम भारतातील पर्यटनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देणारी एक महत्त्वाची जाहिरात मोहीम होती. या मोहिमेचा उद्देश भारताचे सांस्कृतिक, नैसर्गिक, आणि ऐतिहासिक स्थळे, तसेच विविधता दाखवणे आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करणे होता. या मोहिमेच्या माध्यमातून भारताच्या पर्यटन स्थळांची जागतिक स्तरावर व्यापक प्रचार मोहीम राबवण्यात आली.

### अतिथी देवो भवः

''अतिथी देवो भवः'' पर्यटन संकल्पना भारत सरकारने २००९ साली सुरू केली. या मोहिमेचा उद्देश भारतातील पर्यटन क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आदरातिथ्याची उत्कृष्ट सेवा पुरवणे हा होता. विशेषत: हॉटेल कर्मचारी, टॅक्सी चालक, पर्यटक मार्गदर्शक आणि इतर सेवा पुरवठादारांना प्रशिक्षित करून त्यांना पर्यटकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सक्षम करणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट होते.ही मोहीम भारताच्या ''इन्क्रेडिबल इंडिया'' (अतुल्य भारत) अभियानाचा एक भाग होती, ज्याद्वारे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या पर्यटन स्थळांचा प्रचार करण्यात आला. ''अतिथी देवो भवः'' मोहिमेने भारताच्या पारंपरिक आदरातिथ्य परंपरेला जागतिक पातळीवर अधोरेखित केले आणि भारतात येणाऱ्या पर्यटकांना सुरक्षित, स्वागतार्ह आणि आनंददायक अनुभव मिळावा यावर भर दिला.

### २. वैद्यकीय पर्यटन (Medical Tourism) आणि वेलनेस पर्यटन:

इ.स.२००२ च्या धोरणात वैद्यकीय पर्यटन आणि वेलनेस पर्यटन यांना विशेष प्रोत्साहन दिले गेले. भारताच्या अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांचा प्रचार करण्यात आला, ज्यामुळे परदेशी पर्यटक उपचारांसाठी भारतात येऊ लागले. भारतातील आयुर्वेद, योग, आणि निसर्गोपचार यांचा प्रचार करून वेलनेस पर्यटनाला देखील चालना देण्यात आली. तसेच प्रमुख शहरांमध्ये अत्याधुनिक हॉस्पिटल्सची उभारणी करून पर्यटकांसाठी आकर्षक उपचार पॅकेजेस तयार करण्यात आली.

### ३. थीम–आधारित पर्यटन विकास योजना:

इ.स. २००२ च्या पर्यटन धोरणात विविध थीम–आधारित पर्यटन सर्किट्स विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

धार्मिक, साहसी, ऐतिहासिक, आणि ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी भारतभरातील विविध पर्यटन सर्किट्स तयार करण्यात आली. उदाहरणार्थ, बौद्ध सर्किट, रामायण सर्किट, ताजमहल सर्किट इ. धार्मिक स्थळे आणि सांस्कृतिक पर्यटन स्थळांचा विशेष विकास करण्यात आला.

### ४. ई–व्हिसा सुविधा (E-Visa):

परदेशी पर्यटकांसाठी व्हिसा प्रक्रिया सुलभ करण्यासाठी ई–व्हिसा सुविधा सुरू करण्यात आली. यामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी भारतात येण्याची प्रक्रिया जलद आणि सोपी झाली. या सुविधेचा फायदा उठवत अनेक परदेशी पर्यटकांनी भारतात प्रवेश केला, ज्यामुळे पर्यटन उद्योगात वाढ झाली.

### ५. सांस्कृतिक पर्यटनाला चालना:

इ.स. २००२ च्या धोरणात भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला अधिक प्रोत्साहन देण्यात आले. विशेषतः देशातील विविध राज्यांतील सांस्कृतिक उत्सव, हस्तकला, आणि परंपरांचा प्रचार करण्यात आला. तसेच खजुराहो उत्सव, कुंभ मेळा, पुष्कर मेळा, आणि इतर स्थानिक उत्सवांच्या माध्यमातून सांस्कृतिक पर्यटनाची लोकप्रियता वाढली.

### ६. ग्रामीण पर्यटनाला चालना:

इ.स. २००२ च्या धोरणात ग्रामीण पर्यटन हा एक महत्त्वाचा घटक बनवण्यात आला. ग्रामीण भागातील स्थानिक संस्कृतीचा अनुभव घेण्यासाठी आणि स्थानिक हस्तकलेला प्रोत्साहन देण्यासाठी ग्रामीण पर्यटन स्थळांचा विकास करण्यात आला. स्थानिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था मजबूत करण्यात आली.

### ७. ईको–टूरिझम (Eco-Tourism):

पर्यावरणीय शाश्वतता जपण्यासाठी आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनासाठी ईको–टूरिझम योजनेला प्रोत्साहन दिले गेले. नैसर्गिक पर्यटन स्थळे, वन्यजीव अभयारण्ये, आणि जैवविविधता हॉटस्पॉट्स यांचा विकास करण्यात आला. पर्यावरणपूरक पर्यटन स्थळांचा विकास करताना स्थानिक समुदायांच्या सहभागावर भर दिला गेला.

इ.स. २००२ च्या पर्यटन धोरणाने भारताच्या पर्यटन क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू केला. ‘‘अतुल्य भारत’’ मोहीम, वैद्यकीय पर्यटन, आणि ई–व्हिसा यांसारख्या उपक्रमांमुळे भारताच्या पर्यटन उद्योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली. पर्यटन पायाभूत सुविधा, थीम–आधारित पर्यटन सर्किट्स, आणि ग्रामीण तसेच ईको–टूरिझम यासारख्या योजनांमुळे पर्यटन क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्यात यश मिळाले.

## • सन २०१४ च्या पर्यटन योजना:

भारताने २०१४ मध्ये राष्ट्रीय पर्यटन धोरण अंतिम स्वरूपात लागू केलेले नाही, परंतु या वर्षी काही महत्त्वाचे उपक्रम आणि धोरणात्मक बदल प्रस्तावित करण्यात आले होते. इ.स.२०१४ नंतरच्या काळात भारत सरकारने पर्यटनाच्या क्षेत्रात व्यापक सुधारणा आणि विकास करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजनांची अंमलबजावणी केली. या योजनांचा उद्देश देशातील पर्यटन पायाभूत सुविधा, सेवा, आणि पर्यटकांच्या

संख्येत वाढ करणे हा होता. या काळात पर्यटनाच्या विविध क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात आले, जसे की धार्मिक, सांस्कृतिक, साहसी, ईको-टूरिझम, आणि वैद्यकीय पर्यटन.

**१. स्वदेश दर्शन योजना (Swadesh Darshan Scheme):**

इ.स. २०१५ मध्ये सुरू झालेली स्वदेश दर्शन योजना ही थीम-आधारित पर्यटन सर्किट्सच्या विकासावर लक्ष केंद्रित करणारी योजना आहे. या योजनेचा उद्देश देशातील सांस्कृतिक, ऐतिहासिक, आणि धार्मिक स्थळांचा सर्वांगीण विकास करणे आहे.विविध थीम-आधारित सर्किट्स तयार करण्यात आले आहेत, जसे की, बौद्ध सर्किट, रामायण सर्किट, तटीय सर्किट, आदिवासी सर्किट, ईको-टूरिझम सर्किट तसेच वाळवंट सर्किट. या योजनेद्वारे पर्यटन स्थळांवरील पायाभूत सुविधा, प्रवेश सुविधा, स्वच्छता, आणि इतर सेवांचा विकास करण्यात आला आहे.

**२. प्रासाद योजना (Pilgrimage Rejuvenation and Spiritual Augmentation Drive):**

इ.स.२०१४ मध्ये सुरू झालेली प्रासाद (PRASAD) योजना धार्मिक स्थळांच्या विकासावर लक्ष केंद्रित करते. तीर्थयात्रेच्या ठिकाणांवर पायाभूत सुविधा, स्वच्छता, वाहतूक आणि पर्यटकांसाठी आवश्यक सेवा सुधारण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेंतर्गत वाराणसी, तिरुपती, अमृतसर, मथुरा, अजमेर, गंगटोक इत्यादी धार्मिक स्थळांचा समावेश करण्यात आला. धार्मिक स्थळांच्या सभोवतालच्या परिसराचा विकास करून तीर्थयात्री आणि पर्यटकांसाठी अधिक चांगल्या सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.

**३. ''अतुल्य भारत'' (Incredible India) २.० मोहीम:**

इ.स.२०१७ मध्ये ''अतुल्य भारत'' २.० मोहीम मोहिमेला सुरुवात झाली, ज्यामध्ये भारताच्या पर्यटन स्थळांची आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक आकर्षक पद्धतीने जाहिरात करण्यात आली. नवीन माध्यमांद्वारे (जसे की सोशल मीडिया, डिजिटल मार्केटिंग) भारताच्या पर्यटन स्थळांचा प्रचार करण्यात आला, ज्यामुळे विशेषतः तरुण पिढीतील आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांमध्ये मोठी लोकप्रियता मिळाली. तसेच या मोहिमेअंतर्गत भारतातील साहसी, वैद्यकीय, वेलनेस, आणि सांस्कृतिक पर्यटन स्थळांना प्रोत्साहन दिले गेले.

**४. ई-व्हिसा सुविधा विस्तार:**

ई-व्हिसा सुविधा अधिक देशांमध्ये विस्तार करण्यात आली. सुरुवातीला ४३ देशांसाठी असलेली ई-व्हिसा सुविधा १६० पेक्षा अधिक देशांमध्ये लागू करण्यात आली. यामुळे पर्यटकांना भारतात येणे सोपे झाले, आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. ई-व्हिसा प्रक्रियेला जलद आणि सोयीस्कर बनवण्यात आले, ज्यामुळे पर्यटकांना अधिक आकर्षक आणि सोपी अनुभव मिळू लागला.

**५. आयकॉनिक साइट्सचा विकास:**

इ.स.२०१९ मध्ये आयकॉनिक साइट्सचा विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला, ज्यामध्ये भारतातील १७ प्रमुख पर्यटन स्थळांचा सर्वांगीण विकास करण्यात आला. ताजमहाल, लाल किल्ला, कुतुब मिनार,

हुमायून्स टॉम्ब, अजंठा-वेरूळ लेणी, हम्पी इत्यादी स्थळांचा पायाभूत सुविधा, वाहतूक आणि पर्यटकांसाठी सेवांचा विकास करण्यात आला. या स्थळांना जागतिक दर्जाच्या पर्यटन स्थळांमध्ये बदलण्याचा उद्देश होता, जेणेकरून आंतरराष्ट्रीय पर्यटन वाढवता येईल.

**६. ईको-टूरिझम आणि साहसी पर्यटनाला चालना:**

सरकारने ईको-टूरिझम आणि साहसी पर्यटन यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना आखल्या आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करताना पर्यावरणपूरक पर्यटन वाढवण्यावर भर दिला गेला. हिमालयीन प्रदेश, वाळवंट, जंगल सफारी, आणि समुद्र किनारे यांसारख्या स्थळांवर साहसी खेळ, ट्रेकिंग, रिव्हर राफ्टिंग इत्यादींचा विकास करण्यात आला. ईको-फ्रेंडली पर्यटन सर्किट्स तयार करून स्थानिक समुदायांच्या रोजगार निर्मितीवर देखील भर दिला गेला.

**८. मानव संसाधन विकास आणि कौशल्य विकास योजना:**

पर्यटन क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी ''मानव संसाधन विकास'' आणि ''कौशल्य विकास'' या क्षेत्रावर विशेष लक्ष देण्यात आले. हॉटेल व्यवस्थापन, पर्यटन मार्गदर्शन, आणि पर्यटन सेवांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करून अधिक रोजगार संधी निर्माण करण्यात आल्या.

**९. डिजिटल पर्यटन (Digital Tourism):**

डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यटन सुविधांचा विकास करण्यात आला. यामध्ये पर्यटन माहिती सुलभ करण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा वापर करण्यात आला. ई-तिकीटिंग, मोबाइल ॲप्स, डिजिटल गाईड, व्हर्च्युअल रिॲलिटी, आणि स्मार्ट कार्ड्सच्या माध्यमातून पर्यटकांना अधिक सुलभ सेवा उपलब्ध करून दिल्या गेल्या.

इ.स.२०१४ नंतरच्या पर्यटन सुधारणा या काळात भारतातील पर्यटन क्षेत्रात एक नवीन युग सुरू झाले. या काळात राबवलेल्या विविध योजनांनी भारतातील पर्यटन पायाभूत सुविधा, सेवा, आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटन उद्योगाची ओळख वाढवली. सरकारच्या प्रयत्नांमुळे भारताच्या पर्यटन क्षेत्राचा सर्वांगीण विकास झाला, ज्यामुळे पर्यटकांना अधिक चांगला अनुभव मिळाला, आणि आर्थिक विकासाला चालना मिळाली.

## • सन २०२२ च्या राष्ट्रीय पर्यटन धोरणानुसार योजना

राष्ट्रीय पर्यटन धोरण २०२२ चा उद्देश भारताच्या पर्यटन क्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे आणि २०४७ पर्यंत भारताला जागतिक पातळीवरील सर्वोत्तम पर्यटनस्थळांमध्ये अग्रगण्य बनवणे हा आहे. या धोरणात अनेक महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या, ज्यामुळे पर्यटन उद्योगाला चालना मिळावी, पर्यटकांचा अनुभव अधिक समृद्ध व्हावा, आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला हातभार लागावा. राष्ट्रीय पर्यटन धोरण २०२२ नुसार केलेल्या सुधारणा:

**१. शाश्वत पर्यटनाचा प्रचार:**

पर्यावरणपूरक पर्यटन: राष्ट्रीय पर्यटन धोरण २०२२ च्या अंतर्गत पर्यावरणीय पर्यटनाला विशेष प्रोत्साहन दिले जाते. यामध्ये ईको-टूरिझम प्रकल्प, हरित स्थळे, आणि जैवविविधतेचे जतन करणारे उपक्रम हाती घेतले गेले. तसेच स्थानिक समुदायांना पर्यटन व्यवसायात सामील करून रोजगार निर्मितीवर भर दिला जातो.

**१. पर्यटन पायाभूत सुविधा सुधारणा:**

पर्यटन स्थळांवर प्रवेश सुलभ करण्यासाठी उडान योजना (UDAN) अंतर्गत कमी खर्चाच्या विमानसेवा सुरू करण्यात आल्या. हाय-स्पीड रेल्वे आणि रस्ते नेटवर्कच्या सुधारणेसाठी विशेष प्रयत्न करण्यात आले, ज्यामुळे देशांतर्गत प्रवास सुलभ झाला. पर्यटन स्थळांवर स्वच्छता, सुरक्षा, आणि पर्यटकांसाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवण्यात आल्या.

**२. सुरक्षितता आणि स्वच्छता:**

कोविड-१९ महामारीनंतर सुरक्षिततेसाठी उपाययोजना आणि स्वच्छता यावर भर दिला गेला. सुरक्षित पर्यटन या तत्त्वावर आधारित मानके ठरवण्यात आली. स्वच्छ भारत अभियानाशी संबंधित उपक्रमांद्वारे पर्यटन स्थळांची स्वच्छता राखली जाते.

**३. उद्योग आणि रोजगार विकास:**

स्थानिक समुदायांना पर्यटन उद्योगात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. स्थानिक उत्पादनांचा वापर आणि पर्यटनाशी संबंधित सेवांचा विकास यावर भर दिला जातो. पर्यटन उद्योगात खासगी क्षेत्राचे योगदान वाढवण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) मॉडेलचा अवलंब करण्यात आला आहे.

**४. जागतिक स्तरावर प्रचार:**

भारताचे जी २० अध्यक्षपद २०२३ मध्ये प्रचाराचे एक माध्यम म्हणून वापरण्यात आले, ज्याद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय पर्यटन स्थळांचा प्रचार करण्यात आला. इन्क्रेडिबल इंडिया मोहिमेअंतर्गत भारताच्या विविध पर्यटन स्थळांचा प्रचार जगभरात केला गेला.

## व्हिजिट इंडिया मोहीम (Visit India Year Campaign)

व्हिजिट इंडिया मोहीम (Visit India Year Campaign) ही भारत सरकारने २०२३ साली सुरू केलेली एक महत्त्वाकांक्षी मोहीम आहे. या मोहिमेचा उद्देश भारताला एक जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून प्रस्थापित करणे आणि देशातील विविधतेने परिपूर्ण पर्यटन स्थळांना प्रोत्साहन देणे आहे. ही मोहीम विशेषतः २०२३ हे साल ''व्हिजिट इंडिया वर्ष'' म्हणून साजरे करण्यासाठी सुरू करण्यात आली, आणि यामुळे जागतिक स्तरावरील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी भारताच्या सांस्कृतिक, नैसर्गिक, आणि ऐतिहासिक पर्यटन क्षेत्रांना वाढवण्याचा प्रयत्न केला गेला.

राष्ट्रीय पर्यटन धोरण २०२२ हे भारताच्या पर्यटन क्षेत्राला जागतिक स्तरावर नेण्यासाठी तयार करण्यात आले आहे. या धोरणामध्ये शाश्वतता, थीम-आधारित पर्यटन, डिजिटल तंत्रज्ञान, आणि पर्यावरणपूरक विकास यावर विशेष भर देण्यात आला आहे.

**स्वाध्याय**

**प्रश्न : रिकाम्या जागा भरा**

१. ............ मध्ये भारताचे पहिले पर्यटन धोरण लागू करण्यात आले.

२. ............ मोहिमेने भारताच्या पारंपरिक आदरातिथ्य परंपरेला जागतिक पातळीवर अधोरेखित केले

३. इ.स. २०१५ मध्ये सुरू झालेली ............ योजना ही थीम-आधारित पर्यटन सर्किट्सच्या विकासावर लक्ष केंद्रित करणारी योजना आहे.

४. इ.स.२०१४ मध्ये सुरू झालेली प्रासाद योजना ............ स्थळांच्या विकासावर लक्ष केंद्रित करते.

५. २०२३ हे वर्ष ............ म्हणून साजरे करण्यासाठी सुरू करण्यात आली.

## २.२.३ भारतीय अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे महत्त्व (Importance of Tourism in Indian Economy)

भारतीय अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे महत्त्व खूप मोठे आहे. पर्यटन क्षेत्र हे रोजगारनिर्मिती, परकीय चलन कमाई, आणि सामाजिक-आर्थिक विकासाला चालना देणारे एक महत्त्वाचे साधन आहे. भारतातील समृद्ध सांस्कृतिक वारसा, नैसर्गिक सौंदर्य, आणि ऐतिहासिक ठिकाणे जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात. खाली भारतीय अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे महत्त्व दिले आहे:

**१. रोजगार निर्मिती:**

भारतात पर्यटन क्षेत्रातून थेट आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीचे योगदान खूप मोठे आहे. पर्यटन क्षेत्र हे श्रमप्रधान असून, रोजगार निर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. २०२३ च्या आसपासच्या आकडेवारीनुसार पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होत आहेत. खालील आकडेवारी थेट आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीचे काही महत्त्वाचे पैलू दर्शवते:

**थेट रोजगार:**

पर्यटन हे श्रमप्रधान क्षेत्र आहे, ज्यामुळे हॉटेल्स, वाहतूक, रेस्टॉरंट्स, प्रवासी सेवा, आणि सांस्कृतिक केंद्रे यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये कोट्यवधी लोकांना रोजगार मिळतो. २०२३ सालच्या अंदाजानुसार, भारतातील पर्यटन क्षेत्रात सुमारे ३.२ कोटी लोकांना थेट रोजगार मिळतो. एकंदरीत भारतीय अर्थव्यवस्थेत पर्यटन क्षेत्रातून सुमारे ६.८% थेट रोजगार मिळतो. यामध्ये हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, टूर ऑपरेटर्स, प्रवासी मार्गदर्शक, आणि प्रवासी सेवांचा समावेश होतो.

**अप्रत्यक्ष रोजगार:**

अप्रत्यक्ष रोजगार म्हणजे अशा क्षेत्रांमध्ये रोजगार मिळणे जे थेट पर्यटनाशी संबंधित नसले तरी त्याचा प्रभाव पर्यटनाच्या मागणीनुसार असतो. अप्रत्यक्ष पद्धतीने भारतात पर्यटन क्षेत्रातून सुमारे ६.५ कोटी लोकांना अप्रत्यक्ष रोजगार मिळतो. एकूण अप्रत्यक्ष रोजगाराची टक्केवारी सुमारे १३-१४ % आहे. यामध्ये हस्तकला, बांधकाम, कृषी, आणि अन्य पुरवठादार क्षेत्रांचा समावेश आहे, जे पर्यटनाच्या वाढीसाठी आवश्यक आहेत.

पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून एकत्रित थेट आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळवून सुमारे सुमारे २०२३ सालात ९.७ कोटी लोकांना रोजगार दिला आहे. एकूण पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून सुमारे २०% रोजगार निर्मिती केली आहे, ज्यामुळे हे क्षेत्र रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते.

२. **GDP मध्ये योगदान:**

भारतातील पर्यटन क्षेत्राचा GDP मध्ये महत्त्वाचा वाटा आहे, कारण तो आर्थिक विकास, रोजगार निर्मिती, सांस्कृतिक समृद्धी, आणि सामाजिक स्थिरतेसाठी एक महत्त्वाचे साधन आहे. पर्यटन क्षेत्रामुळे स्थानिक आणि राष्ट्रीय स्तरावर अर्थव्यवस्थेचा विकास होतो, आणि यामुळे भारताची आर्थिक स्थिरता आणि समृद्धी वाढते.

**GDP मध्ये थेट योगदान:**

इ. स. २०२३ च्या आकडेवारी नुसार भारताच्या GDP मध्ये पर्यटन क्षेत्राचे थेट योगदान सुमारे ९.२% होते. हे म्हणजे पर्यटनाच्या उद्योगांद्वारे थेट उत्पन्नाचा हिस्सा होता. यामध्ये हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, प्रवासी सेवा, आणि इतर पर्यटनाशी संबंधित व्यवसाय या थेट योगदानात समाविष्ट आहेत.

**GDP मध्ये अप्रत्यक्ष योगदान:**

इ.स. २०२३ च्या आकडेवारी नुसार पर्यटन क्षेत्राचे अप्रत्यक्ष योगदान GDP मध्ये ६-७% होते. यामध्ये पर्यटनाच्या मागणीनुसार इतर उद्योगांचे योगदान समाविष्ट आहे. यामध्ये कृषि, हस्तकला, बांधकाम, आणि वाहतूक क्षेत्रातील रोजगार, जे पर्यटनाच्या वाढीसाठी आवश्यक असतात, हे अप्रत्यक्ष योगदानात समाविष्ट आहे.

**३. परकीय चलन :**

पर्यटन हे परकीय चलन मिळवण्याचे प्रमुख साधन आहे. परदेशी पर्यटकांच्या खर्चामुळे भारतात मोठ्या प्रमाणात परकीय चलनाची आवक होते. आंतरराष्ट्रीय पर्यटक हॉटेल्स, खरेदी, वाहतूक आणि इतर सेवांवर मोठ्या प्रमाणात खर्च करतात, ज्यामुळे परकीय चलनवाढ होते. इ. स.२०२३ च्या आकडेवारी नुसार पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून भारताला सुमारे ३० बिलियन (सुमारे ₹२.५ लाख कोटी) परकीय चलन कमाई केली. भारताच्या पर्यटन क्षेत्रातून येणारे परकीय चलन कमाईचे योगदान अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. हे

क्षेत्र आर्थिक विकास, रोजगार निर्मिती, आणि सांस्कृतिक समृद्धीला प्रोत्साहन देते. भारताच्या आंतरराष्ट्रीय ओळखीला आणि आर्थिक स्थिरतेला चालना देण्यात पर्यटन क्षेत्राचे महत्त्वपूर्ण स्थान आहे.

### ४. पायाभूत सुविधांचा विकास:

भारतातील पर्यटन क्षेत्राचा विकास पायाभूत सुविधांच्या उभारणीवर अवलंबून आहे. पायाभूत सुविधा म्हणजे आधारभूत संरचना जी एक उद्योग किंवा क्षेत्राच्या कार्यासाठी आवश्यक असते. पर्यटन क्षेत्रात यामध्ये हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, सार्वजनिक वाहतूक, रस्ते, रेल्वे, विमानतळ, आणि इतर विविध सेवा समाविष्ट आहेत. खालील मुद्दे भारतात पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून पायाभूत सुविधांचा विकास स्पष्ट करतात:

**सार्वजनिक वाहतूक प्रणाली:**

भारतातील रेल्वे प्रणाली जगातील सर्वात मोठ्या रेल्वे नेटवर्कपैकी एक आहे. भारतीय रेल्वेने पर्यटन स्थळांना जोडण्यासाठी विशेष ट्रेन सेवा सुरू केल्या आहेत, जसे की ''गोल्डन चॅरियट'' आणि ''महाराजा एक्सप्रेस.'' तसेच राज्य सरकारांच्या बस सेवा आणि प्रायवेट ट्रान्सपोर्ट ऑपरेटरद्वारे पर्यटन स्थळांपर्यंत पोहोचण्यासाठी विस्तृत बस सेवा उपलब्ध केल्या आहेत.

**रस्ते आणि राजमार्ग:**

राष्ट्रीय महामार्ग विकासाच्या कार्यक्रमामुळे पर्यटन स्थळांना जोडणारे रस्ते विकसित केले गेले आहेत, जेणेकरून पर्यटक सहजतेने एक स्थळावरून दुसऱ्या स्थळावर जातात. त्याचबरोबर राज्य सरकारांनी स्थानिक पर्यटन स्थळांना सहजतेने पोहोचण्यासाठी स्थानिक महामार्ग विकसित केले आहेत.

**विमानतळ विकास:**

भारतातील प्रमुख शहरांमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळांची उभारणी करण्यात आली आहे, ज्यामुळे परदेशी पर्यटकांना प्रवेश सुलभ झाला आहे. सरकारी धोरणांमुळे पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक आकर्षित केली जात आहे.

**हॉटेल आणि निवास व्यवस्था:**

भारतात विविध श्रेणीतील हॉटेल्स, रिसॉर्ट्स, आणि गेस्ट हाऊसेसची वाढ झाली आहे. लक्झरी हॉटेल्सपासून साध्या गेस्ट हाऊसपर्यंत अनेक पर्याय उपलब्ध आहेत. हॉटेल्समध्ये आधुनिक सुविधा आणि सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विकासात्मक उपाययोजना घेतल्या जात आहेत.

**सामाजिक पायाभूत सुविधा:**

पर्यटन स्थळांवर विजेची उपलब्धता वाढवली जात आहे, ज्यामुळे पर्यटन उद्योगाला मदत मिळते. त्याचबरोबर पर्यटन स्थळांवर पाणीपुरवठा आणि स्वच्छतेच्या उपाययोजनांवर विशेष लक्ष दिले जात आहे, ज्यामुळे पर्यटकांना चांगली सुविधा मिळते.

**सरकारी धोरणे :**

''स्वदेश दर्शन योजना'', ''प्रसाद योजना'' आणि ''इको-टूरिझम'' यांसारख्या योजनांद्वारे पायाभूत सुविधांच्या विकासाला प्रोत्साहन मिळत आहे. पर्यटन उद्योगामध्ये गुंतवणूक वाढवण्यासाठी अनेक प्रोत्साहन योजना लागू करण्यात आल्या आहेत.

भारतातील पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून पायाभूत सुविधांचा विकास हे एक महत्त्वाचे अंग आहे, जे आर्थिक विकास, रोजगार निर्मिती, आणि सामाजिक समृद्धीसाठी आवश्यक आहे. विकासात्मक योजनांमुळे पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यात येत आहेत, ज्यामुळे भारताच्या पर्यटन क्षेत्राला एक सकारात्मक भविष्य प्राप्त होत आहे.

**५. सांस्कृतिक वारसा संवर्धन आणि रोजगार निर्मिती :**

पर्यटनामुळे ऐतिहासिक स्थळे, सांस्कृतिक ठिकाणे, आणि पारंपरिक कलेचे संरक्षण आणि संवर्धन होण्यास मदत होते. यामुळे स्थानिक लोकांना आपल्या वारशाचा अभिमान वाटतो आणि जागतिक स्तरावर भारतीय संस्कृतीचा प्रचार होतो. तसेच पर्यटनामुळे सांस्कृतिक देवाण-घेवाण होते, ज्यामुळे परदेशी पर्यटक भारतीय परंपरा आणि रीतीभाती समजू शकतात, आणि भारतीय लोकांना आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटतो.यामुळे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांची देखभाल आणि संवर्धन करण्यासाठी गुंतवणूक केली जात आहे. यामध्ये संग्रहालये, स्मारके, आणि वारसा स्थळांचा समावेश आहे. विविध आंतरराष्ट्रीय इव्हेंट्स, महोत्सव, आणि प्रदर्शनांच्या आयोजनामुळे पर्यटन स्थळांचे महत्व वाढवले जात आहे. यातून स्थानिक कला, हस्तकला, संगीत, नृत्य, आणि परंपरा जागरूकता प्राप्त करतात. या माध्यमातून स्थानिक कलाकारांना रोजगार प्राप्त होण्यास मदत झाली आहे.

**६. प्रदेशीय आर्थिक विकास :**

भारतातील पर्यटन क्षेत्र प्रदेशीय आर्थिक विकासाला महत्त्वपूर्ण चालना देते. पर्यटनामुळे स्थानिक आणि क्षेत्रीय पातळीवर आर्थिक घडामोडी वाढत जाऊन, रोजगार संधी निर्माण झाली आहे, आणि स्थानिक व्यवसायांना चालना मिळली आहे. त्याचबरोबर पर्यटनामुळे दुर्गम आणि कमी विकसित भागांमध्ये पायाभूत सुविधांची उभारणी केली गेल्यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागांना आर्थिक दृष्ट्या मजबूत बनण्यास मदत झाली आहे. पर्यटनामुळे भारतातील विविध प्रदेशांचा सर्वांगीण विकास होत आहे, ज्यामुळे देशाची आर्थिक प्रगतीही सशक्त होण्यास मदत झाली आहे.

**७. स्थानिक उद्योग आणि लघुउद्योगांना आधार:**

पर्यटनामुळे अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतात, जसे की स्थानिक शेतकरी, शिल्पकार, हस्तकला विक्रेते यांना रोजगार मिळतो. स्थानिक उत्पादकांवर आणि पुरवठादारांवर पर्यटकांच्या मागणीचा सकारात्मक परिणाम होतो. भारतातील विविध राज्यांतील स्थानिक हस्तकला आणि कलाकृतींना पर्यटकांकडून मोठी मागणी असते. विविध पर्यटन स्थळांवर स्थानिक कारागीर आणि व्यावसायिक पारंपरिक

वस्तू पर्यटकांना विकून आर्थिक विकासाला चालना दिली आहे. पर्यटन उद्योगात महिला उद्योजकता वाढत आहे, विशेषतः हस्तकला, रेस्टॉरंट्स, आणि पर्यटन सेवा क्षेत्रात महिलांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. त्याचबरोबर स्थानिक हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, आणि बाजारपेठांना पर्यटकांच्या येण्याने आर्थिक लाभ होतो, ज्यामुळे लघु उद्योगांना मोठी चालना मिळाली आहे.

**८. वैद्यकीय आणि आरोग्य पर्यटनाचा विकास:**

भारतात आरोग्य पर्यटन वाढीस लागले आहे. परदेशी पर्यटक परवडणाऱ्या आणि उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवांसाठी भारतात येतात, ज्यामुळे आरोग्य क्षेत्राला चालना मिळते. आयुर्वेद, योग, आणि नैसर्गिक उपचारांच्या माध्यमातून भारतात आरोग्य पर्यटनही लोकप्रिय होत आहे, ज्यामुळे पर्यटन क्षेत्राला अतिरिक्त लाभ मिळतो.

**९. सरकारी उपक्रम:**

इन्क्रेडिबल इंडिया मोहिमेच्या माध्यमातून भारतातील पर्यटनाला जागतिक स्तरावर प्रसिद्ध करण्यासाठी सुरू करण्यात आली होती. या मोहिमेमुळे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जागतिक स्तरावर मोठे आकर्षण निर्माण झाले. तसेच स्वदेश दर्शन आणि प्रसाद योजनांद्वारे थीम-आधारित पर्यटन सर्किट आणि धार्मिक स्थळांचा विकास करण्यात येतो, ज्यामुळे स्थानिक आणि परदेशी पर्यटकांची संख्या वाढण्यास मदत झाली. याचबरोबर ई-व्हिसा आणि प्रवासाच्या इतर सुविधांमुळे भारतात पर्यटन करणे सोपे झाले आहे, ज्यामुळे पर्यटकांचा ओघ वाढतो.अशा प्रकारच्या योजनांमुळे पर्यटन स्थळांची सुधारणा झाली आणि स्थानिक आर्थिक विकासाला चालना मिळली.

भारतीय अर्थव्यवस्थेत पर्यटन क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. रोजगार निर्मिती, परकीय चलन मिळवणे, क्षेत्रीय विकास, आणि सांस्कृतिक वारशाचे संवर्धन यामध्ये पर्यटनाचे मोठे योगदान आहे. योग्य गुंतवणूक, पायाभूत सुविधा, आणि शाश्वत पर्यटनाच्या धोरणांनी पर्यटन क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेच्या भविष्यवाढीचा एक महत्त्वाचा घटक ठरू शकते.

**स्वाध्याय**

**प्रश्न : रिकाम्या जागा भरा.**

१. भारतात पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून सुमारे ............ % रोजगार निर्मिती केली आहे.

२. इ. स.२०२३ च्या आकडेवारी नुसार भारताच्या GDP मध्ये पर्यटन क्षेत्राचे थेट योगदान सुमारे ............ % होते.

३. पर्यटन हे ............ मिळवण्याचे प्रमुख साधन आहे.

४. इ. स.२०२३ च्या आकडेवारी नुसार पर्यटन क्षेत्राच्यामाध्यमातून भारताला सुमारे ............ बिलियन परकीय चलन कमाई केले.

५. भारतातील ........... प्रणाली जगातील सर्वात मोठ्या रेल्वे नेटवर्कपैकी एक आहे.

## २.३ पारिभाषिक शब्द

१. GDP- Gross domestic product

२. अतुल्य - ज्याची तुलना नाही असे.

३. NGO's - Non-Governmental Organizations (NGOs)

४. होलिस्टिक- समग्र

५. वेलनेस निरोगीपणा

## २.४ सारांश

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने भारताच्या पर्यटन क्षेत्राच्या विकासामध्ये आणि जागतिक स्तरावर देशाच्या पर्यटनाची ओळख निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. पायाभूत सुविधा विकास, रोजगार निर्मिती, आणि सांस्कृतिक वारशाचे संवर्धन या सर्व बाबींमध्ये भारतीय पर्यटन विकास महामंडळाचा मोठा वाटा आहे, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला देखील चालना मिळते. तसेच भारतीय पर्यटन धोरणाचे महत्त्व भारताच्या सांस्कृतिक, आर्थिक, आणि सामाजिक विकासाच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाचे आहे. पर्यटन धोरणाचा उद्देश देशाच्या पर्यटन संसाधनांचा विकास, प्रचार, आणि नियोजन करणे हा आहे, ज्यामुळे स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला एक प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून ओळख मिळावी. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेतील पर्यटनाचे योगदान वाढते. भारताच्या पर्यटन क्षेत्रातून येणारे परकीय चलन कमाईचे योगदान अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. हे क्षेत्र आर्थिक विकास, रोजगार निर्मिती, आणि सांस्कृतिक समृद्धीला प्रोत्साहन देते. भारताच्या आंतरराष्ट्रीय ओळखीला आणि आर्थिक स्थिरतेला चालना देण्यात पर्यटन क्षेत्राचे महत्त्वपूर्ण स्थान आहे.

## २.५ स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे

अ. १. भारतीय पर्यटन २. अशोका ३. ट्रॅव्हल विंग्ज ४. पॅलेस ऑन व्हील्स

५. इ.स.२०१०

ब. १. इ. स.१९६१ २. अतिथी देवो भवः ३. स्वदेश दर्शन ४. धार्मिक

५. व्हिजिट इंडिया वर्ष

क. १. २० २. ९.२ ३. परकीय चलन ४. ३० ५. रेल्वे

## २.६ सरावासाठी प्रश्न

१. द गोल्डन चेरियट ही ........... सरकारच्या प्रयत्नांतून सुरू करण्यात आलेली लक्झरी ट्रेन आहे.

२. रॉयल राजस्थान ऑन व्हील्स ही ट्रेन ........... मध्ये सुरू करण्यात आली.

३. ........... ही महाराष्ट्र टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या सहकार्याने सुरू केलेली लक्झरी ट्रेन आहे.

४. ........... मोहिम भारत सरकारची एक प्रमुख पर्यटन प्रचार मोहिम आहे.

५. ........... मध्ये 'खजुराहो नृत्य महोत्सव'चे आयोजन केले जाते.

६. ........... येथे प्रत्येक वर्षी डिसेंबरमध्ये 'कोणार्क नृत्य महोत्सव'चे आयोजन केले जाते.

७. ........... येथे प्रत्येक वर्षी 'धन्वंतरी जयंती महोत्सव'चे आयोजन केले जाते.

८. 'दिल्ली हाट' या स्थळावर ........... प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण केले आहे.

९. 'ताज महोत्सव' हा ........... च्या सुंदरतेला आणि भारतीय सांस्कृतिक वारशाला समर्पित असतो.

१०. भारतीय पर्यटन विकास महामंडळाने पिल्ग्रिमेज ट्रेनच्या माध्यमातून लोकप्रिय ........... भेट देण्याची सुविधा देते.

## २.७ सराव प्रश्नांची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १. कर्नाटक | २. इ. स २००९ | ३. डेक्कन ओडीसी | ४. अतुल्य भारत |
| ५. मध्य प्रदेश | ६. ओडिशा | ७. वाराणसी | ८. स्थानिक हस्तकला |
| ९. ताजमहल | १०. तीर्थक्षेत्रांना | | |

## २.८ संदर्भ


1. A.K. Bhatia, Tourism Development: Principles and Practice, Sterling Publishers, New Delhi, 2006.
2. Ratandeep Singh, Tourism in India: Planning & Development, Kanishka Publishers, New Delhi, 2000.
3. K.K. Sharma, Tourism and Development: Economic, Social, and Environmental Issues, Sarup & Sons, New Delhi, 2004.
4. R.N. Kaul, Dynamics of Modern Tourism, Kanishka Publishers, New Delhi, 1998.
5. Ashok Dhamija, Tourism Policy and Planning in India, Adhyayan Publishers, New Delhi, 2008.
6. K.K. Sharma, Tourism and Development in India, Sarup & Sons, New Delhi,2005.
7. Ratandeep Singh, Tourism in India: Policy and Planning, Kanishka Publishers, New Delhi, 1998.
8. K.K. Sharma, Tourism and Economic Development in India Sarup & Sons, New Delhi, 2004.


❑❑❑

## घटक १
# पर्यटन विपणन धोरण
(Tourism Marketing Policies)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

- १.२.१ संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटना (UNWTO)
- १.२.२ भारतीय पर्यटन मंत्रालय
- १.२.३ पर्यटनातील कायदे आणि नैतिकता (Laws and Ethics of Tourism)

१.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ सरावासाठी स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे

१.७ संदर्भ ग्रंथ आणि पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यास पुढील घटकांचे आकलन होण्यास मदत होईल.

- संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटनेमार्फत जागतिक पर्यटन विकासाला कशा पद्धतीने चालना दिली याबद्दल सविस्तरपणे सांगता येईल.
- भारताच्या पर्यटन विकासात भारतीय पर्यटन मंत्रालयाची भूमिका याचा आढवा घेणे.
- पर्यटक आणि पर्यटन स्थळ यांच्या सुरक्षितेसाठी शासनामार्फत निर्माण केलेल्या कायदे आणि नैतिक अधिकार यावर प्रकाश टाकता येईल.

## १.१ प्रस्तावना

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पर्यटन हा मानवाचा एक महत्त्वाचा आर्थिक व्यवसाय बनला आहे. या व्यवसायाचे वैशिष्ट्य म्हणजे जगातील विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांमध्ये तो विकसित होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पर्यटन विकासाला विशेष चालना मिळाली. कारण वाहतुकीची विविध

साधने, विशेषत: हवाई वाहतूक या काळात मोठ्या प्रमाणात पसार झाला. त्यामुळे जगातील कोणत्याही भागात कमीत कमी वेळेत पोहोचणे शक्य झाले. या शतकाच्या उत्तरार्धात वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, राहणीमान, शिक्षणाचा प्रसार आणि इतर उद्योगांच्या विकासामुळे पर्यटनाला चालना मिळाली. यामुळे पर्यटन हा जागतिक व्यवसाय बनला. पर्यटनाचे आर्थिक महत्त्व लक्षात घेऊन जगातील विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांमध्ये पर्यटनाच्या अनुषंगाने विकास करण्यास प्राध्यान्य देण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून जागतिक तसेस देश पातळीवर नियोजन बद्ध विकास करण्यासाठी संघटना निर्माण करण्यात आली. तसेच पर्यटक आणि पर्यटन स्थळ यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी कायदे आणि नैतिक अधिकारांची निर्मिती करून पर्यटन विकासाला चालना देण्याचा पर्यन्त करण्यात आला.

### **१.२.१ संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटना** (United Nation World Tourism Organization)

'संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटना' (UNWTO पर्यंत २०२३ नंतर UN नामकरण) ही संयुक्त राष्ट्रांची एक विशेष एजन्सी आहे जी जबाबदार, शाश्वत आणि सर्वत्र प्रवेश करण्यायोग्य पर्यटनाला प्रोत्साहन देते. या संघटनेची स्थापना इ.स १९७५ मध्ये झाली. या संघटनेचे मुख्यालय स्पेनच्या माद्रिद शहरात स्थित आहे. तर इतर प्रादेशिक कार्यालय नारा, जपान मध्ये आशिया आणि पॅसिफिकसाठी प्रादेशिक समर्थन कार्यालय आणि रियाध, सौदी अरेबिया येथे मध्य पूर्वेसाठी निर्माण केलेली आहेत. जगातील १६० देश या संघटनेचे सभासद आहेत. तसेच २ एप्रिल २०२२ रोजी, रशियाने UN टूरिझम सोडण्याची घोषणा केली आणि त्यानंतर संघटनेने त्याच दिवशी युक्रेनवरील रशियन आक्रमणाला प्रतिसाद म्हणून रशिया निलंबित करण्यासाठी मतदान केले. याव्यतिरिक्त, यूएन टुरिझममध्ये ५०० हून अधिक संलग्न सदस्य आहेत, ज्यात पर्यटनामध्ये विशेष स्वारस्य असलेल्या गैर-सरकारी संस्था आणि व्यावसायिक आणि गैर-व्यावसायिक संस्था आणि UN पर्यटनाच्या उद्दिष्टांशी संबंधित क्रियाकलापांशी संबंधित किंवा त्याच्या कार्यक्षमतेमध्ये येणाऱ्या संघटनांचा समावेश आहे. या संघटनेचे सरचिटणीस म्हणून रॉबर्ट लोनाटी (१९७५ ते १९८५), विलीबाल्ड पहर (१९८६ ते १९८९), अँटोनियो एनरिकेझ सॅविग्नाक (१९९० ते १९९६), फ्रान्सिस्को फँजिअल्ली (१९९७ ते २००९), तालेब रिफाई (२०१० ते २०१७) सध्या झुराब पोलोलिकेशविली (२०१८ ते आज तागायत) काम पाहात आहेत.

- **युनायटेड नेशन्स वर्ल्ड टूरिझम ऑर्गनायझेशन उद्दिष्टे:**

१. **पर्यटनाचे जागतिक महत्त्व:** पर्यटन क्षेत्राचा आंतरराष्ट्रीय संबंधांवर होणारा सकारात्मक परिणाम, जागतिक शांतता आणि संवादाच्या प्रसारात याची भूमिका या गोष्टी अधोरेखित करणे.

२. **जागरूकता वाढविणे:** जागतिक समुदायामध्ये पर्यटनामुळे होणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक योगदानाबद्दल जागरूकता निर्माण करणे.

३. **शाश्वत विकास:** शाश्वत पर्यटनाची वाढ आणि त्याच्या लाभांची समान वाटणी यासाठी प्रयत्न करणे.

युनायटेड नेशन्स वर्ल्ड टूरिझम ऑर्गनायझेशन **(UNWTO)** ची प्रमुख कार्ये खालीलप्रमाणे आहेत:

१. **पर्यटन धोरण आणि मार्गदर्शन:** UNWTO सदस्य देशांना पर्यटन धोरणे तयार करण्यात आणि त्यांची अंमलबजावणी करण्यात मदत करते. हे धोरणे शाश्वत विकास, आर्थिक प्रगती, आणि सांस्कृतिक संवर्धनावर आधारित असतात.

२. **आंतरराष्ट्रीय मानकांचा विकास:** UNWTO आंतरराष्ट्रीय स्तरावर मानक आणि नियमांचा विकास करते, ज्यामुळे पर्यटन क्षेत्रात एकसारख्या पद्धतींचा अवलंब केला जाऊ शकतो. हे मानक पर्यटनाच्या गुणवत्तेचे सुधारणा करतात आणि जागतिक पातळीवर पर्यटनाचे सुलभतेने प्रवाह सुनिश्चित करतात.

३. **डेटा संकलन आणि संशोधन:** UNWTO पर्यटन क्षेत्रातील ट्रेंड्स, आकडेवारी, आणि अभ्यासांचे संकलन व वितरण करते. या माहितीचा उपयोग करून, पर्यटन क्षेत्रातील भविष्यातील योजना व धोरणे विकसित करण्यासाठी मदत केली जाते.

४. **शाश्वत पर्यटनाचा प्रचार:** UNWTO शाश्वत पर्यटनाच्या प्रथा आणि धोरणांचा प्रचार करते, जेणेकरून पर्यावरणाचे संरक्षण, सांस्कृतिक वारसा, आणि स्थानिक समुदायांचा विकास साधला जाऊ शकेल.

५. **सहयोग आणि भागीदारी:** UNWTO विविध देशांमधील सरकार, खासगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था, आणि आंतरराष्ट्रीय संघटना यांच्यासोबत सहयोग आणि भागीदारी तयार करते, जेणेकरून पर्यटन क्षेत्राचा समृद्ध आणि शाश्वत विकास साधता येईल.

६. **तांत्रिक सहाय्य:** UNWTO सदस्य देशांना तांत्रिक सहाय्य पुरवते, ज्यामध्ये प्रशिक्षण, सल्लागार सेवा, आणि क्षमता वाढीच्या कार्यक्रमांचा समावेश आहे. हे सहाय्य विशेषतः विकासशील देशांसाठी महत्त्वपूर्ण असते.

७. **मानवी संसाधन विकास:** UNWTO पर्यटन क्षेत्रातील कौशल्ये आणि मानवी संसाधने विकसित करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करते. हे कार्यक्रम स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित केले जातात.

८. **जागतिक जागरूकता:** UNWTO जागतिक स्तरावर पर्यटनाच्या फायदे आणि महत्त्वाविषयी जागरूकता वाढवते. हे विविध प्रसार माध्यमांद्वारे, प्रचार अभियानांद्वारे, आणि जागतिक पर्यटन दिनाच्या माध्यमातून साध्य केले जाते.

- **जागतिक पर्यटन दिन** (World Tourism Day)

जागतिक पर्यटन दिन (World Tourism Day) युनायटेड नेशन्स वर्ल्ड टूरिझम ऑर्गनायझेशन (UNWTO) कडून १९८० साली सुरू करण्यात आला. हा दिवस दरवर्षी २७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिनाची स्थापना पर्यटनाचे जागतिक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय महत्त्व अधोरेखित करण्यासाठी करण्यात आली होती. त्याचबरोबर जागतिक पर्यटन दिनासाठी दरवर्षी वेगवेगळ्या

विषयांवर आधारित एक वार्षिक थीम ठरवली जाते, जी त्या वर्षाच्या पर्यटनासंबंधीच्या आव्हानांवर किंवा संधींवर लक्ष केंद्रित करते. खालीलप्रमाणे काही महत्त्वाच्या वर्षांच्या जागतिक पर्यटन दिनाच्या थीम आहेत:

- **२०२३:** पर्यटन आणि हरित गुंतवणूक (Tourism and Green Investments) - या वर्षीची थीम शाश्वत आणि हरित गुंतवणुकीवर लक्ष केंद्रित करते, पर्यटन क्षेत्रात पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन उपाययोजना आणण्यासाठी प्रोत्साहन देते.
- **२०२२:** पर्यटनाचा पुनर्विचार (Rethinking Tourism) - ही थीम पर्यटन क्षेत्राच्या पुनर्रचनेवर भर देते, खासकरून कोविड-१९ नंतरच्या काळात पर्यटन कसे पुनर्रचित केले जाऊ शकते यावर चर्चा करते.
- **२०२१:** समावेशक वाढीसाठी पर्यटन (Tourism for Inclusive Growth) - ही थीम सर्वसमावेशक विकासावर केंद्रित होती, पर्यटनाने समाजातील विविध घटकांसाठी समान संधी कशा निर्माण कराव्यात यावर भर दिला.
- **२०२०:** पर्यटन आणि ग्रामीण विकास (Tourism and Rural Development) - कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील पर्यटनाला चालना देण्यासाठी या थीमची निवड झाली.
- **२०१९:** पर्यटन आणि नोकरी: सर्वांसाठी एक चांगले भविष्य (Tourism and Jobs: A Better Future for All)- पर्यटनाने रोजगार निर्माण करण्यातील योगदानावर या वर्षीचा फोकस होता.
- **२०१८:** पर्यटन आणि डिजिटल परिवर्तन (Tourism and the Digital Transformation) - डिजिटल क्रांतीमुळे पर्यटन क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा मागोवा घेत, तंत्रज्ञानाच्या योगदानावर लक्ष केंद्रीत होते.
- **२०१७:** शाश्वत पर्यटन: विकासाचे साधन (Sustainable Tourism: A Tool for Development) - शाश्वत पर्यटन विकासाला कसे प्रोत्साहन देते यावर भर.
- **२०१६:** सर्वांसाठी पर्यटन सार्वत्रिक सुलभतेला प्रोत्साहन देणे (Tourism for All – Promoting Universal Accessibility) - सर्वांना पर्यटनाचा लाभ कसा मिळू शकेल, खासकरून दिव्यांग आणि वयोवृद्ध लोकांसाठी.
- **२०१५:** एक अब्ज पर्यटक, एक अब्ज संधी (One Billion Tourists, One Billion Opportunities) - पर्यटनाच्या वाढत्या संख्येचा जागतिक स्तरावर कसा सकारात्मक परिणाम होऊ शकतो यावर भर.

अशाप्रकारे दरवर्षी UNWTO ने या थीमद्वारे जागतिक पर्यटनाच्या विविध मुद्द्यांवर जागरूकता निर्माण करण्याचा आणि संबंधित उपाययोजनांना चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

- **युनायटेड नेशन्स वर्ल्ड टूरिझम ऑर्गनायझेशन सादर केलेले विविध अहवाल**

युनायटेड नेशन्स वर्ल्ड टूरिझम ऑर्गनायझेशन (UNWTO) नियमितपणे जागतिक पर्यटनाशी संबंधित विविध प्रकारची आकडेवारी संकलित करते आणि प्रकाशित करते. ही आकडेवारी पर्यटन क्षेत्रातील ट्रेंड्स, आर्थिक परिणाम, पर्यटकांच्या संख्येत होणारे बदल, आणि पर्यटनाशी संबंधित विविध घटकांचा समावेश करते. काही महत्त्वाच्या आकडेवारी खालीलप्रमाणे आहेत:

१. **जागतिक आंतरराष्ट्रीय पर्यटक आगमन**

- **२०२२:** जवळपास ९६३ दशलक्ष पर्यटकांनी आंतरराष्ट्रीय प्रवास केला. हा आकडा २०२१ च्या तुलनेत लक्षणीय वाढ दर्शवतो, पण कोविड-१९ पूर्वीच्या २०१९ च्या स्तरापेक्षा कमी आहे.
- **२०१९** (कोविड-१९ पूर्वी): १.५ अब्ज आंतरराष्ट्रीय पर्यटक आगमन झाले होते, जे पर्यटन क्षेत्रासाठी सर्वोच्च वर्ष होते.

२. **पर्यटन उत्पन्न**

- **२०२२ :** आंतरराष्ट्रीय पर्यटन उत्पन्न सुमारे १.१ ट्रिलियन यूएस डॉलर इतके होते.
- **२०१९ :** जवळपास १.७ ट्रिलियन यूएस डॉलर उत्पन्न झाले होते, जे पर्यटनाच्या उत्पन्नाच्या दृष्टीने सर्वोच्च वर्ष होते.

३. **पर्यटनाचा GDP वरील परिणाम**

- पर्यटनाचा जागतिक GDP मधील वाटा अंदाजे १०% आहे.
- २०१९ मध्ये, पर्यटन उद्योगाने थेट आणि अप्रत्यक्षपणे जागतिक रोजगाराचा अंदाजे १/१० हिस्सा दिला.

४. **प्रदेशीय आकडेवारी**

- **यूरोप:** २०२२ मध्ये जगातील सर्वात जास्त पर्यटक आकर्षित करणारा प्रदेश होता, ज्यात जवळपास ५८५ दशलक्ष आंतरराष्ट्रीय आगमन झाले.
- **आशिया आणि पॅसिफिक:** या प्रदेशात २०२२ मध्ये पर्यटन पुनरुत्थान होत असतानाही, कोविड-१९ च्या प्रभावामुळे २०१९ च्या तुलनेत कमी पर्यटक होते.
- **अमेरिका:** २०२२ मध्ये जवळपास २०३ दशलक्ष आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी भेट दिली.

५. **पर्यटनाचे ट्रेंड्स आणि प्राधान्य**

- **सस्टेनेबल टुरिझम:** शाश्वत पर्यटनाचे महत्त्व वाढत आहे, आणि अधिकाधिक प्रवासी पर्यावरणीय आणि सामाजिक जबाबदार पर्यटन अनुभव निवडत आहेत.

- **डोमेस्टिक टुरिझम:** कोविड-१९ नंतर, स्थानिक पर्यटनामध्ये वाढ झाली आहे, विशेषतः त्या देशांमध्ये जेथे आंतरराष्ट्रीय प्रवासावर निर्बंध होते.

६. **पर्यटनाचा सामाजिक आणि पर्यावरणीय प्रभाव**

- **पर्यावरणीय प्रभाव:** पर्यटनामुळे होणारे कार्बन उत्सर्जन आणि इतर पर्यावरणीय प्रभावांवर लक्ष केंद्रित केले जात आहे, आणि शाश्वत विकास ध्येयांचा (SDGs) अंतर्भाव करण्यावर भर दिला जात आहे.

UNWTO ही आकडेवारी नियमितपणे अद्यतनित करते आणि ती पर्यटनाच्या सर्व बाबींचा आढावा घेण्यासाठी उपयुक्त असते. यासह, UNWTO विविध अहवाल आणि इंडेक्सेसद्वारे जागतिक पर्यटनाच्या सध्याच्या स्थितीची माहिती उपलब्ध करते.

एकंदरीत UNWTO हे जागतिक पर्यटनाच्या सर्व पैलूंमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असून हे संस्थान पर्यटनाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, आणि पर्यावरणीय विकासाला चालना देण्यासाठी कार्य केले आहे. पर्यटन हे अनेक देशांसाठी मुख्य उत्पन्नाचे साधन आहे, विशेषत: विकसनशील देशांमध्ये. UNWTO ने पर्यटनाच्या वाढीसाठी धोरणे आणि कार्यक्रम तयार केले, ज्यामुळे रोजगार निर्मिती आणि गुंतवणुकीला चालना मिळाली आहे.

**अ. स्वयं-अध्ययन प्रश्न**

**रिकाम्या जागा भरा.**

१. संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटनेची स्थापना ............ मध्ये झाली.

२. संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटनेचे मुख्यालय स्पेनच्या ............ शहरात स्थित आहे.

३. जागतिक पर्यटन दिन ............ रोजी साजरा केला जातो.

४. पर्यटन आणि हरित गुंतवणूक ............ या वर्षीची जागतिक पर्यटन दिनाची थीम आहेत.

५. ............ २०२१ या वर्षीची जागतिक पर्यटन दिनाची थीम आहेत.

## १.२.२ भारत सरकार पर्यटन मंत्रालय

भारताला प्रदीर्घ अशी ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक परंपरा लाभलेली आहे. प्राचीन भारतीय संस्कृती ही जगातील एक प्रगत संस्कृती समजली जाते. या देशात हिंदू, मुस्लिम, जैन, बौद्ध आणि ख्रिश्चन धर्मियांमुळे एक वेगळी सर्व समावेशक संस्कृती निर्मा झाली आहे. यातून या देशाला एक संपन्न व्यक्तिमत्व लाभलेले आहे. यामुळे देशात आज शेकडो धार्मिक ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळे पर्यटन केंद्र म्हणून प्रसिद्ध आहेत. भारताचा व्यापक विस्तार विविध क्षेत्रातील वेगळेपण यामुळे जगातील प्रत्येक पर्यटकाला काही ना काही देणे क्षमता या देशात आहे. येथील शेकडो धार्मिक पवित्र स्थळे प्राचीन ऐतिहासिक वास्तूंचे सौंदर्य जगभरातील पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करतात. तसेच या देशाच्या इतिहासाने पर्यटन क्षेत्राच्या

विकासावर आपला ठसा उमटलेला आहे. भारतातील पर्यटन स्थळ क्षेत्राचे आर्थिक महत्त्व लक्षात घेऊन शासनामार्फत पर्यटन दृष्टीने विकास महत्व दिले. याची सुरुवात ब्रिटिश काळापासून झालेली दिसून येते

## सार्जंट समिती :-

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश सरकारला पर्यटनाचे महत्त्व माहीत होते. पहिल्या महायुध्दानंतर त्यांनी पर्यटनाला उत्तेजन देण्याचा प्रयत्न सुरू केलेला होता. मात्र काही वर्षातच दुसऱ्या महायुद्धाचे ढग जमू लागल्याने हा विषय बाजूला पडला. दुसऱ्या महायुध्दानंतर जाणीवपूर्वक पर्यटन विकासाकरिता संघटितरित्या प्रयत्न सुरू झाले. पर्यटनाला प्रोत्साहन देवून पर्यटन व्यवसायाचा विकास कसा करावा याचा विचार व उपाययोजना सुचविण्यासाठी इ.स. १९४५ मध्ये त्यावेळचे शिक्षणविषयक सल्लागार सर जॉन सार्जंट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली ती समिती 'सार्जंट समिती' म्हणून ओळखली जाते. या समितीचा उद्देश पर्यटन विकासाच्या संभाव्यतेचे सर्वेक्षण करणे हा होता. या समितीने ऑक्टोबर १९४६ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. या अहवालात देशी व विदेशी पर्यटकांना उत्तेजन व पर्यटन उद्योगाच्या विकासाविषयी उपाययोजना सुचविल्या होत्या, त्या खालीलप्रमाणे :-

१. देशी-विदेशी पर्यटकामध्ये उत्तम हवामानाची ठिकाणे, निसर्ग सौंदर्य असलेली स्थळे, तीर्थक्षेत्रे, विश्रामगृहे, ऐतिहासिक व पुरातत्त्वशास्त्रीय स्थळे यांच्याविषयी रूची निर्माण करण्यासाठी नवीन संकल्पना सुचविणे.

२. जी पर्यटन स्थळे विकसित होणार आहेत व ज्यांची जाहिरात होणार आहे, अशा पर्यटनस्थळी भारतीय व परदेशी पर्यटकांसाठी काय सोयीसुविधा निर्माण कराव्यात. ज्यामध्ये रेल्वे स्टेशनपासूनची प्रवासाची सोय, निवासाची सोय, साहित्य व मार्गदर्शनपर पुस्तके, अधिकृत गाईड इत्यादीची माहिती असेल.

३. केंद्र सरकार, राज्य सरकार अथवा स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीच्या पर्यटन विभागांना आवश्यक त्या सेवा-सुविधा पुरविण्यासाठी सुचना करण्यात याव्यात.

४. भारतातील देशी-विदेशी पर्यटकांच्या स्वरूपाचे व विस्ताराचे पुनर्रावलोकन केल्यानंतर त्यांच्या वाढीसाठी किंवा दुसरी पर्यटन स्थळे विकसित करण्यासाठी काय करता येईल याचा अभ्यास करणे.

सार्जंट समितीने केलेल्या शिफारशीनुसार पर्यटनासंबंधी पायाभूत गोष्टी, देशात व परदेशात पर्यटनासंबंधी जाहिराती, पर्यटन उद्योग हाताळण्यासाठी सर्व पातळ्यावरील लोकांमध्ये परस्पर संबंध इत्यादीवर भर देण्यात आला. सार्जंट समितीच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी पर्यटन उद्योगांचा संपूर्ण आराखडा उपलब्ध झालेला होता. पुढील काळात भारतात हॉटेल्सचे जाळे निर्माण झाले, दळणवळण क्षेत्राचा विकास होण्यास मदत झाली. ज्यामध्ये रस्ते, रेल्वे व विमान वाहतुकीचा समावेश होता. पर्यटनाशी संबंधित विविध विभागात समन्वयाचा अभाव होता, सार्जंट समितीच्या शिफारशीनुसार मध्यवर्ती पर्यटन संघटना स्थापन करण्यात आली.

**अ. मध्यवर्ती पर्यटन संस्था:–**

पर्यटनाशी संबंधित विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी 'मध्यवर्ती पर्यटन संस्था' स्थापन करण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार दिल्ली, कोलकाता, मुंबई आणि मद्रास येथे प्रादेशिक पर्यटन कार्यालये स्थापन करण्यात आली. याशिवाय पर्यटन वाहतुकीसाठी तात्पुरती समिती स्थापन करण्याची सूचना करण्यात आली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सार्जंट कमिटीच्या शिफारशींची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी होऊ लागली. त्यामुळे पर्यटन उद्योगाला चालना मिळाली.

**ब. पर्यटन परिवहन समिती :–**

भारतातील पर्यटन क्षेत्राचा विकास करण्याच्या उद्देशाने इ.स. १९४५ मध्ये, पर्यटन विकासासाठी परिवहन मंत्रालयाच्या अंतर्गत स्वतंत्र पर्यटन परिवहन समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या माध्यमातून देशांतर्गत पर्यटनाचा विकास होऊ लागला. त्यामुळे इ. स.१९५५–५६ मध्ये या शाखेचा विस्तार करून चार उपशाखा निर्माण करण्यात आल्या.

**१. पर्यटन वाहतूक विभाग :–**

देशी–विदेशी पर्यटकांचे कायदेशीर व्यवहार, ट्रॅव्हल एजंट, हॉटेल्स आणि विश्रामगृहे विकसित करणे, पर्यटकांची सांख्यिकीय माहिती गोळा करणे, मासिक अहवाल तयार करणे, मार्गदर्शकांचे प्रशिक्षण, पर्यटन केंद्रांचा विकास आणि पर्यटन ब्युरोची निर्मिती ही कामे या विभागाकडे होती.

**२. पर्यटन प्रशासन विभाग :–**

पर्यटन विभागाचे बजेट तयार करणे, देश–विदेशात पर्यटन कार्यालये सुरू करणे, पर्यटन कार्यालयाला आर्थिक अधिकार देणे आणि वेळोवेळी पर्यटन कार्यालयांची तपासणी करणे ही पर्यटन प्रशासनाची कामे होती.

**३. पर्यटन प्रोत्साहन विभाग :–**

माहितीपत्रके, पोस्टर्स, मार्गदर्शक पुस्तके तयार करणे, वृत्तपत्रे आणि मासिकांमध्ये पर्यटन स्थळांच्या जाहिराती आणि पर्यटनावरील प्रदर्शने भरवणे ही जबाबदारी पर्यटन प्रोत्साहन विभागाकडे होती.

**४. पर्यटन साहित्य वितरण विभाग :–**

जाहिरात विभागाने तयार केलेली माहितीपत्रके, मार्गदर्शक पुस्तके आणि पोस्टर्सचे पर्यटन स्थळांवर वितरण करणे.

**क. पर्यटक माहिती कार्यालये :–**

देशातील पर्यटनाचा विकास करण्यासाठी भारतात आणि परदेशात पर्यटन माहिती कार्यालये ९ कार्यालये इ.स. १९५५ मध्ये सुरू झाली. या कार्यालयांवर पुढील जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

५. स्थानिक पर्यटन कार्यालयाशी संपर्क साधा आणि समन्वय साधा.

६. पर्यटकांना पर्यटन केंद्रांची अद्ययावत माहिती देणे.

७. पर्यटन स्थळांचा प्रचार.

८. देशी पर्यटकांच्या आवश्यक गरजा पूर्ण करणे.

**ड. परदेशात पर्यटन माहिती कार्यालयाची स्थापना :-**

परदेशी पर्यटकांना भारतात आकर्षित करण्यासाठी परदेशात पर्यटन माहिती कार्यालयांची स्थापना करणे आवश्यक होते. त्या दृष्टिकोनातून इ.स. १९५२ मध्ये, न्यूयॉर्कमध्ये पहिले पर्यटन माहिती कार्यालय उघडले. त्यानंतर इ.स. १९५५ मध्ये लंडनमध्ये, इ.स. १९५६ मध्ये, पॅरिसमध्ये कार्यालये उघडली गेली. त्याच वर्षी ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि श्रीलंका येथेही पर्यटन कार्यालये सुरू करण्यात आली. या कार्यालयातून भारतातील प्रसिद्ध पर्यटन स्थळांची जाहिरात करण्यात आली.

**इ. पर्यटन मंत्रालयाची स्थापना :-**

भारतातील पर्यटनाचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने १ मार्च १९५८ रोजी परिवहन मंत्रालयात पर्यटनासाठी स्वतंत्र खाते सुरू करण्यात आले. यासाठी स्वतंत्र महासंचालकांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर, १४ मार्च १९६७ रोजी, पर्यटन आणि नागरी वाहतूक मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली आणि त्याचा संपूर्ण प्रभार पूर्णवेळ मंत्र्याकडे सोपवण्यात आला. त्यामुळे पर्यटन उद्योगाच्या विकासाला चालना मिळाली.

**ई. पंचवार्षिक योजनेंतर्गत पर्यटनाचा विकास :-**

पर्यटन उद्योगाचे महत्त्व ओळखून केंद्र सरकारने पर्यटन उद्योगाच्या वाढीसाठी पंचवार्षिक योजनेंतर्गत विशेष प्रयत्न केले, परिणामी भारतातील पर्यटन विकासाला चालना मिळाली.

**१. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत पर्यटन विकास (१९५६-६१)**

भारतात दुसरी पंचवार्षिक योजना १९५६-६१ या कालावधीत लागू करण्यात आली. या काळात पर्यटन विकासाची जबाबदारी परिवहन मंत्रालयाकडे देण्यात आली होती. या काळात पर्यटनस्थळांची माहिती आणि त्यांची वैशिष्ट्ये भारतीय पर्यटकांपर्यंत आणि भारतीय भाषांमध्ये पोहोचवण्याची जबाबदारी निश्चित करण्यात आली.

**२. तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१-६६ ) आणि भारतीय पर्यटन विकास महामंडळ स्थापना :-**

तिसरी पंचवार्षिक योजना इ.स.१९६१-६६ या कालावधीत लागू करण्यात आली. पर्यटन विकासाची कामे केंद्र सरकार आणि राज्य सरकारमध्ये विभागली गेली. ज्यामध्ये परदेशी पर्यटकांना सेवा पुरविण्याची जबाबदारी केंद्र सरकारकडे आणि पर्यटकांना मूलभूत सेवा पुरविण्याची जबाबदारी राज्य सरकारकडे देण्यात

आली होती. सन १९६३ मध्ये पर्यटन उद्योगाच्या विकासासाठी 'झा समिती' नेमण्यात आली. समितीने पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी स्वतंत्र मंडळ नेमण्याची शिफारस केली. त्यानुसार १) भारतीय पर्यटन परिवहन महामंडळ, २) भारतीय पर्यटन महामंडळ, ३) हॉटेल कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात आली. ही तिन्ही मंडळे स्वतंत्रपणे काम करू लागल्याने त्यांच्यात समन्वयाचा अभाव दिसून आला. त्यामुळे सन १९६६ मध्ये तिन्ही महामंडळांचे विलीनीकरण करून 'भारतीय पर्यटन विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले. या महामंडळाला पर्यटन स्थळांचा विकास, पायाभूत सुविधांचा विकास, पर्यटन स्थळांचा प्रचार आणि विविध पर्यटन महोत्सवांचे आयोजन करण्याची जबाबदारी देण्यात आली होती.

**३. चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-७४):-**

चौथ्या पंचवार्षिक योजनेंतर्गत पर्यटकांसाठीच्या पायाभूत सुविधांचा प्रामुख्याने विचार करण्यात आला. विशेषतः परदेशी पर्यटक ज्या पर्यटन स्थळांना भेट देतात त्यात निवास, वाहतूक आणि मनोरंजन यांचा समावेश होतो.

**४. पाचवी पंचवार्षिक योजना आणि पर्यटन विकास (१९७४-७९):-**

पाचव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत पर्यटकांसाठी निवास व्यवस्था बांधण्यासाठी २५ कोटींची तरतूद करण्यात आली होती. विशेषत: डेस्टिनेशन ट्रॅफिक ही संकल्पना राबवण्यात आली. या काळात कोवलम (केरळ), गुलमर्ग (जम्मू आणि काश्मीर), कुलमनाली (हिमाचल प्रदेश) आणि गोवा इत्यादी पर्यटन स्थळे विकसित झाली. सांस्कृतिक पर्यटन विकसित करण्याबरोबरच ऐतिहासिक वास्तू आणि वारसा स्थळांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

**५. सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८५) आणि पर्यटन सर्किट :-**

भारताच्या पर्यटन विकासात सहावी पंचवार्षिक योजना महत्त्वाची मानली जाते. या योजनेअंतर्गत पर्यटन विकासासाठी 'टूरिझम सर्किट' ही संकल्पना राबविण्यात आली. इ.स.१९८२ मध्ये, राष्ट्रीय पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणांतर्गत 'स्पेशल टुरिझम झोन' आणि 'टूरिझम सर्किट' या संकल्पनेवर भर देण्यात आला होता.

**६. सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-९०):-**

पर्यटन विकासासाठी या योजनेंतर्गत खासगी गुंतवणुकीलाही प्रोत्साहन देण्यात आले. पर्यटन व्यवसायाला 'उद्योग'चा दर्जा देण्यात आला. इ. स. १९८९ मध्ये पर्यटन प्रकल्पांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी 'फायनान्स कॉर्पोरेशन'ची स्थापना करण्यात आली. हॉटेल आणि केटरिंग व्यवसायाला गती देण्यासाठी विविध प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या. रस्ते, रेल्वे आणि हवाई वाहतूक सुविधा विकसित करण्यावर भर देण्यात आला.

**७. आठवी पंचवार्षिक योजना (१९९०-९५) आणि नऊ कलमी कार्यक्रम :-**

खाजगी गुंतवणुकीवर भर देण्यात आला आणि भारतातील पर्यटनाला चालना देण्यासाठी नऊ कलमी कार्यक्रम राबविण्यात आला.

१. सांस्कृतिक पर्यटन केंद्राचा विकास.

२. देशातील विविध क्षेत्रात पर्यटनाची नवीन क्षेत्रे निर्माण करणे.

३. पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे.

४. परदेशी पर्यटकांच्या सोयीसाठी प्रक्रिया सुलभ करणे.

५. परवडणाऱ्या दरात निवास व्यवस्था.

६. अभयारण्ये, हिवाळी क्रीडा केंद्रे आणि समुद्रकिनारे यांचा विकास.

७. पर्यटन केंद्रांमध्ये बाजारपेठांची निर्मिती.

८. राष्ट्रीय परंपरा पर्यटकांना उपलब्ध करून देणे.

९. निवडक पर्यटन केंद्रे आणि क्षेत्रे विकसित करणे.

**८. नववी पंचवार्षिक योजना (१९९५-२०००):-**

पर्यटनाला चालना देण्यासाठी नवव्या पंचवार्षिक योजना १९९६ अंतर्गत राष्ट्रीय धोरण तयार केले. त्याचवेळी विशेष कृती समिती स्थापन करण्यात आली. या समितीवर सिक्कीम, जम्मू आणि काश्मीर आणि ईशान्य भारतातील पर्यटन स्थळे विकसित करण्याची जबाबदारी देण्यात आली. विशेषत: रोजगार निर्मिती आणि परकीय चलन वाढवणे हे उद्दिष्ट दिले होते.

**९. दहावी पंचवार्षिक योजना :-**

दहाव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात ९० पर्यटन केंद्रे विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**पर्यटनाला चालना देण्यासाठी विशेष मोहिमा :-**

भारतात इ.स. २००० नंतर पर्यटन विकासासाठी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते. देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. यामध्ये 'अतुल्य भारत' (२००२), 'व्हिजिट इंडिया' (२००९), 'अतिथी देवो भव' (२०११) इत्यादींचा विशेष उल्लेख केला आहे. या मोहिमेअंतर्गत भारतातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि निसर्ग पर्यटन इत्यादींची देश-विदेशात जाहिरात करण्यात आली. विशेष पर्यटन महोत्सव आणि मेळ्यांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे भारतीय पर्यटनाला चालना मिळाली.

२०१४ साली अधिकाधिक परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ई-व्हिसा सुविधा सुरू केली. या सुविधेमुळे परदेशी नागरिकांना व्हिसा प्रक्रिया सोपी झाली. याचबरोबर स्वच्छ भारत अभियानने पर्यटन

स्थळांच्या स्वच्छतेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. स्वच्छ पर्यटन स्थळांमुळे पर्यटकांच्या अनुभवात वाढ झाली आणि स्वच्छता ही एक प्रमुख पर्यटन घटक म्हणून पुढे आली. तसेच पुढील काळात 'विरासत बचाओ' प्रकल्प हाती घेण्यात आला. या अंतर्गत युनेस्कोशी भागीदारी करून जागतिक वारसा स्थळांच्या संवर्धनाला चालना दिली. कोविड-१९ महामारीनंतर पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी भारत सरकारने विविध मदत आणि पुनर्रचना योजना सुरू केल्या. यामध्ये वैयक्तिक प्रवासी सुविधा अनुषंगाने डिजिटल माध्यमांच्या मदतीने अनेक प्रवासी योजना सुरू झाल्या, ज्या सुरक्षित आणि जबाबदार पर्यटनावर भर देण्यात आली. इ. स.२०२२ साली राष्ट्रीय पर्यटन धोरण्याच्या माध्यमातून इ. स. २०४७ पर्यंत भारतातील पर्यटन क्षेत्राला जागतिक पातळीवर सर्वोच्च स्थानी नेण्याचे उद्दिष्ट ठेवले. धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी महत्त्वाच्या धार्मिक स्थळांचा विकास आणि त्यांचे व्यवस्थापन भारत सरकारने मोठ्या प्रमाणात केले. कुंभ मेळा आणि वाराणसीतील गंगा आरती हे आंतरराष्ट्रीय पर्यटन आकर्षण बनले आहेत.

**ब. स्वयं-अध्ययन प्रश्न**

**प्रश्न. रिकाम्या जागा भरा.**

१. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी ब्रिटिशांनी ............ स्थापना केली.

२. भारत सरकारने परदेशाबाहेर इ.स. १९५२ मध्ये, ............ मध्ये पहिले पर्यटन माहिती कार्यालय उघडले.

३. १४ मार्च १९६७ रोजी, ............ निर्मिती करण्यात आली

४. ............ पंचवार्षिक योजनेनुसार 'भारतीय पर्यटन विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले.

५. 'भारतीय पर्यटन विकास महामंडळ' स्थापन सन ............ रोजी करण्यात आले.

## १.२.३ पर्यटनातील कायदे आणि नैतिकता

पर्यटनातील कायदे आणि नैतिकता हे पर्यटन क्षेत्राच्या यशस्वी व शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. हे कायदे आणि नैतिकता पर्यटन व्यवसायात न्याय, सुरक्षितता, शाश्वतता, आणि समाजाचे हित साधण्यासाठी मार्गदर्शन करतात. यांचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे पर्यटक, स्थानिक समुदाय, आणि नैसर्गिक संसाधने यांचे संरक्षण करणे आहे. कायदे आणि नैतिकतेचे पालन केल्यामुळे पर्यटन उद्योग अधिक जबाबदार आणि पर्यावरणपूरक बनतो.

### अ) पर्यटनातील कायदे (Tourism Laws):

पर्यटनाच्या संदर्भात कायदे हे विविध स्तरांवर तयार केले जातात यामध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय,आणि स्थानिक कायद्यांचा समावेश होतो. या कायद्यांचे उद्दिष्ट पर्यटकांची सुरक्षा, स्थानिक समुदायांचे हक्क, आणि नैसर्गिक व सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे आहे. हे कायदे सांस्कृतिक आणि सामाजिक सुरक्षा सुनिश्चित

करण्यासाठी महत्त्वाचे आहेत. ते स्थानिक संस्कृतींच्या संरक्षणापासून ते सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीपर्यंत विविध मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतात. यामुळे समाजातील विविध घटकांमध्ये समरसता आणि समानता सुनिश्चित केली जाते.

## ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ (Consumer Protection Act, 2019)

ग्राहक संरक्षण कायदे (Consumer Protection Laws) ग्राहकांना त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि व्यवसायांकडून होणाऱ्या फसवणुकीपासून वाचवण्यासाठी तयार केले जातात. पर्यटन उद्योगातही ग्राहकांचे संरक्षण आवश्यक आहे, कारण पर्यटक विविध सेवांचा वापर करतात, जसे की प्रवास, निवास, टूर पॅकेजेस, आणि इतर सुविधा. ग्राहक संरक्षण कायदे हे सुनिश्चित करतात की ग्राहकांना पारदर्शक, सुरक्षित, आणि योग्य सेवा मिळाव्यात.

**पर्यटनातील ग्राहक संरक्षण कायद्यांचे घटक:**

१. **पारदर्शकता आणि माहितीचा अधिकार:**

- **सेवांची माहिती:** पर्यटन सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांनी, जसे की ट्रॅव्हल एजन्सी, हॉटेल्स, आणि टूर ऑपरेटर यांनी त्यांच्या सेवा आणि शुल्क याबद्दल स्पष्ट माहिती द्यावी. कोणत्याही प्रकारची लपवाछपवी किंवा खोटी माहिती देणे बेकायदेशीर आहे.
- **दर आणि कर समजावून सांगणे:** ग्राहकांनी दिलेले पैसे कोणत्या सेवांसाठी आहेत, कोणते कर लागू आहेत, हे स्पष्ट करण्यात यावे.

२. **बुकिंग आणि रद्द करण्याचे नियम:**

- **रद्द करण्याचे अधिकार:** पर्यटन सेवांमध्ये, बुकिंग केलेली सेवा रद्द करण्याचे अधिकार ग्राहकांना दिले जातात. उदा. हॉटेल बुकिंग, फ्लाइट्स किंवा टूर पॅकेजेस रद्द केल्यास, रद्द केल्यावर परतावा देण्याचे नियम स्पष्ट असणे आवश्यक आहे.
- **अस्थिर परिस्थिती:** नैसर्गिक आपत्ती, प्रवासाच्या अडचणी, किंवा आपत्कालीन परिस्थितीत ग्राहकांना सेवा रद्द करण्याचा अधिकार असावा आणि त्यावर न्याय्य परतावा मिळावा.

३. **सेवांच्या गुणवत्तेचे संरक्षण:**

- **गुणवत्तेची हमी:** पर्यटकांनी जे बुक केले आहे, त्याच प्रकारच्या आणि दर्जाच्या सेवा पुरविणे आवश्यक आहे. जसे, हॉटेल बुकिंग करताना दिलेली माहिती आणि प्रत्यक्षात मिळालेली सेवा यामध्ये फरक असू नये.
- **अनुचित व्यवसाय प्रथा:** कंपन्यांनी ग्राहकांची दिशाभूल करून त्यांच्या अपेक्षांना धोका निर्माण होईल, अशा पद्धतीने व्यवसाय करणे टाळावे.

४. **सुरक्षा आणि जबाबदारी:**

- **प्रवासी विमा:** काही देशांमध्ये प्रवास करताना, प्रवासी विमा घेणे बंधनकारक असते. हा विमा प्रवासादरम्यान लागणाऱ्या वैद्यकीय उपचार, आपत्कालीन परिस्थिती किंवा प्रवासाच्या इतर नुकसानांपासून संरक्षण देतो.
- **वाहतुकीच्या सुरक्षिततेचे नियम:** वाहन सेवा, जसे की टॅक्सी, बस, किंवा फ्लाइट्स, या सुरक्षित असाव्यात. प्रवासादरम्यान अपघात किंवा इतर कोणत्याही अडचणींसाठी सेवा पुरवठादार जबाबदार असतात.

५. **तक्रार निवारण प्रणाली:**

- **तक्रारींचे निराकरण:** ग्राहकांच्या तक्रारींवर त्वरित कारवाई केली जावी. यासाठी कंपन्यांनी तक्रार निवारण प्रणाली तयार करणे आवश्यक आहे. उदा. अयोग्य सेवा, चुकीची माहिती, किंवा इतर प्रकारच्या अडचणींसाठी तक्रारी दाखल करता येतील.
- **विवाद निराकरण:** जर सेवा पुरवठादार आणि ग्राहकांमध्ये विवाद उद्भवला, तर कायदेशीर पद्धतीने त्याचे निराकरण होणे आवश्यक आहे.

६. **फसवणूक आणि खोट्या जाहिरातींवर नियंत्रण:**

- **विपणन नैतिकता:** कंपन्यांनी जाहिराती करताना ग्राहकांची फसवणूक होईल, अशा प्रकारे खोटे दावे करू नयेत. जसे की अत्यंत कमी दरात मोठ्या सुविधा देण्याचे आश्वासन आणि प्रत्यक्षात कमी दर्जाची सेवा पुरवणे.

## ई-कॉमर्स नियम, २०२० (E-Commerce Rules, 2020)

ई-कॉमर्स नियम, २०२० (E-Commerce Rules, 2020) हे भारतात ऑनलाइन खरेदी आणि व्यापाराशी संबंधित व्यवहारांचे नियमन करण्यासाठी तयार करण्यात आलेले कायदे आहेत. या नियमांचे उद्दिष्ट म्हणजे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर ग्राहकांच्या हक्कांचे रक्षण करणे, व्यापार प्रक्रियेतील पारदर्शकता वाढवणे, आणि अनुचित व्यापार प्रथा थांबवणे होय. या नियमांचा आधार २०१९ मध्ये लागू केलेल्या ग्राहक संरक्षण कायद्याच्या (Consumer Protection Act) अंतर्गत घेतला आहे. पारदर्शकता: ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सना पर्यटनाशी संबंधित सेवा जसे की फ्लाइट बुकिंग्स, हॉटेल रिझर्व्हेशन्स, आणि टूर पॅकेजेससाठी स्पष्ट आणि पारदर्शक माहिती देणे आवश्यक आहे.

**ई-कॉमर्स नियम २०२० चे प्रमुख घटक:**

१. **पारदर्शकता आणि माहितीचा अधिकार:**

- **उत्पादनाची माहिती**: ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सना त्यांच्या उत्पादनांची सर्व संबंधित माहिती ग्राहकांना स्पष्टपणे पुरवणे आवश्यक आहे. यामध्ये उत्पादनाचे नाव, किंमत, गुणवत्ता, आकार, उपयोग, वापरण्याचे नियम, आणि हमी यांची माहिती असावी.

- **किंमत आणि सवलत:** ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर उत्पादनांच्या किंमती आणि सवलतींची योग्य आणि स्पष्ट माहिती असावी. ग्राहकांना कोणतेही गुप्त शुल्क लागू नसावे.

२. **फसवणूक आणि अनुचित व्यापारावर नियंत्रण:**

- **अनुचित व्यापार प्रथांवर बंदी:** ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर खोटी उत्पादने विकणे, खोट्या जाहिराती, किंवा खोटी माहिती देणे या प्रकारच्या प्रथा थांबवणे आवश्यक आहे.
- **फसवणूक प्रतिबंध:** फसवणूक करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याची ई–कॉमर्स प्लॅटफॉर्मची जबाबदारी असते.

३. **पारदर्शक रिटर्न आणि रद्द करण्याचे नियम:**

- **रिटर्न पॉलिसी:** ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म्सनी त्यांच्या उत्पादनांच्या रिटर्न, एक्सचेंज, आणि परतावा धोरणांची स्पष्ट माहिती द्यावी. ग्राहकांना उत्पादनासंदर्भातील असंतोष असल्यास, त्यांना परतावा किंवा रिटर्नची सुविधा मिळावी.
- **रद्द करण्याचे नियम:** खरेदी रद्द करण्याचे अधिकार ग्राहकांना दिले जातात. कोणत्याही चुकीच्या माहितीमुळे किंवा सेवेमुळे ग्राहकाला त्रास झाल्यास, त्यांना बुकिंग रद्द करण्याचा पर्याय उपलब्ध असावा.

४. **ग्राहकांची तक्रार निवारण प्रणाली:**

- **तक्रार निवारण अधिकारी:** प्रत्येक ई–कॉमर्स प्लॅटफॉर्मवर एक ग्राहक तक्रार अधिकारी असावा, जो ग्राहकांच्या तक्रारींवर कार्यवाही करतो.
- **तक्रारींवर त्वरित कारवाई:** ग्राहकांनी नोंदवलेल्या तक्रारींवर ४८ तासांच्या आत कारवाई करण्याची व्यवस्था असावी, आणि तक्रारीचे निराकरण १ महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

५. **ई–कॉमर्स प्लॅटफॉर्मची जबाबदारी:**

- **फक्त ब्रोकर म्हणून काम नाही:** ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म फक्त ब्रोकर किंवा सुविधा पुरवठादार म्हणून काम करू शकत नाहीत. त्यांना ग्राहकांना विश्वसनीय सेवा आणि संरक्षण पुरवणे आवश्यक आहे.
- **विक्रेत्यांची माहिती:** ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म्सनी विक्रेत्यांची पूर्ण माहिती, त्यांचा व्यवसाय पत्ता, संपर्क क्रमांक, आणि इतर तपशील ग्राहकांना उपलब्ध करून दिले पाहिजेत.

६. **आंतरराष्ट्रीय ई–कॉमर्स आणि विदेशी कंपन्यांसाठी नियम:**

- **विदेशी कंपन्यांचे ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म्स:** भारतात काम करणाऱ्या विदेशी ई–कॉमर्स कंपन्यांना भारताच्या ग्राहक संरक्षण कायद्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

- **डेटा संरक्षण:** ग्राहकांच्या व्यक्तिगत माहितीचे संरक्षण करण्यासाठी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सना डेटा संरक्षणाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

## एडव्हर्टाइजमेंट (कायदे आणि नियम) (Advertising Regulations)

एडव्हर्टाइजमेंट (कायदे आणि नियम) या अंतर्गत विविध देशांमध्ये जाहिरात आणि विपणनाच्या प्रथा आणि तत्त्वे नियमन करणारे कायदे आणि नियम तयार केलेले आहेत. या कायद्यांचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे ग्राहकांना फसवणूक होईल अशा जाहिराती रोखणे, व्यवसायिक आचारधर्म पाळणे, आणि विपणनातील पारदर्शकता सुनिश्चित करणे आहे.

**एडव्हर्टाइजमेंटच्या कायद्यांचे आणि नियमांचे प्रमुख घटक:**

- **अयोग्य जाहिरातींवर प्रतिबंध:** खोट्या किंवा चुकीच्या माहितीच्या जाहिरातींवर कठोर कारवाई करण्यासाठी कायदे आहेत. जसे, जर एखादी टूर कंपनी खोटी आश्वासने देऊन पर्यटकांना फसवत असेल, तर त्या कंपनीवर कायदेशीर कारवाई होऊ शकते.
- **जाहिरातींच्या पारदर्शकतेचा नियम:** पर्यटनाशी संबंधित कोणत्याही जाहिरातींमध्ये योग्य आणि सत्य माहिती दिली जाणे आवश्यक आहे. पर्यटकांनी दिलेल्या माहितीवरून जाहिरातीत कुठलाही फरक असल्यास, ग्राहकांना त्याबाबत तक्रार दाखल करण्याचा हक्क आहे.

## फसवणूक प्रतिबंध कायदे (Fraud Prevention Laws)

फसवणूक प्रतिबंध कायदे (Fraud Prevention Laws) हे कायदे आणि नियम धोखाधडी आणि फसवणूक टाळण्यासाठी, त्या रोखण्यासाठी आणि त्याविरोधात कारवाई करण्यासाठी तयार केलेले असतात. या कायद्यांचा उद्देश म्हणजे आर्थिक सुरक्षा वाढवणे, व्यवसाय आणि व्यक्तींचे संरक्षण करणे, आणि सामान्य लोकांना फसवणूक व इतर प्रकारच्या आर्थिक गुन्ह्यांपासून वाचवणे आहे.

**फसवणूक प्रतिबंध कायद्यांचे प्रमुख घटक**

- **पर्यटक सेवा करार** (Tourist Service Agreements): पर्यटकांनी घेतलेल्या सेवांसाठी करार करणे अनिवार्य आहे, ज्यात सेवा पुरवठादाराची जबाबदारी आणि पर्यटकांच्या हक्कांची स्पष्टता असावी.
- **फसवणूक नियंत्रण:** पर्यटन उद्योगात फसवणूक रोखण्यासाठी कठोर कायदे आहेत. उदाहरणार्थ, जर कोणत्याही टूर ऑपरेटरने ग्राहकाला चुकीची सेवा दिली किंवा अतिरिक्त शुल्क आकारले, तर त्या ऑपरेटरवर दंडात्मक कारवाई होऊ शकते.

**फसवणूक प्रतिबंध कायदे:**

- **भारतीय दंड संहितेचे (IPC) कलम ४२०:** फसवणुकीशी संबंधित गुन्ह्यांना नियमबद्ध करणारे कलम, ज्यात आर्थिक फसवणूक आणि अन्य प्रकारच्या फसवणुकीवर कारवाई केली जाते.

- **प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँडरिंग ॲक्ट (PMLA)**: मनी लाँडरिंग आणि आर्थिक गुन्ह्यांशी संबंधित कायदा.

## वीजा कायदे (Visa Laws):

वीजा आणि इमिग्रेशन नियम हे कोणत्याही देशात परदेशी नागरिकांच्या प्रवेश, तिथे राहणे, आणि कार्य करणे यासंबंधीचे नियम आणि कायदे आहेत. या नियमांचे पालन केल्याने देशातील सुरक्षेचे संरक्षण होते आणि परदेशी नागरिकांना देशात प्रवेश करण्यास व परवानगी मिळण्यास सक्षम केले जाते. भारतासह जगभरातील विविध देशांनी त्यांच्या विशिष्ट गरजांनुसार वीजा आणि इमिग्रेशनसाठी नियम तयार केले आहेत.

१. **वीजा नियम:**

- **वीजाचे प्रकार:** विविध उद्दिष्टांसाठी विविध प्रकारचे वीजा दिले जातात, जसे की पर्यटक वीजा, व्यवसाय वीजा, विद्यार्थी वीजा, कार्य वीजा, वैद्यकीय वीजा, आणि ट्रांजिट वीजा. प्रत्येक वीजाच्या वैधतेची मुदत आणि नियम वेगवेगळे असतात.
- **वीजाच्या अटी आणि शर्ती:** प्रत्येक वीजावर काही विशिष्ट अटी आणि शर्ती लागू असतात, जसे की किती वेळ राहता येईल, काय काम करता येईल, आणि प्रवेश-निर्गमन नियम काय आहेत.
- **मुदतवाढ आणि नूतनीकरण:** काही वीजा प्रकारांसाठी मुदतवाढ मिळविण्याची किंवा वीजा नूतनीकरणाची सुविधा उपलब्ध असते. मात्र, यासाठी अर्जदाराने विशिष्ट वेळेत अर्ज करणे आवश्यक असते.

२. **भारतामधील वीजा आणि इमिग्रेशन नियम:**

- **इमिग्रेशन कार्यालय:** भारतात परदेशी नागरिकांचे इमिग्रेशन हाताळण्यासाठी विविध इमिग्रेशन कार्यालये आणि FRRO (Foreigners Regional Registration Office) कार्यरत आहेत, जे वीजा नूतनीकरण, निवास परवाने, आणि अन्य सेवा प्रदान करतात.
- **सुरक्षा तपासणी**: भारतात प्रवेश करताना परदेशी नागरिकांनी सुरक्षा तपासणी आणि कस्टम्स तपासणीसाठी योग्यरित्या सहकार्य करणे आवश्यक आहे. काही वस्तू आणि साहित्य देशात आणण्यास मनाई आहे.

३. **वीजा आणि इमिग्रेशन कायद्याचे उल्लंघन:**

- **ओव्हरस्टे:** वीजाची वैधता संपल्यानंतर देशात थांबण्यास मनाई आहे. ओव्हरस्टे केल्यास दंड आणि भविष्यातील वीजा प्रक्रियेत अडचणी येऊ शकतात.
- **कायदेशीर कारवाई:** वीजा नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते, ज्यामध्ये तात्काळ देश सोडण्याचा आदेश किंवा भविष्यकाळात वीजा नाकारला जाऊ शकतो.

- हे नियम आणि कायदे देशातील सुरक्षेचे संरक्षण करण्यासाठी तसेच परदेशी नागरिकांच्या व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे असतात. वीजा आणि इमिग्रेशन नियमांचे योग्य पालन केल्याने कोणत्याही अडचणीशिवाय प्रवासाचा आनंद घेता येतो.

## खाद्य सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ (Food Safety and Standards Act, 2006)

खाद्य सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ (Food Safety and Standards Act, 2006) हा भारतीय कायदा आहे जो खाद्य सुरक्षा, गुणवत्ता, आणि मानकांचे व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी तयार केला गेला आहे. हा कायदा भारतातील खाद्य उत्पादन, प्रक्रिया, वितरण, आणि विपणनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि ग्राहकांना सुरक्षित आणि दर्जेदार खाद्यपदार्थांची हमी देण्यासाठी लागू आहे.

**खाद्य सुरक्षा आणि मानके कायद्याचे मुख्य घटक**

- पर्यटन स्थळांवरील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, आणि खाद्य विक्रेते FSSAI मानकांचे पालन करणे आवश्यक.
- अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेत स्वच्छता आणि सुरक्षिततेचे नियम पाळणे.
- नियमित तपासणी आणि अन्न सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य.

## पर्यावरण संरक्षण कायदे : (Environment Protection Law)

जगामध्ये पर्यावरण संरक्षणासाठी अनेक कायदे आणि नियम अस्तित्वात आहेत, जे पर्यटन क्षेत्रालाही लागू होतात. या कायद्यांचा उद्देश पर्यावरणाचे संरक्षण करणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करणे आणि पर्यावरणीय संतुलन राखणे आहे. भारतातील पर्यटन आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखण्यासाठी काही महत्त्वाचे कायदे लागू आहेत. हे कायदे पर्यावरणाचे रक्षण करताना पर्यटन विकासासाठी योग्य नियम घालतात. यामुळे पर्यावरणीय संवेदनशीलता असलेल्या पर्यटन स्थळांचे संरक्षण केले जाते. खाली काही महत्त्वाचे कायदे दिलेले आहेत:

**१. पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६**

- या कायद्याखाली केंद्र सरकारला पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी नियम घालण्याचे अधिकार दिले आहेत. कोणत्याही पर्यटन प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी घेणे आवश्यक आहे.
- हा कायदा पर्यावरण प्रदूषण रोखण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे.

**२. जैविक विविधता कायदा, २००२**

- या कायद्याचा उद्देश जैवविविधतेचे संरक्षण करणे, जैविक साधनसंपत्तीचा वापर नियमन करणे आणि पर्यावरणातील असंतुलन रोखणे आहे.
- पर्यटनामुळे जैवविविधतेवर परिणाम होऊ नये यासाठी नियोजन आवश्यक आहे.

**३. वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२**

- पर्यटनामुळे वन्यजीवांवर होणाऱ्या परिणामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण करण्यासाठी हा कायदा लागू केला गेला.
- राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये यांसारख्या संरक्षित क्षेत्रांमध्ये पर्यटनावर विशिष्ट मर्यादा आहेत.

**४. वनसंवर्धन कायदा, १९८०**

- वनक्षेत्राचे संरक्षण आणि पर्यटनाच्या नावाखाली होणाऱ्या वनोत्पादनावर नियंत्रण ठेवण्यासाठी हा कायदा लागू केला आहे.
- पर्यटन प्रकल्पांसाठी वनक्षेत्र वापरायचे असल्यास केंद्र सरकारची परवानगी आवश्यक आहे.

**५. पाणी (प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंध) कायदा, १९७४**

- या कायद्याचा उद्देश पाणी प्रदूषण टाळणे आणि पर्यटनाच्या परिणामस्वरूप जलप्रदूषणावर नियंत्रण ठेवणे आहे.

**६. वायु (प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंध) कायदा, १९८१**

- या कायद्याचा उद्देश हवेतील प्रदूषण रोखणे आहे. पर्यटनाशी संबंधित बांधकाम, वाहतूक इत्यादींमुळे हवेचे प्रदूषण टाळण्यासाठी याचे पालन केले जाते.

**७. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम, २०१६**

- पर्यटन स्थळांवरील प्लास्टिक कचऱ्याचा परिणाम कमी करण्यासाठी आणि त्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी हे नियम आहेत. अनेक राज्यांनी पर्यटन स्थळांवर प्लास्टिकचा वापर बंद केला आहे.

**८. आंतरराष्ट्रीय पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) प्रक्रिया**

- पर्यटन प्रकल्पांचे पर्यावरणीय परिणाम तपासण्यासाठी एखअ आवश्यक आहे. मोठ्या पर्यटन प्रकल्पांना सरकारकडून पर्यावरणीय परवाने मिळविण्यासाठी एखअ अहवाल सादर करावा लागतो.

## तक्रार निवारण मंच (Consumer Dispute Redressal Forums)

तक्रार निवारण मंच (Consumer Dispute Redressal Forums) हे ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी तयार केलेले संस्था आहेत. या मंचांद्वारे ग्राहकांना त्यांच्या समस्यांचे समाधान त्वरित आणि प्रभावीपणे मिळवता येते. भारतात या मंचांचे कार्य Consumer Protection अर्लीं, २०१९ अंतर्गत नियमन केले जाते. यांचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे ग्राहकांचे हक्कांचे संरक्षण करणे, वादांचे निराकरण करणे, आणि ग्राहक आणि व्यवसायांमधील विवाद शांतपणे सोडवणे होय.

**तक्रार निवारण मंचाचे प्रमुख घटक**

- **जिल्हा, राज्य, आणि राष्ट्रीय ग्राहक मंच:** या मंचांवर पर्यटक आपले हक्क गमावल्यास किंवा फसवणूक झाल्यास तक्रार दाखल करू शकतात. तक्रारींचे त्वरित निवारण करून ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी या मंचांची स्थापना करण्यात आली आहे.

- **सांस्कृतिक वारसा संरक्षण कायदे**

पर्यटन क्षेत्राशी संबंधित सांस्कृतिक वारसा संरक्षणाचे कायदे भारतात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. यामध्ये सांस्कृतिक वारसास्थळांचे संवर्धन आणि टिकवण्यासाठी कायदेशीर उपाययोजना केल्या जातात, जेणेकरून या स्थळांचे महत्त्व आणि आकर्षण कायम राहील. पर्यटनामुळे सांस्कृतिक वारसावर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी नियम आणि कायदे लागू केले गेले आहेत. खालीलप्रमाणे पर्यटनाच्या अनुषंगाने सांस्कृतिक वारसा संरक्षणाशी संबंधित काही महत्त्वाचे कायदे आणि नियम दिलेले आहेत:

## प्राचीन स्मारके आणि पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष कायदा, १९५८

**(The Ancient Monuments & Archaelogical Sites & Remains Act 1958)**

- या कायद्याखाली १०० वर्षांपेक्षा जुनी असलेली सर्व प्राचीन स्मारके, पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष संरक्षित केले जातात.
- पर्यटनामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी स्मारकांच्या सभोवतालच्या १०० मीटर क्षेत्राला ''प्रतिबंधित क्षेत्र'' म्हणून जाहीर करण्यात आले आहे. या क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम किंवा व्यावसायिक क्रियाकलाप करण्यासाठी सरकारची परवानगी आवश्यक असते.
- २०० मीटर पर्यंतचा अतिरिक्त ''नियंत्रित क्षेत्र'' म्हणून ठरवला जातो, ज्यात मर्यादित विकास शक्य असतो.

२. **भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) कायदा**

- भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) ही संस्था सांस्कृतिक वारसा स्थळांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी जबाबदार आहे.
- पर्यटनस्थळे जसे की ताजमहाल, खजुराहो, कुतुबमिनार यांसारखी राष्ट्रीय महत्त्वाची स्मारके ASI च्या देखरेखीखाली आहेत.
- ASI स्थळांच्या देखभालीसाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करते, पर्यटनामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी विशेष उपाययोजना लागू करते.

३. **वारसा शहर विकास आणि संवर्धन योजना**

- या योजनेचा उद्देश ऐतिहासिक वारसा शहरांचा विकास करणे आणि त्यांना पर्यावरणपूरक पर्यटन स्थळे बनवणे आहे.

- वारसा शहरांमध्ये शाश्वत पर्यटन विकास घडवून आणण्यासाठी आणि स्थानिक समुदायांचा समावेश करून सांस्कृतिक वारसा स्थळांचे संरक्षण करण्यावर भर दिला जातो.

**४. युनेस्को जागतिक वारसा स्थळे संरक्षण**

- भारतातील युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांसाठी आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे लागू होतात. यामध्ये पर्यटकांच्या संख्येवर मर्यादा घालणे, स्थळांचे शाश्वत व्यवस्थापन, स्थानिक समुदायांचा सहभाग आणि पर्यटनामुळे होणारे पर्यावरणीय व सांस्कृतिक नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना यांचा समावेश आहे.

**५. स्मारक आणि वारसा संरक्षण धोरणे (State-Level Heritage Policies)**

- राज्य पातळीवरील सांस्कृतिक वारसा संरक्षण धोरणे आणि कायदे देखील अस्तित्वात आहेत. जसे की राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्रासारखी राज्ये त्यांच्या ऐतिहासिक वास्तू आणि वारसास्थळांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र कायदे आणि नियम लागू करतात.
- या कायद्यांनुसार, पर्यटनामुळे होणारे सांस्कृतिक आणि पर्यावरणीय नुकसान नियंत्रित करण्यासाठी राज्य सरकारे विविध योजना आखतात.

**६. पुरातत्त्व आणि कला संपत्ती कायदा, १९७२**

- या कायद्याचा उद्देश प्राचीन वस्तूंच्या अवैध तस्करीवर नियंत्रण ठेवणे आहे. पर्यटनाच्या वाढीसोबत ऐतिहासिक वस्तूंची विक्री आणि तस्करी होण्याची शक्यता वाढते, त्यामुळे याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे.

## ब) पर्यटन क्षेत्रात नैतिक नियम (Ethies of Tourism)

पर्यटन क्षेत्रात सामाजिक आणि नैतिक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, कारण यामुळे पर्यटक, स्थानिक समुदाय, आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आवश्यक संतुलन राखले जाते. हे नियम पर्यटकांच्या वर्तनाशी संबंधित असून, पर्यटन स्थळांवरील संस्कृती, पर्यावरण, आणि स्थानिक जनतेच्या जीवनशैलीचा आदर करण्यासाठी आहेत. खाली काही महत्त्वाचे सामाजिक आणि नैतिक नियम दिले आहेत:

**१. स्थानिक संस्कृती आणि परंपरांचा आदर**

- **संस्कृतीचा आदर:** पर्यटकांनी त्या देशातील किंवा प्रदेशातील संस्कृती, धर्म, परंपरा, आणि रीतीरिवाजांचा आदर करावा. जसे की धार्मिक स्थळांवर योग्य वर्तन करणे, तिथे पोशाखाचे नियम पाळणे, आणि स्थानिक लोकांच्या भावना दुखावू नयेत याची काळजी घेणे.
- **स्थानिक भाषा आणि संवाद:** स्थानिक भाषेचा आदर करून, थोडीशी भाषा शिकण्याचा प्रयत्न करणे, जसे की धन्यवाद, कृपया, आणि नमस्कार यांसारखे शब्द, यामुळे स्थानिक लोकांशी चांगले संबंध प्रस्थापित होऊ शकतात.

२. **पर्यावरणाचे संरक्षण**

- **कचरा व्यवस्थापन:** पर्यटन स्थळांवर कचरा फेकणे टाळावे. विशेषतः प्लास्टिकसारख्या वस्तूंचा वापर कमी करावा. कचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध कचरा डब्यात कचरा टाकावा.
- **प्राकृतिक संसाधनांचा वापर:** जल, वन्यजीव, आणि अन्य नैसर्गिक संसाधनांचा वापर मर्यादित प्रमाणात करावा. पर्यावरणाला हानी पोहोचवू नये, जसे की जंगलात आग लावणे, वन्यजीवांना त्रास देणे, किंवा पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रांमध्ये अतिक्रमण करणे.
- **वाहतूक आणि प्रदूषण नियंत्रण:** पर्यटकांनी शक्यतो सार्वजनिक वाहतूक वापरावी, सायकल चालवावी किंवा पायी प्रवास करावा, ज्यामुळे कार्बन फूटप्रिंट कमी होईल.

३. **स्थानिक समुदायाचा आदर**

- **स्थानीय जनतेशी संवाद:** स्थानिक लोकांशी संवाद साधताना आदरयुक्त आणि नम्र वर्तन ठेवावे. त्यांच्या जीवनशैलीबद्दल जाणून घ्यावे आणि त्यांना त्यांच्या जागेत मोकळेपणाने राहू द्यावे.
- **स्थानिक व्यवसायांना पाठिंबा:** स्थानिक उत्पादने, हस्तकला, आणि व्यवसायांना प्रोत्साहन द्यावे. मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांऐवजी स्थानिक दुकाने, रेस्टॉरंट्स, आणि होमस्टेची निवड करावी.

४. **सुरक्षा आणि जबाबदार वर्तन**

- **नशापानाचे नियंत्रण:** सार्वजनिक ठिकाणी नशापान किंवा अनुचित वर्तन करू नये, ज्यामुळे अन्य पर्यटक किंवा स्थानिक लोकांना त्रास होईल.
- **फोटोग्राफीची परवानगी:** स्थानिक लोकांच्या किंवा धार्मिक स्थळांच्या फोटो काढण्यापूर्वी परवानगी घ्यावी. काही ठिकाणी फोटोग्राफीला मनाई असू शकते, ज्याचा आदर करावा.
- **साहसी क्रीडेत सुरक्षितता:** साहसी पर्यटन करताना, सुरक्षा उपकरणे आणि मार्गदर्शकांच्या सूचना पालन करणे आवश्यक आहे. अन्यथा, आपल्या आणि इतरांच्या जीवितास धोका होऊ शकतो.

५. **नैतिक खरेदी आणि व्यापार**

- **कायदेशीर वस्त्र, फुलं, आणि इतर वस्तू:** केवळ कायदेशीरपणे मिळवलेल्या वस्त्र, फुलं, आणि इतर वस्तू खरेदी कराव्यात. वन्यजीव किंवा वनस्पतींच्या संरक्षित प्रजातींची खरेदी किंवा व्यापार करू नये.
- **मोलभाव करताना आदर ठेवा:** बाजारात मोलभाव करताना विक्रेत्यांशी आदरयुक्त वर्तन करावे. विक्रेत्याची किमत सहनशीलतेने ऐकावी आणि योग्य रीतीने चर्चा करावी.

६. **अन्य पर्यटक आणि पर्यावरणाची काळजी**

- **सामाजिक समरसता:** अन्य पर्यटकांच्या आणि स्थानिक लोकांच्या स्वातंत्र्याचा आदर करावा. सार्वजनिक ठिकाणी अनावश्यक आवाज करू नये, कारण त्यामुळे अन्य लोकांना त्रास होऊ शकतो.

- **पारंपरिक ठिकाणी शांतता राखा:** मंदिर, मशिद, चर्च, आणि अन्य धार्मिक स्थळांवर शांती राखावी. तिथे अनावश्यक बोलणे किंवा अनुचित वर्तन टाळावे.

७. **मानवी हक्क आणि सन्मान**

- **शोषण टाळणे:** कोणत्याही प्रकारच्या मानवी शोषण, जसे की बालश्रम, बालविवाह, किंवा मानव तस्करी, यामध्ये सहभागी होऊ नये किंवा याचे समर्थन करू नये. जर असे काही दिसल्यास संबंधित अधिकारी किंवा स्थानिक स्वयंसेवी संघटनांशी संपर्क साधावा.
- **नैतिक साहसी पर्यटन:** वन्यजीव पर्यटन करताना प्राण्यांचा वापर करून कोणत्याही प्रकारची नकारात्मक वर्तन करू नये. उदाहरणार्थ, प्राण्यांना फक्त शोभेच्या उद्देशाने वापरून किंवा त्यांना इजा पोहोचवून मनोरंजन करणे टाळावे.

८. **सहिष्णुता आणि समजूत**

- **धर्म, जात, आणि सांस्कृतिक भिन्नता:** विविध धर्म, जात, आणि संस्कृतींच्या लोकांबद्दल सहिष्णुता आणि समजूत दाखवावी. त्यांच्या रीती-रिवाजांचा आदर करावा आणि त्यांच्या जीवनशैलीबद्दल अवमानकारक टीका करू नये.
- **लिंग समानता:** पर्यटकांनी लिंग समानतेचा आदर करावा आणि महिलांच्या अधिकारांचा आदर करावा. सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या किंवा अन्य कोणाच्याही वर्तनात हस्तक्षेप करू नये.

हे सामाजिक आणि नैतिक नियम पर्यटनाचा अनुभव सुरक्षित, जबाबदार, आणि आनंददायी बनवतात. पर्यटकांनी या नियमांचे पालन करून स्थानिक संस्कृती, समुदाय, आणि पर्यावरणाशी सुसंवाद साधावा, ज्यामुळे पर्यटनाचा प्रभाव सकारात्मक राहील.

**ख. स्वयं-अध्ययन प्रश्न**

**रिकाम्या जागा भरा.**

१. ………… २०१९ ग्राहकांना व्यवसायांकडून होणाऱ्या फसवणुकीपासून वाचवण्यासाठी तयार केले गेले आहेत.

२. ………… वैद्यकीय उपचार, आपत्कालीन परिस्थिती किंवा प्रवासाच्या इतर नुकसानांपासून संरक्षण देतो.

३. ई-कॉमर्स नियम, २०२० हे भारतात ………… नियमन करण्यासाठी तयार करण्यात आलेले कायदे आहेत.

४. ग्राहकांना फसवणूक होईल अशा जाहिराती रोखन्यासाठी ………… तयार करण्यात आलेले आहेत.

५. भारतीय दंड संहितेचे कलम,............ नुसार, ज्यात आर्थिक फसवणूक आणि अन्य प्रकारच्या फसवणुकीवर कारवाई केली जाते.

## १.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

- 'टूरिझम सर्किट'- ही संकल्पना पर्यटन विकासाच्या दृष्टिकोनातून रचली जाते, ज्यामध्ये विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील विविध पर्यटन स्थळांना एकत्रित करून त्यांचे प्रवासी मार्ग तयार केले जातात.
- 'स्पेशल टुरिझम झोन' - ही संकल्पना पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी तयार केली जाते, जिथे विशिष्ट क्षेत्राला पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित केले जाते आणि त्यासाठी विविध प्रकारच्या सवलती व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.
- 'अतुल्य भारत' - या मोहिमेचा उद्देश भारतातील समृद्ध सांस्कृतिक वारसा, निसर्गसौंदर्य, इतिहास, धर्म, आणि विविधता यांचे जगभरात प्रमोशन करणे आहे.

## १.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

अ. १. इ.स १९७५ २. माद्रिद ३. २७ सप्टेंबर ४. २०२३

५. समावेशक वाढीसाठी पर्यटन

ब. १. सार्जंट समिती २. न्यूयॉर्क ३. पर्यटन आणि नागरी वाहतूक मंत्रालय

४. तिसरी ५. १९६६

क. १. ग्राहक संरक्षण कायदे २. प्रवासी विमा ३. ऑनलाइन व्यवहार

४. एडव्हर्टाइजमेंट कायदे ५. ४२०

## १.५ सरावासाठी स्वाध्याय

१. ............ २०१७ या वर्षीची जागतिक पर्यटन दिनाची थीम होती.

२. ............ २०२२ या वर्षीची जागतिक पर्यटन दिनाची थीम होती.

३. संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटनेचे सरचिटणीस म्हणून २०१८ साली ............ यांनी पदभार स्वीकारला.

४. २ एप्रिल २०२२ रोजी, ............ UN टूरिझम सोडण्याची घोषणा केली.

५. संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटनेचे ............ देश सभासद आहेत.

६. पर्यटन विकासासाठी विशेष प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारने सन २००२ मध्ये ............ मोहीम राबविण्यात आली.

७. पर्यटन विकासासाठी विशेष प्रोत्साहन देण्यासाठी सन २०११मध्ये भारत सरकारने ........... मोहीम राबविण्यात आली.

८. आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत पर्यटनाला चालना देण्यासाठी ........... कलमी कार्यक्रम राबविण्यात आला.

९. विदेशी पर्यटकाना भारत भेटीला प्रोत्साहित करण्यासाठी सन २००९ मध्ये ........... मोहीम राबविण्यात आली.

१०. वीजा आणि इमिग्रेशन नियम हे कोणत्याही देशात ........... नागरिकांच्या प्रवेश, तिथे राहणे, आणि कार्य करणे यासंबंधीचे नियम आणि कायदे आहेत.

११. पर्यटन स्थळांवरील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, आणि खाद्य विक्रेते ........... मानकांचे पालन करणे आवश्यक आहे.

१२. ..........., २००२ या कायद्याचा उद्देश जैवविविधतेचे संरक्षण करणे आहे.

१३. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) ही संस्था सांस्कृतिक ........... करण्यासाठी जबाबदार आहे.

१४. पुरातत्त्व आणि कला संपत्ती कायदा, १९७२ या कायद्याचा उद्देश........... नियंत्रण ठेवणे आहे.

१५. ........... ही संस्था जागतिक वारसा स्थळांना संरक्षण देण्याचे काम करते.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे

१. शाश्वत पर्यटन: विकासाचे साधन
२. पर्यटनाचा पुनर्विचार
३. झुराब पोलोलिकेशविली
४. रशिया
५. १६०
६. 'अतुल्य भारत'
७. 'अतिथी देवो भव'
८. नऊ
९. 'व्हिजिट इंडिया'
१०. परदेशी
११. FSSAI
१२. जैविक विविधता कायदा
१३. वारसा स्थळांचे संरक्षण आणि संवर्धन
१४. प्राचीन वस्तूंच्या अवैध तस्करी
१५. युनेस्को

## १.७ संदर्भ ग्रंथ

1. David A. Fennell, Tourism Ethics, Channel View Publications, UK, 2006

2. Rosaleen Duffy, The Ethics of Tourism Development, Routledge, UK, 2004.

3. Francesco Miele and Maximiliano Korstanje, Tourism, Ethics and Social Justice, Emerald Publishing, UK, 2020.
4. UNWTO, Tourism Towards 2030: Global Overview, UNWTO, Madrid, Spain, 2011.
5. UNWTO, Measuring Sustainable Tourism, UNWTO, Madrid, Spain, 2011.
6. Jag Pradeep, Tourism Development, Murari Lal and Sons, New Delhi, 2008.
7. Kabia S.K., Tourism Industry, Reference Press, New Dehli, 2005.
8. Lowton Laura, Weaver, David, Tourism Management, Wiley Publication, 2000.
९. डॉ. नागतोडे, प्रा. पारधी, पर्यटन भूगोल, विद्या प्रकाशन, नागपूर, २००६

❑❑❑

**घटक २**

# पर्यटन क्षेत्रात रोजगाराच्या संधी

(Employment Opportunities in Tourism Sector)

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ पर्यटन सहलीचे पूर्व नियोजन कसे करावे?

२.२.२ पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून सरकारी क्षेत्रातील नोकरीची संधी

२.२.३ पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून खाजगी क्षेत्रामध्ये रोजगारची संधी

२.२.४ निवडक पर्यटन कंपनी

२.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

२.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ सरावासाठी स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे

२.८ संदर्भ ग्रंथ आणि पुस्तके


## २.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यास पुढील घटकांचे आकलन होण्यास मदत होईल.

- टुर ऑपरेटर पर्यटन सहलीचे पूर्व नियोजन कशा प्रकारे करतात याचा आढावा घेणे.
- पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून सरकारी क्षेत्रातील नोकरीची संधी याचा अभ्यास करणे.
- पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून खाजगी क्षेत्रामध्ये रोजगारची संधी याचा अभ्यास करणे.
- पर्यटन क्षेत्रातील निवडक खाजगी कंपनीचा आढावा घेणे.

## २.१ प्रस्तावना

'पर्यटन विकास आणि आर्थिक वाढ' या विषयावर पॅरिसमध्ये आयोजित चर्चासत्रात जागतिक पर्यटन उद्योगाला भविष्यात कोणतीही मर्यादा राहणार नाही, असे मत तज्ञानी व्यक्त केले. जर पर्यटन विकासाला अनुकूल असलेल्या घटकांची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली तर वरील विधान अतिशयोक्तीपूर्ण वाटणार नाही. कारण लोकांचे राहणीमान दिवसेंदिवस वाढत आहे. उत्पन्न वाढत आहे, लोक अधिक सुखी होत आहेत. चांगल्या, जलद वाहतुकीच्या विकासामुळे देशी-विदेशी पर्यटनात मोठी वाढ होत आहे. यामुळे या व्यवसायाच्या भवितव्यास काही मर्यादा पडतील, असे वाटत नाही. जर या व्यवसायाचे अचूक व्यवस्थापन केले, काही मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले तर पर्यटन व्यवसाय हा जगातील अग्रगण्य व्यवसाय होऊ शकतो. पर्यटन व्यवसायाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन आज अनेक खाजगी कंपनी पर्यटकांना सुविधा देण्यासाठी निर्माण झाल्या आहेत. या खाजगी पर्यटन कंपन्या प्रवाशांना विविध पर्याय, लवचिकता, आणि सोयीस्कर प्रवास अनुभव देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ पर्यटन सहलीचे पूर्व नियोजन कसे करावे?

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पर्यटन हा मानवाचा एक महत्त्वाचा आर्थिक व्यवसाय बनला आहे. या व्यवसायाचे वैशिष्ट्य म्हणजे जगातील विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांमध्ये तो विकसित होत आहे.  दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पर्यटन विकासाला विशेष चालना मिळाली. कारण वाहतुकीची विविध साधने, विशेषत: हवाई वाहतूक या काळात मोठ्या प्रमाणात पसार झाला. त्यामुळे जगातील कोणत्याही भागात कमीत कमी वेळेत पोहोचणे शक्य झाले. या शतकाच्या उत्तरार्धात वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, राहणीमान, शिक्षणाचा प्रसार आणि इतर उद्योगांच्या विकासामुळे पर्यटनाला चालना मिळाली. यामुळे पर्यटन हा जागतिक व्यवसाय बनला. पर्यटनाचे आर्थिक महत्त्व लक्षात घेऊन जगातील विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांमध्ये अनेक सहलींचे नियोजन करून देणाऱ्या कंपनी उदयास आल्या. नियोजन करताना मागणी आणि पुरवठा यातील समतोल लक्षात घेणे आवश्यक आहे. पर्यटक हा या व्यवसायाचा ग्राहक असतो. त्याच्या वेगवेगळ्या मागण्या आहेत. उदा. युरोपियन गिर्यारोहकांना हिमालयातील बर्फाच्छादित शिखरे सर करायची असल्यास त्यांना विशेष गिर्यारोहण उपकरणांची आवश्यकता असते. साहित्य वाहून नेण्यासाठी सेवकांची गरज असते, त्यांची सेवा महत्त्वाची असते. पर्यटन कंपनीच्या मार्फत पर्यटकांचे बजेट, वेळ, आवड यातून पर्यटन सहलीचे नियोजन करून देण्यास प्राधान्य देण्यात येते. पर्यटन कंपनी सहलीचे व्यवस्थापन करताना खालील घटकानुसार पूर्व नियोजन करण्यात येते.

**पर्यटन सहलीचे पूर्व नियोजन (Pre-Tour planning)**

टुर ऑपरेटला नियोजन करतांना मागणी व पुरवठा याचा तौलनिक विचार करणे आवश्यक आहे. पर्यटक हा या व्यवसायातील ग्राहक आहे. त्याच्या विविध मागण्या असतात. या मागण्यांचा विचार करून

पर्यटन सहलीचे आयोजन केले पाहिजेत. तसेच पर्यटन स्थळ, वाहतूक, निवास, बजेट या घटकांचा विचार करून पर्यटन सहलीचे नियोजन करावे लागते. टूर ऑपरेटर पर्यटन सहलीचे पूर्व नियोजन करताना विविध टप्पे पार करतात. या टप्प्यांमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो.

### १. पर्यटन स्थळ

पर्यटन सहलीचे नियोजन करताना पहिली पायरी म्हणजे पर्यटन स्थळ निवडणे. निरनिराळ्या पर्यटन स्थळांचे पर्यटकांना वेगवेगळे आकर्षण असते. यानुसार टुर ऑपरेटला पर्यटनासाठी ठिकाणे निवडावी लागतात. टुर ऑपरेटला विविध प्रदेशाचे संशोधन करावे लागते. तेथील पर्यटन स्थळांच्या हवामानाचा अभ्यास करून योग्य ऋतू मध्ये सहलीचे आयोजन करावे लागते. याचबरोबर त्या पर्यटन स्थळी असणारी आकर्षणे, पर्यटन स्थळावरील सुट्टीचा कालावधी यांचा अभ्यास करून सहलीचे नियोजन करावे लागते. ठिकाण निवडताना पर्यटकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने हे ठिकाणी योग्य आहे का नाही याची पाहणी करावी लागते. पर्यटनासाठी नियोजित करावयाच्या प्रदेशातील आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण घटकांचे सर्वेक्षण करून अहवाल तयार करावा लागतो. यामध्ये ऐतिहासिक वास्तू, वास्तू, निसर्गसौंदर्य स्थळे, जाती-जमाती, सांस्कृतिक परंपरा यांचे तपशीलवार विश्लेषण करून आढावा घेतला पाहिजे. पर्यटन स्थळाची पूर्ण माहिती, स्थानिक रीतिरिवाज, हवामान, सण आणि इतर महत्वपूर्ण बाबींचा अभ्यास केला पाहिजेत. यामुळे पर्यटकांना सर्वोत्तम अनुभव मिळेल.

### २. पर्यटनाचा कालावधी

पर्यटनामध्ये प्रवासाचा कालावधी तसेच मुक्कामचा कालावधी याचा विचार करून टुर ऑपरेटला सहलीचे नियोजन करावे लागते. सहलीच्या कालावधीनुसार वाहतूक, राहण्याचे ठिकाण, जेवण व्यवस्था तसेच पर्यटन पाहण्यासाठी लागणारा वेळ याची माहिती घ्यावी लागते.कोणकोणत्या पर्यटन स्थळांना भेटी देणार आहे, त्याचबरोबर पर्यटकांच्या निवासाची व्यवस्था कोठे करणार आहे याचा रोड मॅप बनवावा लागतो. अशा प्रकारे वेळेचे नियोजन केल्यामुळे सहल सुरळीतपणे पार पाडणे शक्य जाते. नियोजनामध्ये सहभागी पर्यटकांना जास्तीत जास्त अनुभव मिळेल या कडे टुर ऑपरेट लक्ष देणे अपेक्षित आहे.

### ३. पर्यटन सेवा पुरवठादार यांच्याशी संपर्क

टूर ऑपरेटरने सहलीचे ठिकाण आणि कालावधी निश्चित केल्यावर सहलीसाठी विविध सेवा सुविधा पुरविणाऱ्या पुरवठादार यांच्याशी संपर्क साधतो. यामध्ये संबंधीत पर्यटन क्षेत्रातील हॉटेल, रेस्टॉरंट व्यावसायिक तसेच वाहतूक सेवा यासारख्या स्थानिक प्रदात्यांशी संबंध प्रस्थापित करतात. एकूण पॅकेज तयार करण्यासाठी ते करार, दर आणि उपलब्धता यावर वाटाघाटी कराव्या लागतात. त्यानुसार सहलीचे बजेट ठरविण्यात मदत होते.

### ४. बजेट

पर्यटन व्यवसायामध्ये सहलीच्या नियोजनामध्ये बजेट हा महत्वाचा भाग असतो. यामध्ये प्रामुख्याने पर्यटकांची आवड, निवास, करमणूक, बाजारपेठ, वाहतूक इत्यादींचा अंदाज घेऊन बजेट बनवावे लागते. टुर ऑपरेटर सर्व सेवा सुविधा पुरविणाऱ्या पुरवठादारांशी चर्चा करून गुतवणूक होणाऱ्या सर्व खर्चाची गणना करतो, त्यामध्ये आपल्या नफ्याची भर घालून ग्राहकांसाठी अंतिम पॅकेजची किंमत ठरवतो. या पॅकेजची रचना पर्यटकांच्या आर्थिक परिस्थिती आणि सेवा सुविधांच्या साधानवरून ठरविण्यात येते.

### ५. जाहिरात

टूर ऑपरेट सहलीचे बजेट निश्चित केल्यावर ग्राहकांच्या पर्यंत आपल्या सहलीची माहिती पोहचविण्यासाठी विविध मार्गांचा वापर करतो. यामध्ये टूर ऑपरेटर त्यांच्या वेबसाइट, ट्रॅव्हल एजंट्स, ऑनलाइन प्लॅटफॉर्म आणि थेट पोहोचण्यासाठी टेलिव्हिजन चॅनेलद्वारे तसेच न्यूज पेपर द्वारे जाहिरात करून सहलीला येण्यास प्रोत्साहित करावे लागते. त्याचबरोबर विविध पातळीवर कार्यक्रमांचे आयोजन करून सहलीची जाहिरात करावी लागते.

### ६. पर्यटकांची नोंदणी

जाहिराती आणि इतर माध्यमातून संपर्कात येणाऱ्या पर्यटकांची नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करत असताना त्यांची वैयक्तिक माहिती तसेच आवश्यक ती कागदपत्रे यांच्या सत्यप्रती घेणे आवश्यक आहे. तसेच परदेशी सहलीचे आयोजन केले असल्यास तिथे लागणारे आवश्यक कागदपत्रे व पासपोर्ट तसेच विजा आहे की नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. पासपोर्ट आणि विजा नसल्यास कशाप्रकारे उपलब्ध करावयाचा याबद्दल मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. याचबरोबर पर्यटकांना कोणते आजार आहेत का असल्यास कोणती औषधे आहेत का यांची माहिती घेणे आवश्यक आहे.

### ७. आरक्षण

पर्यटन सहलीच्या नियोजनामध्ये ग्राहकांचे बुकिंग झाल्यावर त्यांच्या राहण्याच्या व वाहतुकीच्या सुविधांचे आरक्षण करण्यात येते. सर्व प्रवास विमानाद्वारे असेल तर लवकरात लवकर तिकीट आरक्षण केल्यास आरक्षण खर्च कमी येतो तर त्या उलट वेळाने आरक्षण केल्यास तिकीट आरक्षण खर्च वाढला जाण्याची शक्यता असते. काही वेळेला टुर ऑपरेटर विमान कंपन्यांशी संपर्क करून तिकीटांचे निश्चित दर ठारविण्यात येतात. तसेच काही देशांत प्रवासासाठी विशेष परवाने आणि व्हिसा आवश्यक असतात. त्यासाठी संबंधित प्रक्रिया पूर्ण केली पाहिजेत. विमान सेवेच्या आरक्षण बरोबर सहलीचे नियोजन रेल्वेने झाल्यास त्यांचे ही आरक्षण करण्यात येते. वाहतूकीच्या साधनाबरोबर पर्यटकांच्या निवासासाठी हॉटेलचे बुकिंग करण्यात येते. त्याचबरोबर त्यांच्या भोजन व्यवस्था कोणत्या रेस्टॉरंट मध्ये करणार याचीही निश्चिती केली जाते.

एकंदरीत पर्यटकांच्या आवडीनिवडी, भोजन व निवास व्यवस्था, मनोरंजन, करमणूक, वाहतूक आणि बाजार व्यवस्था इत्यादीचा अंदाज घेऊन पर्यटन सहलीचे नियोजन करणे आवश्यक आहे. जर या व्यवसायाचे अचूक नियोजन केले, काही पथ्ये पाळली तर पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून एक रोजगाराची संधी प्राप्त होऊ शकेल.

**स्वाध्याय**

**प्रश्न अ. रिकाम्या जागा भरा.**

१. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ............ हा मानवाचा एक महत्त्वाचा आर्थिक व्यवसाय बनला आहे.

२. पर्यटन सहलीचे नियोजन करताना पहिली पायरी म्हणजे ............ निवडणे.

३. पर्यटन व्यवसायामध्ये सहलीच्या नियोजनामध्ये ............ हा महत्वाचा भाग असतो.

४. परदेशी सहलीचे आयोजन केले असल्यास ............ महत्त्वाचा भाग आहे.

५. वेळाने आरक्षण केल्यास विमान तिकीट आरक्षण खर्च ............ जाण्याची शक्यता असते.

**पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून नोकरीच्या संधी**

पर्यटनाचे रोजगाराच्या अनुषंगाने महत्त्व खूप मोठे आहे. पर्यटन हे आर्थिक विकासाचे एक प्रमुख साधन असून स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर रोजगार निर्मितीला चालना देणारे आहे. पर्यटनाच्या माध्यमातून रोजगाराच्या आकडेवारीचा विचार केला असता, पर्यटन क्षेत्र हे जागतिक तसेच भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. भारतात पर्यटनामुळे थेट आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर निर्माण होतात. सन २०१९ मध्ये भारतीय पर्यटन क्षेत्राने देशातील एकूण रोजगारांपैकी सुमारे १२.७५% रोजगार प्रदान केले होते, जो २०२३ पर्यंत काही प्रमाणात वाढलेला आहे. पर्यटन क्षेत्र विविध प्रकारच्या नोकऱ्या आणि रोजगाराच्या संधी निर्माण करते. हे क्षेत्र भारतात आणि जगभरात आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. पर्यटन क्षेत्रात नोकऱ्यांच्या विविधता आणि रोजगाराच्या संधींचा मोठा पट आहे, ज्यात हॉटेल व्यवस्थापन, ट्रॅव्हल एजन्सी, मार्गदर्शन सेवा, आणि इतर सेवा उद्योगांचा समावेश होतो. याचबरोबर भारतामध्ये शासनामार्फत पर्यटन विकासाला चालना देण्यात येत आहे. याचा परिणाम सरकारी क्षेत्रामध्ये पर्यटनाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

## २.२.२ पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून सरकारी क्षेत्रातील नोकरीची संधी

पर्यटनाच्या माध्यमातून सरकारी क्षेत्रात विविध नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. पर्यटन क्षेत्राचा विस्तार आणि विकास झाल्यामुळे सरकारी पातळीवर अनेक विभाग, संस्थांचा विकास झाला आहे. पर्यटन क्षेत्रात सरकारी नोकरीचे महत्त्व हे विशेष आहे, कारण हे नोकऱ्या स्थिर, सुरक्षित आणि विविध प्रकारच्या सामाजिक आणि आर्थिक लाभांसह येतात. भारतासारख्या देशात पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेता, केंद्र आणि

राज्य सरकारे पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्याच्या व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतात, ज्यामुळे सरकारी नोकऱ्यांचे क्षेत्र अधिक व्यापक होते. यामध्ये पर्यटन मंत्रालय, भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC), राज्य शासनाची पर्यटन महामंडळे, भारतीय विमानतळ प्राधिकरण (Airports Authority of India - AAI), भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग (Archaeological Survey of India - ASI) अशा सरकारी विभागांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहे येथे काही प्रमुख सरकारी नोकरीच्या संधी आणि त्या संबंधित विभागांचे उल्लेख केले आहेत:

## पर्यटन मंत्रालय आणि भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC)

भारत सरकारचे एक महत्त्वाचे विभाग आहे, ज्याचा उद्देश भारतातील पर्यटन उद्योगाचा विकास आणि प्रचार करणे आहे. पर्यटन मंत्रालयात विविध प्रकारच्या नोकऱ्यांची संधी उपलब्ध आहे. येथे धोरणे तयार करणे, पर्यटन स्थळांचा विकास, विपणन, संशोधन, आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या पर्यटनाला प्रोत्साहन देण्याचे काम केले जाते. तसेच भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC) हे भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या अंतर्गत कार्य करणारे एक सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आहे. या महामंडळाअंतर्गत पर्यटन क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देते. त्यांचा आढावा पुढील प्रमाणे,

**१. इंडियन टूरिझम सर्व्हिसेस (Indian Tourism Services - ITS):**

प्रशासनिक आणि धोरणात्मक स्तरावर काम करणे, पर्यटन धोरणांच्या अमलबजावणीत भाग घेणे यासारखे कामाचे स्वरूप असते. या पदासाठी कोणत्याही क्षेत्रातील पदवी अर्ज करू शकतो. याची निवड प्रक्रिया UPSC सिव्हिल सर्व्हिसेस परीक्षेच्या माध्यमातून होते.

**२. पर्यटन माहिती अधिकारी (Tourism Information Officer):**

पर्यटन माहिती अधिकारी पदाच्या माध्यमातून पर्यटन माहिती केंद्रांवर काम करणे, पर्यटकांना माहिती पुरवणे यासारखी कामे केली जातात. या पदासाठी कोणत्याही क्षेत्रातील पदवी तसेच संबंधित क्षेत्रातील अनुभव असलेला व्यक्ति अर्ज करू शकतो. या पदाची निवड लेखी व मुलाखत प्रक्रिये द्वारे होते.

**३. प्रोजेक्ट मॅनेजर (Project Manager):**

'प्रोजेक्ट मॅनेजर' या पदाच्या माध्यमातून विविध पर्यटन प्रकल्पांची आखणी, अंमलबजावणी आणि देखरेख करण्यात येते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी व्यवस्थापन किंवा संबंधित क्षेत्रातील पदवी आवश्यक असते.

**४. हॉटेल व्यवस्थापन (Hotel Management) – ITDC:**

ITDC च्या अंतर्गत हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि पर्यटन केंद्रांमध्ये व्यवस्थापकीय आणि सेवा संबंधित कामे 'हॉटेल व्यवस्थापन' पदाच्या माध्यमातून पाहिली जातात. या पदासाठी अर्ज करण्यासाठी हॉटेल मॅनेजमेंटमध्ये डिग्री किंवा डिप्लोमा आवश्यक लागतो. या पदाची निवड प्रत्यक्ष मुलाखत किंवा अर्जदारच्या अनुभवाच्या आधारे केली जाते.

### ५. मार्केटिंग आणि प्रमोशन (Marketing and Promotion):

भारत सरकारमार्फत पर्यटन स्थळांचे प्रचार आणि मार्केटिंग, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर पर्यटनाचे प्रमोशन करण्यासाठी 'मार्केटिंग आणि प्रमोशन' अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. या पदाची निवड प्रक्रिया लेखी परीक्षा व मुलाखत द्वारे केली जाते. यासाठी अर्जदाराकडे मार्केटिंग किंवा जनसंपर्कातील डिग्री असावी लागते.

### ६. इव्हेंट मॅनेजमेंट (Event Management):

पर्यटनाशी संबंधित कार्यक्रम, उत्सव आणि जागतिक परिषदा आयोजित करण्यासाठी 'इव्हेंट मॅनेजमेंट' या अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंट डिग्री किंवा डिप्लोमा आवश्यकता आहे. या पदाची निवड मुलाखत आणि अर्जदारचा अनुभव पाहून केली जाते.

### ७. आंतरराष्ट्रीय पर्यटन विकास अधिकारी (International Tourism Development Officer):

आंतरराष्ट्रीय पर्यटनाच्या संधी शोधणे, भारतातील पर्यटन स्थळांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचार करण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय पर्यटन विकास' अधिकाऱ्याची नेमणूक भारत सरकारच्या माध्यमातून केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंध किंवा पर्यटन व्यवस्थापनातील पदवी अशी शैक्षणिक पात्रता लागते.

### ८. टूर गाईड (Tour Guide):

पर्यटकांना ऐतिहासिक, सांस्कृतिक व नैसर्गिक स्थळांची माहिती देण्यासाठी 'टुर गाईड'ची नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी सरकारमान्य प्रशिक्षण किंवा प्रमाणपत्र आवश्यक लागते. या पदाची निवड लेखी परीक्षा द्वारे केली जाते.

- **राज्य पर्यटन विकास महामंडळे** (STDCs)

'राज्य पर्यटन विकास महामंडळे' राज्य सरकारांच्या अंतर्गत काम करणारी संस्था आहे, ज्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करणे, त्यांचा प्रचार करणे आणि राज्याच्या पर्यटन धोरणांची अंमलबजावणी करणे. प्रत्येक राज्याचे स्वतंत्र पर्यटन विकास महामंडळ असते, जसे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC), गोवा पर्यटन विकास महामंडळ (GTDC) आणि इतर. या महामंडळांतर्गत विविध नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

## राज्य पर्यटन विकास महामंडळात नोकरीची संधी:

### १. पर्यटन अधिकारी (Tourism Officer)

पर्यटन अधिकारी पदाच्या मार्फत पर्यटन स्थळांचा प्रचार करणे, पर्यटन प्रकल्पांचे नियोजन करणे, आणि राज्यातील पर्यटन धोरणांची अंमलबजावणी करणे यासारखी कामे केली जातात. या पदासाठी अर्ज करण्यासाठी पर्यटन व्यवस्थापन, इतिहास, भूगोल, किंवा संबंधित विषयात पदवी/पदव्युत्तर पदवी ही शैक्षणिक पात्रता लागते.

तसेच पर्यटन उद्योगातील अनुभव किंवा सरकारी प्रशासकीय अनुभव असणे आवश्यक आहे.

### २. सहाय्यक व्यवस्थापक (Assistant Manager)

पर्यटन प्रकल्पांवर व्यवस्थापन, विपणन, आणि प्रशासनाचे कार्य करणे. ग्राहक सेवा आणि पर्यटन स्थळांची व्यवस्थापन पाहणे यासाठी 'सहाय्यक व्यवस्थापका'ची निवड केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी पर्यटन व्यवस्थापनात पदवी किंवा संबंधित विषयातील डिप्लोमा आवश्यक आहे. तसेच पर्यटन क्षेत्रात अनुभव असणे आवश्यक आहे.

### ३. पर्यटन विकास अधिकारी (Tourism Development Officer)

पर्यटन प्रकल्पांचे नियोजन आणि व्यवस्थापन करणे, स्थानिक पर्यटन विकासाला चालना देणे, आणि राज्याच्या पर्यटन धोरणांवर काम करण्यासाठी 'पर्यटन विकास अधिकाऱ्या'ची निवड करण्यात येते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी पर्यटन व्यवस्थापन, विकास अभ्यास किंवा संबंधित क्षेत्रात पदवी/पदव्युत्तर पदवी शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. तसेच पर्यटन विकास प्रकल्पांमध्ये काम करण्याचा अनुभव आवश्यक आहे.

### ४. विपणन अधिकारी (Marketing Officer)

राज्याच्या पर्यटन स्थळांचा प्रचार, विपणन धोरणे तयार करणे, आणि पर्यटन आकर्षणांचा प्रचार करण्यासाठी विपणन अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी चइअ (Marketing) किंवा पर्यटन व्यवस्थापनात पदवी आवश्यक लागते. तसेच विपणन आणि प्रचाराच्या क्षेत्रात अनुभव असावा लागतो.

### ५. पर्यटक माहिती केंद्र अधिकारी (Tourist Information Centre Officer)

पर्यटकांना माहिती देणे, पर्यटन स्थळांविषयी माहिती पुरवणे, आणि पर्यटकांना सेवा पुरवणे यासारखी कामे करण्यासाठी पर्यटक माहिती केंद्र अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी पर्यटन अभ्यास किंवा हॉटेल मॅनेजमेंटमधील पदवी किंवा डिप्लोमा आवश्यक आहे.

### ६. हॉटेल व्यवस्थापक (Hotel Manager)

राज्य सरकारच्या मालकीच्या हॉटेल्स आणि लॉजेसचे व्यवस्थापन करणे, ग्राहक सेवा, कर्मचारी व्यवस्थापन आणि सोयी-सुविधांची देखरेख करणे यासाठी 'हॉटेल व्यवस्थापक' या अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी हॉटेल मॅनेजमेंटमध्ये पदवी किंवा डिप्लोमा शैक्षणिक पात्रता लागते. तसेच हॉटेल व्यवस्थापन किंवा हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील अनुभव आवश्यक आहे.

### ७. वरिष्ठ संशोधन अधिकारी (Senior Research Officer)

राज्यातील पर्यटन विकासाचे संशोधन करणे, डेटा गोळा करणे, पर्यटन प्रवृत्तींचे विश्लेषण करणे, आणि धोरणे तयार करण्यात मदत करणे यासाठी वरिष्ठ संशोधन अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. यासाठी पर्यटन

अभ्यास, अर्थशास्त्र, किंवा विकास अभ्यासातील पदवी अर्ज करण्यासाठी शैक्षणिक पात्रता लागते. तसेच संशोधन आणि डेटा विश्लेषणाच्या क्षेत्रात अनुभव असावा.

### ८. पर्यटन योजना अधिकारी (Tourism Planning Officer)

पर्यटन स्थळांचे आणि प्रकल्पांचे दीर्घकालीन नियोजन करणे, प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी सहकार्य करणे यासाठी पर्यटन योजना अधिकारी नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी पर्यटन व्यवस्थापन, भूगोल किंवा विकास अभ्यासातील पदवी/पदव्युत्तर पदवी आवश्यक आहे. तसेच नियोजन आणि प्रकल्प व्यवस्थापनातील अनुभव लागतो.

## • इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (IRCTC)

भारतीय रेल्वेच्या पर्यटन विभागाचे व्यवस्थापन (IRCTC) अंतर्गत केले जाते. IRCTC हे भारतीय रेल्वेचे एक अंग आहे, जे रेल्वे प्रवाशांसाठी खानपान, तिकीट बुकिंग, आणि पर्यटन सेवा पुरवते. पर्यटन क्षेत्रात IRCTC महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, आणि विविध प्रकारच्या पर्यटन पॅकेजेस तसेच विशेष ट्रेन सेवा उपलब्ध करून देते. येथे पर्यटनाशी संबंधित विविध भूमिका आहेत. यामुळे या विभागात नोकरीच्या संधी मध्ये मिळू शकतात. भारतीय रेल्वेच्या पर्यटन विभागात (IRCTC) विविध पदांसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि इतर कौशल्ये पदानुसार भिन्न असतात. खाली काही प्रमुख पदांसाठी अपेक्षित शैक्षणिक पात्रता दिली आहे:

### १. टुरिझम ऑफिसर / टुरिझम एक्झिक्युटिव्ह

पर्यटन विभागात टूर पॅकेजेस तयार करणे, प्रवाशांच्या सोयी-सुविधा आणि मार्गदर्शन करणे यासंबंधी जबाबदाऱ्या असतात यासाठी टुरिझम ऑफिसर/टुरिझम एक्झिक्युटिव्ह नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी पर्यटन व्यवस्थापन (Tourism Management), हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट किंवा संबंधित विषयात पदवी/पदविका (Diploma) अशी शैक्षणिक पात्रता लागते. तसेच काही पदांसाठी अनुभव गरजेचा असतो. फ्रेशर्ससाठीही काही वेळा संधी असते.

### २. मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह (Tourism Marketing Executive)

IRCTC च्या टूर पॅकेजेस आणि पर्यटन सेवांचे प्रचार आणि विपणन करण्यासाठी मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी मार्केटिंग, व्यवसाय प्रशासन (MBA - Marketing), किंवा पर्यटन व्यवस्थापनात पदवी आवश्यक आहे.याचबरोबर मार्केटिंग आणि पर्यटन क्षेत्रात अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाते.

### ३. ट्रॅव्हल कन्सल्टंट (Travel Consultant)

IRCTC मध्ये प्रवाशांना त्यांच्या ट्रॅव्हल पॅकेजेस आणि ठिकाणे निवडण्यात मदत करण्यासाठी ट्रॅव्हल कन्सल्टंट या अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. यासाठी शैक्षणिक पात्रता म्हणून पर्यटन व्यवस्थापन किंवा हॉस्पिटॅलिटीमध्ये पदवी/डिप्लोमा लागतो.

### ४. कस्टमर सर्व्हिस असोसिएट (Customer Service Associate)

प्रवाशांना तिकीट बुकिंग, तक्रारींचे निराकरण, आणि पर्यटन पॅकेजेससाठी मार्गदर्शन करणे यासाठी खठउढउ मार्फत कस्टमर सर्व्हिस असोसिएटची नेमणूक केली जाते. यासाठी शैक्षणिक पात्रता म्हणून कोणत्याही शाखेतील पदवीधर असणे आवश्यक आहे. तसेच प्रवासी व्यवस्थापन किंवा ग्राहक सेवा क्षेत्रात अनुभव असल्यास उत्तम.

### ५. कॅटरिंग मॅनेजर (Catering Manager)

पर्यटनाच्या ट्रेन्समध्ये, विशेषत: IRCTC च्या टूर पॅकेजमध्ये खानपान व्यवस्थापन करण्यासाठी कॅटरिंग मॅनेजरची नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी शैक्षणिक पात्रता कॅटरिंग तंत्रज्ञान किंवा हॉस्पिटॅलिटी व्यवस्थापनातील डिप्लोमा/पदवी लागते.

IRCTC मध्ये नोकरीसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि अनुभव पूर्ण केल्यानंतर संबंधित भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळू शकते. लेखी परीक्षा, मुलाखत, आणि अनुभवाच्या आधारे वरील पदावर निवड केली जाते.

## • भारतीय विमानतळ प्राधिकरण (Airports Authority of India - AAI)

भारतीय विमानतळ प्राधिकरण हे भारतातील नागरी उड्डाण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेले एक महत्त्वाचे सरकारी संस्थान आहे, जे विमानतळ व्यवस्थापन, विमानचालन सेवा, आणि सुरक्षितता सेवा पुरवते. पर्यटन क्षेत्राशी संबंधित नोकऱ्यांसाठी AAI मध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत, कारण विमानतळ व्यवस्थापनात पर्यटनाशी संबंधित कामे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. AAI मध्ये पर्यटन क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये पुढील पदाचा समावेश होतो.

### १. ग्राहक सेवा अधिकारी (Customer Service Officer)

प्रवाशांना माहिती देणे, तक्रारींचे निराकरण करणे, आणि विमानतळावरील प्रवाशांच्या सोयीसुविधांची काळजी घेणे यासाठी ग्राहक सेवा अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. या पदासाठी कोणत्याही क्षेत्रातील पदवीधर, तसेच ग्राहक सेवा आणि संवाद कौशल्ये असणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

### २. टुरिझम ऑफिसर (Tourism Officer)

विमानतळावर पर्यटकांसाठी सेवा पुरवणे, पर्यटन स्थळांची माहिती देणे, आणि IRCTC किंवा इतर टूर ऑपरेटरच्या सेवांचा समन्वय साधण्यासाठी टुरिझम ऑफिसरची नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी पर्यटन व्यवस्थापन किंवा संबंधित क्षेत्रातील पदवी किंवा डिप्लोमा असणे आवश्यक आहे.

### ३. विपणन कार्यकारी (Marketing Executive)

पर्यटनाशी संबंधित सेवा आणि पॅकेजेसचे प्रचार, विमानतळावरील पर्यटक सुविधा केंद्रांचे विपणन, आणि विमानतळाशी संबंधित पर्यटन उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी विपणन कार्यकारी अधिकाऱ्यांची

नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी व्यवसाय व्यवस्थापन (MBA - Marketing) किंवा पर्यटन व्यवस्थापनात पदवी/डिप्लोमा ही शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे.

भारतीय विमानतळ प्राधकिरण मध्ये पर्यटनाशी संबंधित नोकऱ्या म्हणजे प्रवाशांच्या सेवेसाठी आणि पर्यटन वाढवण्यासाठी काम करण्याची संधी आहे. विमानतळाच्या व्यवस्थापनातील अशा प्रकारच्या भूमिकांमुळे पर्यटन क्षेत्रात उत्तम करिअर संधी निर्माण होतात.

- **भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग (Archaeological Survey of India - ASI)**

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग हे भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत एक महत्त्वाचे संस्थान आहे. ASI भारतातील ऐतिहासिक स्थळे, प्राचीन स्मारके, आणि सांस्कृतिक वारसा संरक्षित करण्याचे काम करते. पर्यटन क्षेत्राशी संबंधित नोकऱ्यांसाठी ASI मध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत, कारण ASI अनेक पर्यटन स्थळे आणि ऐतिहासिक स्मारकांचे संरक्षण करते, जे पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र असतात. ASI मध्ये पर्यटनाशी अनुषंगाने खालील पदांवर नोकरीच्या संधी मिळू शकतात:

**१. टुरिस्ट गाईड (Tourist Guide)**

पर्यटकांना ऐतिहासिक स्थळे, स्मारके यांची माहिती देणे. त्यांचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करणे यासाठी ASI मार्फत टुरिस्ट गाईडची नेमणूक करण्यात येते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी इतिहास, पुरातत्त्वशास्त्र किंवा पर्यटन व्यवस्थापनात पदवी आवश्यक आहे.

**२. स्मारक व्यवस्थापक (Monument Manager)**

ऐतिहासिक स्मारकांच्या देखरेखीची जबाबदारी, पर्यटन व्यवस्थापन, पर्यटकांच्या सुविधांची योजना आणि पर्यटकांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी स्मारक व्यवस्थापकाची नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी इतिहास, पुरातत्त्वशास्त्र, किंवा स्मारक व्यवस्थापनात पदवी आवश्यक आहे. तसेच सांस्कृतिक वारसा किंवा पर्यटन क्षेत्रात अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाते.

**३. संग्रहालय व्यवस्थापक (Museum Manager)**

या पदासाठी अर्ज करण्यासाठी संग्रहालयशास्त्र (Museum Studies), पुरातत्त्वशास्त्र, किंवा इतिहासात पदवी/पदविका आवश्यक आहे.

**४. संशोधन अधिकारी (Research Officer)**

ऐतिहासिक ठिकाणे आणि पुरातत्त्वीय स्थळांवर संशोधन करणे, स्मारकांची माहिती गोळा करणे, आणि ती पर्यटकांसाठी उपयुक्त स्वरूपात सादर करणे यासाठी ASI मार्फत संशोधन अधिकारी यांची नेमणूक केली जाते. या पदासाठी अर्ज करण्यासाठी इतिहास, पुरातत्त्वशास्त्र किंवा संबंधित विषयात मास्टर्स किंवा पीएचडी शैक्षणिक पात्रता लागते.

## ५. पर्यटक सूचना अधिकारी (Tourist Information Officer)

पर्यटकांना ASI च्या ऐतिहासिक स्थळे आणि पर्यटन केंद्रांविषयी माहिती पुरवणे, तिकीट व्यवस्थापन, मार्गदर्शन, आणि पर्यटकांच्या समस्या सोडवणे यासाठी पर्यटक सूचना अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. यासाठी पर्यटन व्यवस्थापन किंवा संबंधित विषयात पदवी/डिप्लोमा अशी शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे.

पुरातत्व सर्वेक्षण विभाग (ASI) मध्ये पर्यटनाशी संबंधित नोकऱ्या म्हणजे ऐतिहासिक स्थळे, सांस्कृतिक वारसा, आणि पर्यटक सेवांमध्ये काम करण्याची उत्तम संधी आहे. भारतीय पर्यटन आणि वारसा संरक्षणाच्या दृष्टिकोनातून या नोकऱ्यांना विशेष महत्त्व आहे. लेखी परीक्षा, मुलाखत, आणि इतर निवड प्रक्रियेच्या माध्यमातून पात्र उमेदवारांची निवड केली जाते.

**स्वाध्याय**

**प्रश्न ब. रिकाम्या जागा भरा.**

१. पर्यटनाशी संबंधित कार्यक्रम, उत्सव आयोजित करण्यासाठी ............ या अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते.

२. 'आंतरराष्ट्रीय पर्यटन विकास' अधिकाऱ्याची नेमणूक ............ च्या माध्यमातून केली जाते.

३. पर्यटकांना ऐतिहासिक, सांस्कृतिक व नैसर्गिक स्थळांची माहिती देण्यासाठी ............ ची नेमणूक केली जाते.

४. 'राज्य पर्यटन विकास महामंडळे'............ सरकारांच्या अंतर्गत काम करणारी संस्था आहे.

५. राज्याच्या पर्यटन धोरणांवर काम करण्यासाठी ............ अधिकाऱ्याची निवड करण्यात येते.

### २.२.३ पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून खाजगी क्षेत्रामध्ये रोजगारची संधी

पर्यटन क्षेत्रातील खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. या क्षेत्राचा मोठा विस्तार होत असल्यामुळे, हॉटेल्स, ट्रॅव्हल कंपन्या, इव्हेंट मॅनेजमेंट, पर्यटन तंत्रज्ञान, आणि साहसी पर्यटन यांसारख्या विविध उपक्षेत्रांमध्ये रोजगाराच्या विविध संधी निर्माण झाल्या आहेत. खाली काही प्रमुख खाजगी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी आणि त्यांच्या संबंधित जबाबदाऱ्या दिल्या आहेत.

## १. ट्रॅव्हल एजंट आणि टूर ऑपरेटर (Travel Agent and Tour Operator)

खाजगी क्षेत्रांमध्ये पर्यटन कंपनी 'ट्रॅव्हल एजंट आणि टूर ऑपरेटरची' नेमणूक केली जाते. ट्रॅव्हल एजंट्स आणि टूर ऑपरेटर्स पर्यटकांसाठी प्रवासाचे नियोजन करतात, त्यात विमानाची तिकिटे, हॉटेल्स, वाहतूक आणि प्रवासाच्या विविध सेवा पुरवतात. ते पर्यटकांसाठी आकर्षक पॅकेजेस तयार करतात आणि स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय प्रवासांचे आयोजन करतात. या क्षेत्रात काम करणारे कर्मचारी प्रवासाशी संबंधित कागदपत्रे आणि व्हिसा प्रक्रिया यांच्यावर लक्ष केंद्रित करतात. या पदासाठी पर्यटन व्यवस्थापन,

मार्केटिंग, किंवा हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात पदवी किंवा डिप्लोमा अशी शैक्षणिक पात्रता आवश्यक असते. तसेच चांगले संवाद कौशल्य आणि ग्राहक सेवा कौशल्य आवश्यक आहे.

### २. हॉटेल व्यवस्थापन (Hotel Management)

हॉटेल व्यवस्थापन क्षेत्रात अनेक पदे असतात, जसे की फ्रंट ऑफिस व्यवस्थापक, हाऊसकीपिंग मॅनेजर, केटरिंग मॅनेजर, इव्हेंट मॅनेजर, इत्यादी. या कर्मचाऱ्यांची जबाबदारी म्हणजे पर्यटकांसाठी सर्वोत्तम सेवांची व्यवस्था करणे, हॉटेलच्या कार्यक्षमतेत वाढ करणे, आणि ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करणे. या पदासाठी हॉस्पिटॅलिटी आणि हॉटेल व्यवस्थापनात डिप्लोमा किंवा पदवी आवश्यक आहे. तसेच नेतृत्व गुण आणि ग्राहक सेवा कौशल्य अत्यंत महत्त्वाचे आहेत.

### ३. इव्हेंट मॅनेजमेंट (Event Management)

इव्हेंट मॅनेजर्स विविध पर्यटन इव्हेंट्स, कॉन्फरन्सेस, विवाह समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि व्यवसायिक भेटी यांचे नियोजन करतात. ते स्थल, तंत्रज्ञान, अन्न व्यवस्थापन, आणि मनोरंजनाची सोय करतात, ज्यामुळे पर्यटकांना आकर्षक अनुभव मिळतो. या पदासाठी अर्ज करण्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमा किंवा पदवी, तसेच मार्केटिंग आणि व्यवस्थापन कौशल्य आवश्यक आहे.

### ४. पर्यटन तंत्रज्ञान (Tourism Technology)

पर्यटन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करणारे कर्मचारी वेबसाइट्स, मोबाइल ॲप्स आणि बुकिंग प्लॅटफॉर्म्स तयार करतात. पर्यटकांना ऑनलाइन बुकिंग, प्रवासाचे नियोजन आणि प्रवासाची माहिती पुरवण्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर करतात. तसेच Artificial Intelligence (AI) आणि Virtual Reality (VR) सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यटकांना उत्तम अनुभव दिला जातो. या पदासाठी अर्ज करण्यासाठी संगणक विज्ञान, आयटी, किंवा संबंधित क्षेत्रातील पदवी, तसेच तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान आवश्यक आहे.

### ५. डिजिटल मार्केटिंग आणि सोशल मीडिया मॅनेजमेंट (Digital Marketing and Social Media Management)

'डिजिटल मार्केटिंग एक्सपर्ट्स' पर्यटन व्यवसायाच्या जाहिरातींवर काम करतात आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्म्सद्वारे ग्राहकांना आकर्षित करतात. सोशल मीडिया व्यवस्थापक पर्यटकांसाठी सामग्री तयार करतात, प्रचार मोहिम चालवतात, आणि ब्रँडचे ऑनलाइन प्रतिनिधित्व करतात. या पदासाठी अर्ज करण्यासाठी डिजिटल मार्केटिंगमध्ये डिप्लोमा किंवा अनुभव, तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर कार्यक्षमता आवश्यक आहे.

### ६. टूर गाईड (Tour Guide)

पर्यटक आणि पर्यटन ठिकाण यांचा मधील दुवा म्हणजे गाईड होय. टूर गाईड्स पर्यटकांना ऐतिहासिक, सांस्कृतिक, आणि निसर्गरम्य स्थळांची माहिती देतात. त्यांचा कामाचा भाग म्हणजे पर्यटन स्थळांचे ज्ञान,

स्थानिक संस्कृतीचे सखोल ज्ञान आणि पर्यटकांशी उत्तम संवाद साधणे. या पदासाठी अर्ज करण्यासाठी स्थानिक पर्यटन विभाग किंवा पर्यटन संस्थांमार्फत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच विविध भाषांचे ज्ञान लाभदायक ठरते.

### ७. साहसी पर्यटन व्यवस्थापक (Adventure Tourism)

साहसी पर्यटन क्षेत्रात कार्य करणारे कर्मचारी ट्रेकिंग, पर्वतारोहण, रिव्हर राफ्टिंग, स्कूबा डायव्हिंग इत्यादी साहसी क्रीडांचे आयोजन करतात. ते सुरक्षितता, उपकरणांची देखरेख आणि पर्यटकांच्या साहसी अनुभवांना उत्तम बनवतात. येथे काम करण्यासाठी साहसी पर्यटन आणि सुरक्षितता व्यवस्थापनाचे प्रशिक्षण आवश्यक आहे. तसेच साहसात रुची असलेले व्यक्ती या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करू शकतात.

### ८. क्रूझ आणि एअरलाईन्स (Cruise and Airlines)

क्रूझ आणि एअरलाईन्समध्ये कॅबिन क्रू, ग्राहक सेवा अधिकारी, आणि प्रवास सहाय्यक यांच्या नोकऱ्या उपलब्ध आहेत. पर्यटकांना सर्वोत्तम प्रवास अनुभव देणे, प्रवासासंदर्भातील तांत्रिक आणि सेवा संबंधित सहाय्य पुरवणे हे त्यांचे प्रमुख काम असते. या पदासाठी पात्रता हवाई सेवा किंवा क्रूझ व्यवस्थापनाचे प्रशिक्षण, तसेच ग्राहक सेवा कौशल्य आवश्यक आहे.

### ९. हॉस्पिटॅलिटी उद्योगातील प्रशिक्षण अधिकारी (Hospitality Trainer)

हॉस्पिटॅलिटी ट्रेनर म्हणून, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना तांत्रिक आणि सेवासंबंधित कौशल्य शिकवणे. तसेच उत्कृष्ट ग्राहक सेवा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सेवा पुरवण्यासाठी कर्मचारी तयार करणे. या पदासाठी पात्रता हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील अनुभव आणि प्रशिक्षक म्हणून संबंधित कौशल्य आवश्यक आहे.

### १०. आरोग्य आणि कल्याण पर्यटन अधिकारी (Wellness and Medical Tourism)

आरोग्य आणि कल्याण केंद्रे चालवणे, आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी आयुर्वेद, योग, आणि नैसर्गिक चिकित्सा सेवा प्रदान करणे यासाठी आरोग्य आणि कल्याण पर्यटन नेमणूक केली जाते. वैद्यकीय पर्यटकांसाठी सुविधांची व्यवस्था करणे, त्यात रुग्णालय, वैद्यकीय सेवा आणि सहकारी सुविधांचा समावेश आहे. या पदासाठी पात्रता वैद्यकीय सेवा व्यवस्थापन, योग किंवा आयुर्वेदात प्रशिक्षण आवश्यक आहे.

### ११. फूड आणि बेव्हरेज (Food and Beverage)

रेस्टॉरंट्स, कॅफे, बार, आणि इतर फूड सर्व्हिसेसमध्ये शेफ, कुक, बारटेंडर, आणि व्यवस्थापक म्हणून काम करता येते. यासाठी पात्रता फूड सर्व्हिसेस किंवा हॉस्पिटॅलिटीमध्ये प्रशिक्षण लागते.

### १२. ऑनलाइन ट्रॅव्हल पोर्टल्स आणि बुकिंग प्लॅटफॉर्म्स:

ऑनलाइन ट्रॅव्हल वेबसाइट्समध्ये काम करण्यासाठी IT, मार्केटिंग, डेटा एनालिसिस, आणि कस्टमर सपोर्ट या क्षेत्रात नोकरीच्या संधी आहेत. या पदासाठी अर्ज करण्यासाठी संगणक विज्ञान, आयटी, किंवा

संबंधित क्षेत्रातील पदवी, तसेच तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान आवश्यक आहे. तसेच विविध भाषांचे ज्ञान लाभदायक ठरते.

पर्यटनाच्या खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या असंख्य संधी आहेत, ज्या तांत्रिक, व्यवस्थापन, सेवा, आणि साहसी क्षेत्रांमध्ये उपलब्ध आहेत. या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी संबंधित शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक कौशल्ये आणि अनुभव आवश्यक असतात. त्यामुळे, खाजगी क्षेत्रातील पर्यटन उद्योग वेगाने वाढत असल्यामुळे रोजगाराच्या उत्तम संधी मिळत आहेत.

**स्वाध्याय**

**प्रश्न क. रिकाम्या जागा भरा.**

१. खाजगी क्षेत्रांमध्ये पर्यटन कंपनी पर्यटन सहलीचे नियोजन करण्यासाठी ........... नेमणूक केली जाते.

२. ............ या पदासाठी हॉस्पिटॅलिटी आणि हॉटेल व्यवस्थापनात डिप्लोमा किंवा पदवी आवश्यक आहे.

३. ............ विविध पर्यटन कार्यक्रमाचे नियोजन करतात.

४. 'डिजिटल मार्केटिंग एक्सपर्ट्स' पर्यटन व्यवसायाच्या जाहिरातींवर काम करतात.

५. पर्यटक आणि पर्यटन ठिकाण यांचा मधील दुवा म्हणजे ........... होय.

## २.२.४ निवडक पर्यटन कंपनी

भारतातील शेकडो टूर ऑपरेटर आणि ट्रॅव्हल एजन्सी वेगवेगळी पॅकेजेस आणि सेवा देतात. पर्यटकांच्या गरजा आणि बजेट पाहून सहलीचे आयोजन करतात. यातील काही प्रमुख कंपनीचा आढावा घेण्यात येणार आहे. या कंपन्या दीर्घकाळापासून पर्यटन उद्योगात आहेत, त्यांच्याकडे कार्यालये आणि भागीदारांचे विस्तृत नेटवर्क आहे, त्यांच्याकडे उच्च दर्जाची गुणवत्ता आणि सेवा आहे आणि त्यांचा एकनिष्ठ ग्राहक आधार आहे. तुम्ही समूह, खाजगी, सानुकूलित किंवा सेल्फ-ड्राइव्ह टूर शोधत असाल तरीही, या कंपन्या तुमची प्राधान्ये आणि अपेक्षा पूर्ण करू शकतात.

**कॉक्स अँड किंग्स** (Cox & Kings)

कॉक्स अँड किंग्स ही जगातील सर्वात जुन्या ट्रॅव्हल कंपन्यांपैकी एक होती, जी १७५८ साली स्थापित झाली. कंपनीची स्थापना इंग्लंडमधील रिचर्ड कॉक्स यांनी केली होती. सुरुवातीला कंपनीची स्थापना ब्रिटिश सैन्याशी संबंधित कार्यांकरिता झाली होती, आणि ती मुख्यतः सैन्याच्या प्रवास आणि लॉजिस्टिक्सच्या व्यवस्थापनासाठी काम करत होती. पुढे, ही कंपनी जगभरात एक मोठी ट्रॅव्हल आणि टूर ऑपरेटर म्हणून प्रसिद्ध झाली. १८०० च्या दशकात कंपनीने प्रवासी सेवांमध्ये आपला विस्तार केला. तिने लष्कर आणि व्यापारी प्रवाशांसाठी प्रवासाची सेवा पुरवण्यास सुरुवात केली. ब्रिटिश राजवटीच्या काळात, कंपनीने भारतात आपले कामकाज सुरू केले, आणि ब्रिटिश अधिकारी आणि पर्यटकांसाठी प्रवास सेवा पुरवण्यास सुरुवात

केली. १९२३ साली कॉक्स अँड किंग्स ही अधिकृत ट्रॅव्हल एजंट बनली आणि तिने ट्रॅव्हल टूर ऑपरेशनमध्ये प्रवेश केला. १९०० शतकाच्या मध्यात, कंपनीने भारतातील ब्रिटिश नागरिकांसाठी विविध प्रकारच्या प्रवासी योजना सादर केल्या, ज्यात पर्यटन, शिक्षण, आणि बिझनेस प्रवासाचा समावेश होता. इ. स. १९७० मध्ये कंपनीचे मुख्यालय मुंबई, भारत येथे हलवण्यात आले. यावेळी कंपनीने प्रवासाचे विविध पॅकेजेस, उदा. शैक्षणिक टूर, अवकाश यात्रा, सहल योजना यांचे आयोजन करण्यास सुरुवात केली.

इ.स. २००० साली कॉक्स अँड किंग्सने मोठ्या प्रमाणावर जागतिक विस्तार केला. तिने युरोप, अमेरिका, आणि आशियामधील बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती वाढवली. कंपनीने विविध ट्रॅव्हल कंपन्या आणि टूर ऑपरेटर्सचा अधिग्रहण केला, ज्यात UK मधील "Holiday break" ही कंपनी आणि अमेरिकेतील "Gateway Holidays" यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय टूर ऑपरेटर म्हणून कंपनीने विविध पर्यटन ठिकाणी लक्झरी प्रवास, कौटुंबिक सहल, आणि व्यावसायिक प्रवासाच्या योजना सुरू केल्या. २०१९ साली कॉक्स अँड किंग्स कंपनी आर्थिक संकटात सापडली. कर्जफेडीच्या समस्या, बँक कर्जाचे भुगतान न होणे यामुळे कंपनी अडचणीत आली. इ.स. २०२० साली कंपनीने दिवाळखोरी घोषित केली, आणि त्यानंतर ती बुडाल्याचे जाहीर केले. यामुळे कंपनीची जवळपास २६० वर्षांची प्रवास सेवा संपुष्टात आली.

**SOTC (Sind Oriental Travel Company)**

SOTC (Sind Oriental Travel Company) ही भारतातील एक प्रमुख ट्रॅव्हल आणि टूर ऑपरेटर कंपनी आहे. SOTC चा इतिहास भारतीय पर्यटन उद्योगाच्या विकासाशी जोडलेला आहे, आणि त्याचे योगदान आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक प्रवास सेवांमध्ये महत्त्वपूर्ण आहे. SOTC ची स्थापना इ.स.१९४९ मध्ये झाली. या कंपनीने भारतातील आणि आंतरराष्ट्रीय प्रवास सेवा पुरवण्याचे उद्दिष्ट ठेवले. सुरुवातीला SOTC ने भारतातून आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळांसाठी टूर ऑपरेटर सेवा पुरवण्याचे काम केले. प्रवासाची योजना, टूर पॅकेजेस, आणि प्रवाशांसाठी मदत या सेवा कंपनीने दिल्या. कंपनीने प्रवासाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजनांची आखणी केली, ज्यात विमान प्रवास, समुद्री सफर, आणि रेल्वे प्रवासाचा समावेश होता.

इ.स. १९७० च्या दशकात SOTC ने आपला विस्तार केला आणि विविध प्रकारच्या टूर पॅकेजेस सादर केली. त्यात कौटुंबिक सहली, हनिमून पॅकेजेस, ग्रुप टूर, आणि व्यावसायिक प्रवास योजनांचा समावेश होता. कंपनीने ग्राहकांची सोय लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक पर्यटन योजना सुरू केल्या, ज्यात युरोप, अमेरिका, आशिया, आणि इतर लोकप्रिय ठिकाणांसाठी प्रवास पॅकेजेस उपलब्ध होती. SOTC ने ग्लोबल टूर ऑपरेटर म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण केली आणि पर्यटकांना त्यांच्या इच्छित पर्यटन ठिकाणी जाण्यासाठी सर्व सुविधा पुरवल्या. १९९० च्या दशकात SOTC ने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रवास सेवांचे डिजिटायझेशन केले. यामुळे ऑनलाइन बुकिंग, प्रवासाचे व्यवस्थापन, आणि ग्राहकांना तत्पर सेवा पुरवणे शक्य झाले. कंपनीने हॉलिडे पॅकेजेस आणि विविध

आकर्षक ऑफर्स सादर केल्या, ज्यामुळे ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत पर्यटनाचा अनुभव घेता आला. SOTC ने विविध बाजारपेठांमध्ये आपला विस्तार केला आणि नवीन ग्राहकांसाठी कस्टमाइज्ड टूर पॅकेजेस सादर केली. Kuoni Travels (एक स्विस पर्यटन कंपनी) ने SOTC चा अधिग्रहण केले, ज्यामुळे कंपनीने आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक विस्तार केला. SOTC ने कौटुंबिक पर्यटन, साहसी पर्यटन, आणि लक्झरी पर्यटन यामध्ये आपली पकड मजबूत केली.

इ.स. २०१५ मध्ये मध्ये SOTC चा भाग Thomas Cook India Group मध्ये विलीन झाला. यामुळे कंपनीचे ब्रँड मूल्य वाढले आणि अधिक व्यापक सेवांच्या माध्यमातून कंपनीने प्रवास क्षेत्रात नवी ओळख निर्माण केली. SOTC ने भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ट्रॅव्हल प्लॅनिंगमध्ये आपली अग्रगण्य भूमिका कायम ठेवली आहे. कंपनीने डिजिटल माध्यमातून प्रवास आणि पर्यटन क्षेत्रात नवनवीन उपाययोजना सुरू केल्या आहेत. कंपनी आजही ग्रुप टूर, परवडणारे प्रवास पॅकेजेस, आणि लक्झरी टूर या क्षेत्रात आघाडीवर आहे. SOTC चे पहिले कार्यालय फक्त ५ कर्मचाऱ्यांसह मुंबईत सुरू झाले. आज ते भारतामध्ये १६० ठिकाणी आपले कार्यालय उभे केले आहे.

**केसरी टुर**

केसरी टुर्स (Kesari Tours) ही भारतातील एक प्रतिष्ठित पर्यटन कंपनी आहे, जी विशेषतः ग्रुप टूर आणि कौटुंबिक सहलींसाठी प्रसिद्ध आहे. १९८४ साली श्री. केसरी पाटील यांनी केसरी टुर्सची स्थापना केली. कंपनीने कौटुंबिक, धार्मिक, शैक्षणिक, आणि आंतरराष्ट्रीय सहलींसाठी विस्तृत सेवा पुरवून भारतीय पर्यटन क्षेत्रात आपली खास ओळख निर्माण केली आहे. १९९० च्या दशकात केसरीने आपला विस्तार केला आणि विविध प्रकारच्या टूर पॅकेजेस सादर केली. त्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय टूर पॅकेजेसचा समावेश होता. कंपनीने ग्रुप टूर आणि परवडणारे प्रवास पॅकेजेस यावर भर दिला. त्यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांना परवडणाऱ्या किमतीत देश-विदेशातील पर्यटन अनुभव घेता आला. यावेळी केसरीने प्रवासातील सोयीसाठी ट्रॅव्हल गाईड, मल्टीडेस्टिनेशन टूर पॅकेजेस, आणि प्रवाशांसाठी विशेष सूचना आणि मदत याची सोय केली.

२००० च्या दशकात केसरी टुर्सने पर्यटकांच्या वेगवेगळ्या गरजांसाठी नवनवीन संकल्पना सादर केल्या. कंपनीने "Kesari Mice" (व्यवसायिक टूर), "Kesari Marigold" (वरिष्ठ नागरिकांसाठी खास टूर) आणि "Kesari Student Special" (शैक्षणिक सहली) आणि धार्मिक यात्रा सारख्या विशेष सेवा सुरू केल्या. केसरीने भारतीय पर्यटकांसाठी युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आणि आशियातील विविध पर्यटन ठिकाणी टूर पॅकेजेस पुरवली. यामध्ये केसरीने प्रवासासोबत स्थानिक संस्कृती, खाद्यपदार्थ, आणि ऐतिहासिक स्थळांचे अनुभव पर्यटकांना देण्यावर भर दिला. २०१० नंतर केसरीने आपल्या सेवा ऑनलाइन आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणल्या, ज्यामुळे ग्राहकांना ऑनलाइन बुकिंग, टूरची माहिती आणि तत्पर सेवा मिळू लागली. केसरीने विविध देशांतील प्रवासासाठी कस्टमाइज्ड टूर पॅकेजेस, हनीमून टूर, आणि फॅमिली ट्रिप्स यांची सोय उपलब्ध करून दिली.

कंपनीने परवडणारे प्रवास, उच्च दर्जाच्या सेवा, आणि प्रवाशांच्या सोयींचे व्यवस्थापन करून पर्यटन उद्योगात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

**वीणा वर्ल्ड**

वीणा वर्ल्ड (Veena World) ही भारतातील एक प्रमुख पर्यटन कंपनी आहे, ज्याची स्थापना २०१३ साली वीणा पाटील आणि सुधीर पाटील यांनी मुंबईत केली. वीणा पाटील या एक अनुभवी आणि प्रख्यात ट्रॅव्हल उद्योजिका आहेत, ज्यांनी याआधी प्रसिद्ध ट्रॅव्हल कंपनी केसरी टूर्स मध्ये नेतृत्व केले होते. केसरी टूर्समधील त्यांचे यशस्वी अनुभव आणि त्यातून आलेली प्रतिष्ठा यांच्या जोरावर वीणा वर्ल्डची स्थापना करण्यात आली. कंपनीची सुरुवात भारतीय ग्राहकांना उत्कृष्ट प्रवास अनुभव देण्याच्या उद्देशाने करण्यात आली होती. सुरुवातीपासूनच, वीणा वर्ल्डने ग्रुप टूर, कौटुंबिक सहली, आणि वैयक्तिक प्रवास पॅकेजेस वर लक्ष केंद्रित केले. प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी हनीमून पॅकेजेस, कौटुंबिक सहली, वरिष्ठ नागरिकांसाठी टूर, आणि महिला विशेष टूर यासारख्या विशेष योजना सादर केल्या. वीणा वर्ल्डने युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आशिया, आणि मध्य पूर्व पर्यटन ठिकाणी आंतरराष्ट्रीय टूर पॅकेजेस विकसित केली.

कंपनीने अधिक ग्राहक-केंद्रित सेवा सुरू केल्या, जसे की 'वर्ल्ड टूर', 'फॅमिली गेटवे', 'वन-डे पिकनिक', यांसारख्या सेवांचा समावेश आहे. वीणा वर्ल्डने विशेषतः प्रवासी कस्टमायझेशन वर भर दिला, म्हणजे ग्राहक त्यांच्या इच्छेनुसार प्रवासाची आखणी करू शकतात. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून कंपनीने ऑनलाइन बुकिंग, प्रवासी व्यवस्थापन, आणि प्रवासी सहाय्यता सेवा यांची सोय केली, ज्यामुळे प्रवाशांना प्रवासाची अधिक सोयीस्कर व्यवस्था झाली. वीणा वर्ल्डने 'डोमेस्टिक टूर' आणि 'वर्क फ्रॉम होलिडे' सारख्या संकल्पना सादर केल्या, ज्यामुळे लोकांना सुरक्षित प्रवासाची संधी मिळाली.

**क्लब महिंद्रा**

क्लब महिंद्रा ही भारतातील एक नामांकित टाइमशेअर हॉलिडे कंपनी आहे, जी महिंद्रा हॉलिडेज अँड रिसॉर्ट्स इंडिया लिमिटेड (MHRIL) या कंपनीचा एक भाग आहे. कंपनीची स्थापना १९९६ साली झाली, आणि ती भारतातील सर्वात मोठ्या टाइमशेअर हॉलिडे कंपन्यांपैकी एक म्हणून ओळखली जाते. कंपनीने टाइमशेअर मॉडेलवर आधारित एक अभिनव संकल्पना आणली, ज्यामध्ये सदस्यांना क्लब महिंद्रा रेसॉर्टमध्ये ठराविक काळासाठी सुट्टी घालवण्याची संधी दिली जाते. क्लब महिंद्रा प्रवाशांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय हॉलिडे रिसॉर्ट्समध्ये आरामदायी आणि लक्झरी प्रवास अनुभव देण्याचे काम करते. कंपनीने प्रथम आपले रिसॉर्ट्स भारतातील काही निवडक ठिकाणी उघडले, ज्यात हिल स्टेशन, समुद्रकिनारे, जंगल सफारी, आणि इतर नैसर्गिक पर्यटनस्थळांवर लक्ष केंद्रित केले.

क्लब महिंद्राची भारतातील प्रमुख पर्यटन स्थळांवरील आरामदायी आणि अद्ययावत सोयी-सुविधा पुरवणारी रिसॉर्ट्स आहेत. याशिवाय, कंपनीने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली उपस्थिती वाढवण्यासाठी काही नवीन पर्यटन स्थानांवरही विस्तार केला. कंपनीने आशियातील काही प्रमुख ठिकाणांसह, युरोप, अमेरिका, आणि मध्य पूर्वेतील काही रिसॉर्ट्सशी करार करून आपल्या सदस्यांसाठी जागतिक प्रवासाची संधी उपलब्ध

करून दिली. क्लब महिंद्राचे भारतभरात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर १००+ रिसॉर्ट्सचे जाळे आहे. यामुळे प्रवाशांना विविध पर्यटन ठिकाणी सुट्टी घालवण्याचा पर्याय मिळतो. कंपनीने आपल्या सदस्यांसाठी गोल्डन हॉलिडे प्लॅन, सेलिब्रेशन वीकेंड्स, आणि इतर वैयक्तिकृत सुट्ट्या देण्याच्या संकल्पना आणल्या. क्लब महिंद्राचे रिसॉर्ट्स कौटुंबिक सुट्ट्यांसाठी आदर्श असतात. रिसॉर्ट्समध्ये कौटुंबिक खेळ, मनोरंजनाच्या सुविधा, आणि मुलांसाठी विविध उपक्रम असतात. तसेच क्लब महिंद्राचे रिसॉर्ट्स उच्च दर्जाच्या सुविधा, आरामदायक निवास, उत्तम अन्न, आणि विविध क्रियाकलापांसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या टाइमशेअर मॉडेलमुळे मेंबर्सना दरवर्षी विविध पर्यटन स्थळी भेट देण्याची संधी मिळते, ज्यामुळे कंपनीने आपल्या क्षेत्रात एक विशिष्ट स्थान निर्माण केले आहे.

**थॉमस कुक**

थॉमस कुक पर्यटन कंपनीचा इतिहास हा जागतिक पर्यटन उद्योगातील एक ऐतिहासिक टप्पा मानला जातो. या कंपनीची स्थापना १८४१ साली इंग्लंडमध्ये थॉमस कुक यांनी केली होती, आणि ती जगातील सर्वात जुन्या पर्यटन कंपन्यांपैकी एक म्हणून ओळखली जाते. इ.स. १८४१ मध्ये, थॉमस कुक यांनी पहिली सहल आयोजित केली, जी लिस्टर ते लफबरो या ठिकाणांदरम्यान रेल्वेने झाली होती. ही टूर ५७० लोकांसाठी होती, आणि हे एक सामाजिक उपक्रम म्हणून सुरू करण्यात आले होते.थॉमस कुक यांची ही पहिली टूर विशेषतः स्वस्त आणि सोयीस्कर बनवण्यासाठी होती, ज्यामुळे ती सामान्य लोकांनाही परवडणारी ठरली. १८५५ साली, थॉमस कुक यांनी पहिली युरोपियन टूर आयोजित केली, ज्यात प्रवासी बेल्जियम, जर्मनी, आणि फ्रान्समधील ठिकाणांना भेट देऊ शकले. यामुळे त्यांनी आंतरराष्ट्रीय टूर आयोजक म्हणून प्रसिद्धी मिळवली. याच काळात त्यांनी प्रवाशांसाठी ट्रॅव्हल ब्राउचर आणि ट्रॅव्हल गाईड्स प्रकाशित करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे प्रवाशांना अधिक माहिती मिळाली. तसेच या काळात त्यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी ट्रॅव्हल चेक्स (Traveller's Cheques) ची संकल्पना आणली, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रवासादरम्यान चलन विनिमय अधिक सोपा झाला.

थॉमस कुक यांचे निधन झाल्यानंतर, त्यांचा मुलगा जॉन मॅसन कुक याने कंपनीची जबाबदारी सांभाळली आणि कंपनीचे पुढे विस्तार केला. इ.स. १९५० नंतर थॉमस कुक कंपनीने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला विस्तार सुरू ठेवला. त्यांनी विमान प्रवासाचे पॅकेजेस, ट्रॅव्हल ॲजन्सीज, आणि इतर प्रवासी सेवांचा विस्तार केला. इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या उदयानंतर, कंपनीने ऑनलाइन बुकिंग सेवा सुरू केल्या, ज्यामुळे ग्राहकांना प्रवासाची योजना सोप्या पद्धतीने करता येऊ लागली. पुढे २०१९ साली, थॉमस कुक कंपनीने आपली दिवाळखोरी जाहीर केली, आणि त्यानंतर तिच्या काही विभागांनी आपली सेवा बंद केली. त्यानंतर २०२० साली, फोसुन इंटरनॅशनल नावाच्या चीनी कंपनीने थॉमस कुकचा ब्रँड विकत घेतला आणि त्यानंतर ऑनलाइन ट्रॅव्हल एजन्सी म्हणून थॉमस कुकची पुन्हा सुरुवात केली. आज, थॉमस कुक मुख्यतः ऑनलाइन बुकिंग प्लॅटफॉर्मवर कार्यरत आहे, जिथे ग्राहकांना हॉलिडे पॅकेजेस, हॉटेल बुकिंग, फ्लाइट बुकिंग आणि इतर प्रवासी सेवांची सोय उपलब्ध आहे.

**मेक माय ट्रीप (MakeMyTrip.com)**

MakeMyTrip.com ची स्थापना दीप कालरा यांनी २००० साली केली. सुरुवातीला, कंपनीने NRI (Non-Resident Indians) साठी यूएस आणि भारत यांच्यातील हवाई प्रवासाची बुकिंग सेवा देण्यावर लक्ष केंद्रित केले. इंटरनेटच्या वाढत्या प्रसारासोबत, ऑनलाइन ट्रॅव्हल बुकिंगमध्ये मोठी मागणी वाढत होती, आणि MakeMyTrip ने या संधीचा लाभ घेत, NRI समुदायासाठी भारतात विमान बुकिंगसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. २००५ साली, MakeMyTrip ने भारतीय बाजारपेठेत प्रवेश केला. भारतातील प्रवाशांसाठी त्यांनी फ्लाइट बुकिंग, हॉटेल बुकिंग, आणि हॉलिडे पॅकेजेस यासारख्या सेवांचा विस्तार केला. कंपनीने भारतात डिजिटल प्रवास क्रांती आणली आणि ग्राहकांना विमानतळांवर जाण्याची गरज न पडता ऑनलाइन तिकीट बुकिंग करण्याची सोय दिली. इ.स. २००८ मध्ये, MakeMyTrip ने हॉटेल बुकिंग सेवा सुरू केली, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या हॉटेलची बुकिंगसाठी एकाच प्लॅटफॉर्मवर सुविधा मिळाली. त्याचबरोबर त्यांनी हॉलिडे पॅकेजेस, रेल्वे बुकिंग, बस बुकिंग यासारख्या सेवा देखील सुरू केल्या. MakeMyTrip ने भारतातील आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील हॉटेल्समध्ये ऑनलाईन बुकिंगची सोय उपलब्ध करून दिली, ज्यात विविध श्रेणीतील हॉटेल्सचा समावेश आहे. तसेच ग्राहकांसाठी विविध पर्यटन ठिकाणाची किफायतशीर हॉलिडे पॅकेजेस तयार केले, ज्यात कौटुंबिक टूर, हनीमून पॅकेजेस, आणि साहसी प्रवास यांचा समावेश आहे.

**गोआयबीबो (Goibibo)**

गोआयबीबो ची स्थापना २००९ साली आशिष कश्यप यांनी केली. सुरुवातीला गोआयबीबोने हॉटेल बुकिंग सेवा सुरू केली. कंपनीने ग्राहकांना सहज बुकिंग अनुभव देण्यासाठी आणि ट्रॅव्हल बुकिंग प्रक्रियेला वेगवान करण्यासाठी एक सुलभ इंटरफेस उपलब्ध केला. त्याचबरोबर, गोआयबीबोने भारतातील डिजिटल पेमेंट्स, मोबाइल बुकिंग, आणि ट्रॅव्हल इंडस्ट्रीमध्ये नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला, ज्यामुळे ती लवकरच लोकप्रिय झाली.

गोआयबीबोने हळूहळू आपली सेवा वाढवली आणि फ्लाइट बुकिंग, बस बुकिंग, आणि रेल्वे तिकिट बुकिंग सुरू केले, ज्यामुळे ती एक पूर्ण ट्रॅव्हल बुकिंग प्लॅटफॉर्म बनली. २०१३-१४ मध्ये, गोआयबीबोची प्रगती झपाट्याने झाली, आणि त्यांनी ग्राहकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी विविध प्रमोशनल ऑफर्स आणि डिस्काउंट्स दिले.

कंपनीने गो कॅश (Go Cash) नावाचा एक खास डिजिटल वॉलेट सुरू केला, ज्यात ग्राहकांना कॅशबॅक आणि रिवॉर्ड्स दिले जात होते, ज्यामुळे त्यांना भविष्यातील बुकिंगसाठी फायदा होई. गोआयबीबोने याच काळात सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर केला आणि मोबाइल ॲप द्वारे बुकिंग प्रक्रियेला आणखी सोपं केलं, ज्यामुळे त्यांनी लवकरच एक मोठा ग्राहकवर्ग निर्माण केला. २०१६ साली, गोआयबीबोची MakeMyTrip कडून खरेदी करण्यात आली. या विलीनकरणामुळे, MakeMyTrip आणि गोआयबीबो यांनी भारतीय ऑनलाइन ट्रॅव्हल मार्केटमध्ये आपले वर्चस्व आणखी वाढवले.

विलीनकरणानंतरही गोआयबीबो ने स्वतंत्र ब्रँड म्हणून आपले कार्य सुरू ठेवले आणि ग्राहकांसाठी नवनवीन ऑफर आणि सेवांचा विस्तार केला.

**स्वाध्याय**

**प्रश्न ड. रिकाम्या जागा भरा.**

१. ………… जगातील सर्वात जुन्या पर्यटन कंपन्यांपैकी एक म्हणून ओळखली जाते.

२. ………… ही भारतातील एक नामांकित टाइमशेअर हॉलिडे कंपनी आहे.

३. ………… कंपनीची स्थापना इंग्लंडमधील रिचर्ड कॉक्स यांनी केली होती.

४. ………… टुर्सने "Kesari Marigold" (वरिष्ठ नागरिकांसाठी खास टूर) सारखी विशेष सेवा सुरू केली.

५. ………… कंपनीने भारतात डिजिटल प्रवास क्रांती आणली.

## २.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

1. ITDC - India Tourism Development Corporation
2. STDCs - State Tourism Development Corporations
3. MTDC - Maharashtra Tourism Development Corporation
4. GTDC - Goa Tourism Development Corporation
5. IRCTC- Indian Railway Catering and Tourism Corporation

## २.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

अ. १. पर्यटन २. पर्यटन स्थळ ३. बजेट ४. पासपोर्ट ५. वाढला

ब. १. इव्हेंट मॅनेजमेंट २. भारत सरकार ३. टुर गाईड ४. राज्य ५. पर्यटन विकास अधिकारी

क. १. टूर ऑपरेटरची २. हॉटेल व्यवस्थापन ३. इव्हेंट मॅनेजर्स ४. जाहिरातींवर ५. गाईड

ड. १. थॉमस कुक २. क्लब महिंद्रा ३. कॉक्स अँड किंग्स ४. केसरी ५. MakeMyTrip.com

## २.५ सारांश

अलिकडच्या वर्षांत पर्यटन उद्योगाने अभूतपूर्व वाढ अनुभवली आहे, वाढत्या जागतिकीकरणामुळे, तांत्रिक प्रगतीमुळे आणि बदलत्या प्रवासी वर्तनामुळे या उद्योगास चालना मिळाली आहे. यामुळे पर्यटन हा जागतिक अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा उद्योग म्हणून उदयास आला आहे. हे क्षेत्र विकसित होत असताना, विद्यार्थ्यांनी पर्यटन उद्योगाला जागतिक ट्रेंड आणि करिअरच्या विकासावर त्यांचा संभाव्य प्रभाव समजून घेणे आवश्यक आहे. पर्यटन उद्योग करिअरच्या अनेक संधी उपलब्ध करून देतो. नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC) च्या अहवालानुसार, भारतीय पर्यटन उद्योग २०२५ पर्यंत ३४ लाख नवीन नोकऱ्या निर्माण करेल असा अंदाज आहे. भारतीय विद्यार्थी या ट्रेंडचा फायदा पर्यटन क्षेत्रात यशस्वी करिअर तयार करण्यासाठी करू शकतात.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**प्रश्न. रिकाम्या जागा भरा.**

१. भारतीय रेल्वेच्या पर्यटन विभागाचे व्यवस्थापन............ अंतर्गत केले जाते.

२. विमानतळावरील पर्यटक सुविधा केंद्रांचे विपणन आयोजन करण्यासाठी............ अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते.

३. ............ विभाग हे भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत एक महत्त्वाचे संस्थान आहे.

४. ............ भारतातील ऐतिहासिक स्थळे, प्राचीन स्मारके, आणि सांस्कृतिक वारसा संरक्षित करण्याचे काम करते.

५. संग्रहालयातील पुरातत्वीय वस्तूंचे व्यवस्थापन, प्रदर्शन योजना आणि पर्यटकांसाठी माहिती देण्यासाठी ............ या अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते.

६. ............ या पर्यटन कंपनीने 'फॅमिली गेटवे' सारखी विशेष सेवा सुरू केली.

७. वीणा वर्ल्डने ............ सारखी संकल्पना सादर केली.

८. वीणा वर्ल्डने ............ सारखी संकल्पना सादर केली.

९. गोआयबीबोने सुरुवातीच्या काळात ............ बुकिंग सेवा सुरू केली.

१०. गोआयबीबो कंपनीने ............ नावाचा एक खास डिजिटल वॉलेट सुरू केला.

## २.७ सरावासाठी स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे

१. IRCTC २. विपणन कार्यकारी ३. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण ४. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण

५. संग्रहालय व्यवस्थापक ६. वीणा वर्ल्ड ७. वर्क फ्रॉम होलिडे ८. डोमेस्टिक टूर

९. हॉटेल १०. गो कॅश (Go Cash)

## २.८ संदर्भ ग्रंथ आणि पुस्तके


1. John Fletcher, Alan Fyall, David Gilbert, Stephen Wanhill, Tourism: Principles and Practice, Pearson Education, UK,2017.
2. Kenneth F. Backman, Kyungmi Kim, Tourism Employment: Analysis and Planning, Cognizant Communication Corporation, USA, 2011.
3. J. Christopher Holloway, Tourism and Hospitality Industry: Issues and Developments, Oxford University Press India, New Delhi, 2009.
4. R.N. Kaul, Tourism and Economic Development in India, Vikas Publishing House Pvt Ltd, New Delhi, 1985.
5. A. Satish Babu, "Tourism in India: An Economic Activity", APH Publishing Corporation, New Delhi, 2008.
6. Jagmohan Negi, Travel Agency and Tour Operations: Concepts and Principles, Kanishka Publishers, New Delhi, 2006.
7. Mohinder Chand, Travel Agency Management: An Introductory Text, Anmol Publications Pvt. Ltd., New Delhi, 2009.
8. T.K. Bhati, Tourism and Employment in India, Gyan Publishing House, New Delhi, 2005.
9. A.K. Bhatia, Tourism Development in India, Sterling Publishers Pvt. Ltd., New Delhi, 2002.
10. Ministry of Tourism, Government of India, Incredible India: Government Initiatives in Tourism, Publications Division, Government of India, New Delhi, 2010.


❑❑❑